# सो पा न दे वी

सोपानदेव चौधरी

REFBK-0016968
REFBK-0016968

१६९६८

# सोपानदेवी

सोपानदेव चौधरी

REFBK-0016968

REFBK-0016968

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ५००७८ वि: काव्य
क्रमांक १७७०१ नोंः दि: २५/१२/६८

किंमत आठ रुपये

© सौ. रजनी शरदचंद्र चौधरी, नाशिक

प्रकाशक : ग. ल. ठोकळ, ठोकळ प्रकाशन, ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे २
मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, 'शिव-पार्वती', टिळक रस्ता, पुणे २

माझी धर्मपत्नी



कै. सौ. लीलादेवी

न देखता दिसणारी
आभासातील आकृती
नसलेपणी असणारी
तीच राहिली स्मृती !

त्या प्रेमळ स्मृतीला
अर्पण—

– सोपानदेव

# सांगायचे म्हणजे—

पस्तीस वर्षांपूर्वी पुणे येथील पहिल्या कविसंमेलनात कवी म्हणून मी महाराष्ट्राला परिचित झालो तो माझ्या शालेय जीवनात लिहिलेल्या कवितांनी. त्या कविता बारा वर्षांनी म्हणजे एकोणीसशे-बत्तीस साली 'काव्य-केतकी' म्हणून पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्या. हा माझा पहिलावहिला कवितासंग्रह होता. यानेच मला अमाप प्रसिद्धी दिली. त्यानंतर अठरा वर्षांनी म्हणजे एकोणीसशे-पन्नास साली 'अनुपमा' हा माझा दुसरा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला: पुढे ज्या कविता लिहिल्या गेल्या तो तिसरा कवितासंग्रह एकोणीसशेबासष्ट साली काढावा असे मनात आले, परंतु ते मनातल्या मनातच राहिले; प्रत्यक्षात उतरले नाही. गेल्या पस्तीस वर्षांत उभ्या महाराष्ट्रात आणि जिथे मराठी भाषा बोलली जाते अशा परप्रांतीय शहरांत माझे काव्यगायनाचे हजारोंनी कार्यक्रम झाले, अजूनही अधूनमधून होतात. रसिकांना आवडलेल्या विशेषत: गाजलेल्या अशा माझ्या नवनवीन कविता ते पत्रव्यवहार करून मागवू लागले. अर्थात त्या मला लिहून पाठवाव्या लागत असत. त्यातच माझे परमस्नेही कविवर्य दादासाहेब ठोकळ यांचे पत्र आले. माझी एक कविता नकलून पाठविण्याविषयी त्यांनी लिहिले होते. एकदा बोलता बोलता मी त्यांना म्हणालो, "आता माझ्या कविता मीच नकलून पाठविण्याचा कंटाळा आला आहे." असे हे माझे सहज बोलणे! माझा नवीन कवितासंग्रह प्रसिद्ध झाला नाही याची त्यांना जाणीव झाली. नवीन तिसरा कवितासंग्रह काढण्यापेक्षा आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या माझ्या समग्र कवितांचा संग्रह ठोकळ प्रकाशन तर्फे काढावा, अशी दादासाहेब ठोकळांनी

सूचना केली. मला मान्य केलीच पाहिजे अशी ती सूचना. 'सहज बोलणे होत हितकारी!' असा हा योग. आणि लगेच ते काम त्यांनी स्वत: हाती घेतले.

या माझ्या समग्र कविता-संग्रहाचे नाव काय ठेवावे ते माझे मलाच सुचेना. शेवटी साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांना नावासंबंधी विचारले. त्यांनी अगदी तोंडपाठ असल्यागत घडाघड आठ-दहा नावे सुचविली. ती मी टिपून घेतली. त्यांपैकी, 'सोपानदेवी' हे नाव मला पूर्णपणे पसंत पडले. ज्ञानदेवांची 'ज्ञानदेवी' त्याप्रमाणे सोपानदेवाची 'सोपानदेवी' अशा आढ्यतेने किंवा अहंकाराने नव्हे तर एका विशिष्ट जिव्हाळ्याने! माझ्या धर्मपत्नीला (कै. सौ. लीलादेवीला) साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाई टिळक या 'सोपानदेवी' या लाडक्या नावानेच संबोधित असत. या नावात माझ्या मृतपत्नीची स्मृती सामावलेली आहे.

सोपानदेवी या कवितासंग्रहात माझ्या आतापर्यंतच्या सर्व कवितांतून निवडक अशा कविता घेतलेल्या आहेत. ती निवड श्री. दादासाहेब ठोकळ यांनीच केलेली आहे. प्रुफे तपासण्यापासून तर वेष्टनावरील चित्राची कल्पना देण्यापर्यंत सर्व संपादन त्यांनीच केले आहे. त्यांच्या या आत्मीयतेने 'आभार मानणे' हे परकेपणाचे ठरविले आहे. तेव्हा आभार तरी कसे मानायचे? "सूत सुते गुंतले, तृण तृणेचि बांधिले."

चौधरी निवास
शिवाजी उद्यान
नाशिक १

— सोपानदेव चौधरी

# अनुक्रम


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | गोकुळिचा कान्हा | १ | २६ | मृदंग, ढोलकी आणि दुंदुभी | ३४ |
| २ | मोहिनीस | ३ | २७ | चुकल्या रे प्रीतीच्या वाटा | ४० |
| ३ | प्रतीक्षा | ४ | २८ | विस्मृतीतील स्मृती | ४१ |
| ४ | मळ्यात जाताना | ५ | २९ | पथ चुकू नको रे! | ४२ |
| ५ | लढाईवर जाताना | ८ | ३० | ताजमहाल | ४३ |
| ६ | भारतभाग्य–विधाता | १० | ३१ | माझी नवलाची होडी | ४४ |
| ७ | देवाच्या दारी | ११ | ३२ | पाह्यलं ग दारी | ४५ |
| ८ | आई | १२ | ३३ | मोऱ्याची बल्हारी | ४७ |
| ९ | आईचेच काळीज ते | १३ | ३४ | माझे बालपण गाते | ४८ |
| १० | निपुत्रिका | १६ | ३५ | तुझा एक एक शब्द | ५० |
| ११ | पत्रळीचे मनोगत | १७ | ३६ | विस्मृतीला जाग आली | ५१ |
| १२ | पाच वर्षांनंतर | १८ | ३७ | नयन–तरंग | ५२ |
| १३ | मुका | २० | ३८ | अबोल वीणे | ५३ |
| १४ | आंधळा | २१ | ३९ | आल्या पावसाच्या सरी | ५५ |
| १५ | पांगळा | २२ | ४० | नाविक गीत | ५६ |
| १६ | घट अमृताचे आणिले | २३ | ४१ | नयन तुझे | ५७ |
| १७ | नर्तकी | २४ | ४२ | दीनानाथ | ५८ |
| १८ | कलावंतास | २५ | ४३ | आली कुठूनशी | ६० |
| १९ | अजाणत प्रीती | २६ | ४४ | लोककाव्याची अलौकिकता | ६१ |
| २० | पूजा | २७ | ४५ | मुठामाउली म्हणे | ६२ |
| २१ | रहाटा! | २८ | ४६ | प्रवासातील सहवास | ६४ |
| २२ | गोगलगाय | २९ | ४७ | महानिर्याण | ६५ |
| २३ | माळी–फुलमाळीण | ३१ | ४८ | कसे घडते! | ६६ |
| २४ | तेवढेच समाधान | ३२ | ४९ | उभविली मनोराज्ये | ६७ |
| २५ | टाकलेले पोर | ३३ | ५० | गाण्याची मैफल | ६८ |

५१ आल्या लहरी ६९
५२ पाऊस काही पडेना ७०
५३ रंगलिपीतला श्रीरंग ७१
५४ सगळे काही जवळ आले ७२
५५ वैयक्तिक जीवनी ७३
५६ तुझा आशय ७४
५७ वठलेला वृक्ष ७५
५८ या वटवृक्षाला ७६
५९ घरभरणी ७७
६० जाते ७८
६१ नक्षीदार कविता ७९
६२ विशेषातही शेष मागे उरे ८१
६३ कुमार गंधर्वांचे गाणे ८३
६४ नाव्ययोग–नाव्यप्रयोग ८५
६५ ती सायंकाळ ८६
६६ झाली मानवतेची चोरी ८७
६७ ऐलाड–पैलाड ८९
६८ आमुची लिपी ९०
६९ मायबोलीचे माहेर ९१
७० रसिकांप्रत ९३
७१ तुझेच रूप पाहू दे ९४
७२ हवन हवे, बलिदान हवे ९६
७३ यावे नव महाराष्ट्रा ९९
७४ उद्याचा नवा महाराष्ट्र १०२
७५ आज भवानी शांतादुर्गा १०५
७६ मानवतेचे धडे १०७
७७ यमुनेच्या पाण्यावर १०९
७८ महाराष्ट्रगीत ११०
७९ क्रान्ति ११२
८० जय जय भारत ११५
८१ काव्य–चर्चा ११७
८२ धर्मसंस्थापकांनो ! ११९
८३ एक चमत्कार १२१
८४ मी पहिल्यांदा १२२
८५ तिघांच्या तीन तऱ्हा १२४
८६ नवकवीचे मनोगत १२५
८७ निळा संज्ञाप्रवाह १२७
८८ मी ताक पितो १२८
८९ टांग–टिंग–टिंगा १३२
९० श्रीमंतीला लागे जणू ! १३५
९१ धरतीची माती १३६
९२ आत्मनिष्ठ १३७
९३ नाही कशावरून ? १३८
९४ भाषेची अभिलाषा १३९
९५ हे असे होते ! १४०
९६ आणि आम्ही १४१
९७ तीच–तम–जाय १४३
९८ तसेच आमचे झाले १४६
९९ नयनीताल १४८
१०० एक शल्य ! १५१
१०१ झालाच विनोद ! १५२
१०२ पथ्यपाणी १५४
१०३ मातलेली माती १५५
१०४ पाटा–वरवंटा १५७
१०५ कधी कधी ! १५९
१०६ चक्की १६२
१०७ कधी नव्हत १६६
१०८ यंत्र रे शिकार ! १७०

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०९ | वगैरे-वगैरे | १७२ | १२१ | तू एकला ! | १८९ |
| ११० | सिगारेट | १७४ | १२२ | असेच काहीतरी | १९१ |
| १११ | कठीण प्रसंग | १७५ | १२३ | सौंदर्य म्हणाले— | १९२ |
| ११२ | तरंग | १७७ | १२४ | काव्य-शास्त्र-विनोद | १९४ |
| ११३ | थांब रसिका | १८० | १२५ | इंजन | १९५ |
| ११४ | मागणे | १८१ | १२६ | काळ चालला पुढे ! | १९७ |
| ११५ | का उदास बसता ? | १८२ | १२७ | प्रवासी | १९८ |
| ११६ | तू मोहळ | १८३ | १२८ | घोडे येते मूळपदावर | १९९ |
| ११७ | कालचक्र | १८४ | १२९ | नवे जग | २०१ |
| ११८ | विश्वसंगीत | १८५ | १३० | पुण्य आणि पाप | २०३ |
| ११९ | इषारा | १८६ | १३१ | असली कविता | २०४ |
| १२० | पूर्णता अखेरिस | १८७ | १३२ | अश्रूंचे आवाहन | २०६ |


■

# गोकुळिचा कान्हा

गोकुळिचा कान्हा कोणी पाहिला कि काय ग ?
गोकुळिचा राणा माझा देखिला कि काय ग ?

जमूनेचं पाणी सगळं
किती बाई, काळं काळं !
प्रभू-चिंतनाने जमुने, काळि पडलि काय ग ?

प्रभू सावळा हा कृष्ण
रंग तुझा झाला कृष्ण
कृष्णनाथ लपवुनि पोटी ठेविला कि काय ग ?

सांग गडे जमुनामाई
संशयास जागा राही
तूच ऐशि केली बाई, कारवाइ काय ग ?

सवे घेउनी ब्रिजनारी
खेळगडी कुंजविहारी
कुंजवनी गोपींसंगे खेळतो कि काय ग ?

गुंतलासि कवण्या ठाया ?
येइ तुला मी धुंडाया
ठायि ठायि तू यदुराया, धुंडु तरी काय ग ?

चोरियले माझ्या चित्ता
देवपणा वरि मिरवीता !
देवपणा कळला पुरता, बोलु तरी काय ग ?

येइ मला चाहुल कानी
दिसे अतासे हे कोणी
लताकुंजि लपुनी छपुनी, पाहतो कि काय ग ?

हसू नका पुष्पलतांनो,
सृष्टिदेविच्या छकुल्यांनो,
कृष्णसखा जवळी म्हणुनी वेडविता काय ग ?

वेडिपिशी मजला म्हणता
तुम्हांसवे बोलत असता
माझि मला बोलायाची चोरि झालि काय ग ?

नको नको थट्टा असली
शर्थ अता बाई, झाली
कुठे तरी तो वनमाली देखिला कि काय ग ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम ........................ वि:
क्रमांक ........................

## मोहिनीस

तू अशीच निशिदिनी टाकी गडे, मोहनी
मजवरी टाकी गडे, मोहनी

मेघांच्या बाहू-पाशातुनी
जशी दामिनी जाई निसटुनी
दृष्ट कुणाची लागे म्हणुनी
गेली कशी छेडुनी, चकाकत गेली कशी छेडुनी

नको तुझी ती अखंड सोबत
अशीच मजला जाई छेडित
यातच सारी भरली गंमत
अशा सुखाचा धनी, होइन मी अशा सुखाचा धनी

प्रीतीचा मग रोग कशाचा ?
योग नसे, हटयोग कशाचा ?
शुभ मरणाचा लाभ कशाचा ?
आशा धरावी कुणी ? भलतिच आशा धरावी कुणी ?

प्रेम आंधळे, जणू भिकारी
तशीच घेई सारंगी करि,
भिक्षा मागत तुझिया दारी,
खुल्या दिलाचीच ना ? आळवुनी खुल्या दिलाचीच ना ?

देउनिया मज अपुरे दर्शन
चित्त घेतले सगळे चोरुन
कधी फेडशिल प्रेमाचे रिण ?
ठेवी गडे त्वन्मनी, स्मृती ही ठेवी गडे त्वन्मनी

# प्रतीक्षा

मी झुरत सदा अंतरी,
नाथ कधि येतिल गे मंदिरी ?
पहिला विरहाचा तो दिन
छे नको त्याचि गडे आठवण
लांबवी विरह असा दारुण
मजहुनी गमत चकोरी बरी,
वाजते हळुच कुठे पाउल
तीच हो श्रवणांची चाहुल
पडे का अशी मनाला भुल ?
झालि गत चुकल्या हरिणीपरी,
पारवा उडत येइ धाइत
पत्रिका नसे परी चोचित
आस ही होती मज वाटत
कळावी ख्यालिखुशाली तरी,
सुमांची सुकली माला तरी
जयाच्या रुळली वक्षावरी
सवत जी गमली गे क्षणभरी
घेउ का कुरवाळुनि तिज उरी ?
जाहले उत्सुक मी दर्शना
सारखी हुरहुर वाटे मना
कुठवरी बसू सखे ? सांग ना
घोर दिन मोजित बोटावरी,
होउ का शेवट हा साजणी
हुरळल्या प्रेमि जिवाचे धनी
जोवरी येतिल गे परतुनी
राहते उभीच सज्जावरी !

# मळ्यात जाताना

ठेउनी प्रेमे, प्रेमे फडक्यात,
भाकरी-भाजीचा बेत
चुरियले वरती, वरती मोलाचे,
जोंधळी पापड उडदाचे
टाकिले वरती, तिखट मसाल्याचे,
ओतले तेल करडईचे
सुटाया पाणी, पाणी तोंडाचे,
लोणचे घालुनि आंब्याचे
आठवण करुनी, करुनि घातली ती,
भाजि ही सगबहिणीघर ची
बांधुनी मोदे, त्वरित न्याहरीला,
घरधनी माधवरायाला
नेसली अंगी, अंगि आवळून,
नाटिचे† लुगडे ते छान
लाविले भाली, भालि कुंकुमाला,
भूषवी पतिच्या भाग्याला
घातले पायी, पायी पायतणा,
दाविते भीती पापिजना
कटीला खोवी, खोवि टोकदार,
निंदणीचे खुरपे प्यार
डोकिवरि पाटी, पाटि न्याहरीची,
धरियली वाट शिवाराची
मंजुळा चाले, मार्ग आक्रमीत
मन तिचे पतिच्या हृदयात

---

$ सख्ख्या बहिणीप्रमाणेच एक मानलेली बहीण.

† सुती लुगड्याची जात.

मंजुळा चाले, सावरीत पदर
फडफडे वाऱ्याने फार
मंजुळा चाले, चाले तंद्रीत
माधवाचे चिंतन करित
मंजुळा चाले, चाले मोदात,
वाटले मनी अकस्मात
मनाला वाटे, उशिर आज झाला
सूर्य हा डोईवर आला
क्षणाला वाटे, खंतचि जीवाची
टळलि का वेळ न्याहरीची !
काय तरि बाई ! मी मोठी नष्ट !
चालले तिकडे किति कष्ट !
उगिच मी गेले पाटिलवाड्यात
गमविला वेळ बोलण्यात
कुठुनि ती आली, आलि 'ठमाबाई',
उशिर हा म्हणुनि मला होई
लागली शीव, आता शहराची,
दिसे बाभूळ एकदाची
मळ्याची खूण, खूण अता दिसली,
कानि ही लल्कारी आली
मारि लल्कारी, लल्कारी कोण ?
मंजुळे, तुझा पंचप्राण
मारि लल्कारी, "मोटेच्या बैला,
चाल रे, ‡आवड हा भरला ! "
मारि लल्कारी, "ढेलाऱ्या बैला,
चाल रे, आवड हा भरला !

---

‡ तीन वाफ्यांचे एक पाडगे व वीस पाडग्यांचा एक आवड.

सावळ्या, तूही, चाल जरा वेगे,
उमलवी केळीचे पोगे
तुम्ही हा घ्या रे, घ्या रे शाबास !
हिरवळ्या $दादरचा घास
तुम्हा दोघांना तगडे बनवीन
घालुनी सरकीचे/ दान
सावळ्या तुजला आणिक मोतीला
रेशमी गोंडे माथ्याला !
हयाती राहो, राहो तुम्हांला,
†सवारू पुढच्या पोळ्याला
तुम्हा दोघांची डौलदार शिंगे,
बांधु मग त्यांना बाशिंगे
केतकी अपुली, फुलेल ती गहिरी,
केवडे लाविन मग नम्रो
विणू मग झूल, झूल तुम्हांलागी,
रंगही देऊ नारिंगी
फुलांचा छान, छान बहर आला,
आपुल्या पळस पांझऱ्याला ''
गाउनी गान, गान माधवाने,
फेडिले कष्टाचे उसने
गाउनी गान पुरवियले गोड
सावळ्या मोतीचे कोड
जाहली वेळ, वेळ न्याहरीची
बघतसे वाट मंजुळेची !

---

$ विहिरीच्या पाण्यावर वाढवलेला कडबा.

† शृंगारू.

# लढाईवर जाताना

सखि, सोड गडे बाहुपाश कंठिचा
रणशिंग वाजते निरोप दे भाग्याचा
सखि, ढाळु नको विरहाश्रू घळघळा
विरहाचा वाटेकरी धन्य जाहला
सुख माझे जे तेच सौख्य ना तुला !
संसारि जनांचा हा तर सुखसोहळा !
जरि तुजसि गमे दुःखाचा हा क्षण
किति गोड गडे सुखदुःखाचे मीलन !
मुखकमलाते स्कंधी मम ठेवुन
कुठवरी राहशील उभी अशी अवलुन ?
सखि, सोबतची तुझी जिवाची प्यार
ती कट्यार घाली विळखा माझा तर !
नवमास तुझे भरत येति साजणी
नवबाळ जिवाचा होइल तोवर धनी
सखि, आणु नको किंतु मात्र तव मनी
हृदयात ठेव ती देवि कुलस्वामिनी
तू वीर जननि ना ? भीति कशी मनि वसे ?
पोटचा गर्भ तुज वेडावुनि हसतसे
स्थिर चित्ताने विचार करितो असा
फोडीन व्यूह शत्रूचा पुढती कसा !
चल सोड अता, जाउ देइ सत्वर
शिवरायाचा बघ दूत उभा बाहिर

किति अधिर पहा अबलक घोडा गुणी
मम वाट बघतसे स्वार व्हावया झणी
ती ऐक पुन्हा झडत दुंदुभी रणी
देतसे धीर मज देवि कुलस्वामिनी
ती विजयश्री आणिन मी खेचुनी
अम्हि वीर मराठे सदा यशाचे धनी !

# भारतभाग्य-विधाता

[ कै. वा. गुरुवर्य श्रीमान पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर
( गायनाचार्य ) यांना उद्देशून ]

गानांच्या लहरी क्षणात विरल्या कोठे नभोमंडली ?
भक्तीमौक्तिक अश्रुबिंदु बनले रत्नाकराच्या तळी
कंठाची तर वर्णवे न अजुनी कोणासही माधुरी
प्रेमाने परि रामनाम उठवी रोमांच अंगावरी

नादब्रह्म तशीच पूर्ण भरली भक्तीसुधा गायनी
मोदाने श्रुति राममंत्र जपती सप्तस्वरांच्या मनी
नित्याच्या नत्र जन्म वा मरण या सांडूनि साऱ्या रिती
मृत्यूने जगुनी स्वता जगविले त्या गान विद्येप्रती

# देवाच्या दारी

आज रामाचा जन्मदिवस येई
मंदिरी जाया उडत एक घाई
रामनवमी पातली चैत्रमासी
म्हणुनि गेलो प्रभु रामदर्शनासी
एकतारीचा सूर येइ कानी
ताल चिपळ्यांचा रंग देत गानी
मुखे गर्जत ' जय रामकृष्ण हारी '
एक चोखा देखिला महाद्वारी
गोड तुकयाचे गाउनी अभंग
रामभजनी जाहला पुरा दंग
खऱ्या भावाचा विमल भक्तिप्रेमा
फोडि टाहो ' जय दाशरथे रामा ! '
घालि लोटांगण, भजन संपवीले
स्वताभवती मग प्रदक्षिणा चाले
मजकडे तो फेकिता दृष्टिक्षेप
मुदे वदला ' जोहार मायबाप ! '
म्हणे दादा, " तुम्हि फार भाग्यवान
तुम्ही ब्राह्मण, मी असे हीन दीन
अभाग्याची या विनंती तुम्हाला
प्रभूकंठी हा हार एक घाला
' हार चोख्याचा ' वदा हेच बोल
पुजारी जरि केरात टाकतील

कापुराची ही ज्योत लावुनीया
राख हृदयाची व्हा रामराया "
फिरुनि गर्जे तो ' रामकृष्ण हारी '
करूण वाणी मम बैसली जिव्हारी
हळुच वदलो मी, " तूच जाइ आत,
देवभक्ताला काय जातपात ! "
" काय भलते बोलता मायबाप
कुठे फेडू हे मूर्तिमंत पाप ? "
वदुनि दीन वचे अश्रु दोन ढाळी,
" असे नाही होणार कदाकाळी
मंदिराची अंगणे झाडण्याचे
लाभले हे मज वतन वैभवाचे
वाडवडिलांचे पुण्य साठलेले
कसे फासावे आज त्यास काळे ? "
भक्तिभावे मी करुनि नमस्कार
प्रभूकंठी घातला पुष्पहार
कर्पुराच्याही ज्योति लावुनीया
धूर त्यांचा वदतसे रामराया
' कितिक पापी जन मंदिरात येती
लोकलाजेस्तव रामनाम घेती
तुझ्या भेटीची आस जया भारी
खरा ब्राह्मण तळमळे पहा दारी ! '

# आई

आइ, तव अंगाईं-गीत
ऐकुनी जगाचा
कोलाहलही होतो गे शांत !

आइ, तव प्रेमाचा घास
भरवून दिला जो,
नसे त्यापुढे कसलीही आस !

आइ, तव प्रेमळ ती हाक
ऐकताच माझी
तहान आणी हारपते भूक

आइ, तव प्रेमळ तो हात
फिरताच पाठिवर
दु:ख निवे मम एक्या निमिषात

आइ, तव प्रेमाचा राग
रुसवितो क्षणी, परि
दाखवितो मज उन्नतिचा मार्ग

आइ, तव प्रेमाचा पापा
शिकवितो ' जगाशी
वाग सदा तू प्रेमाने बापा '

आइ, तव हाताचा मार
खाउनीच कळते
कर्तव्याचे खरे खरे सार

आइ, तव प्रेमाची मूर्ती,
अस्तित्व प्रभूचे
दावायाते येई भूवरती !

# आइचेच काळीज ते

सती संध्या शोभली स्वर्णरंगी
प्रेम—गोष्टी रंगल्या सौधभागी
रमण-रमणींचा प्रेमवाद चाले
तोंच रमणी रमणास काय बोले—
" जरी असले मजवरी खरे प्रेम
तरी पुरवावे सख्या एक काम
तुम्ही पूजितसा ज्यास प्रेमभावे
तेच काळिज आइचे मला द्यावे ! "
प्रीय सखीच्या ऐकुनी अशा बोला
मनी ईर्षा पेटुनी तो म्हणाला,
" पहा प्रेमाची खरी तू कसोटी
मातृ-काळिज आणीन तुझ्यासाठी. "
अर्ध-रात्रीचा समय पाहुनीया
पार सांडियली सर्व दयामाया
सुरा घेउनिया आपुल्या करात
निघे मातेचा करावया अंत
तोच कोठे चुकचुके एक पाल
धस्स होई पोटात जरा वेळ
परी विसरोनी अपशकून पार
निघे वेगे तो पुन्हा धरुनि धीर
होति आई झोपली महालात
श्वास—श्वासातुनि ध्वनी एक येत

म्हणे, ' देवा, मम बाळ सुखी ठेव
यशा अर्पूनी करी चिरंजीव ! '
सुरा चालवुनी आइच्या उरात
आणि काळिज ते घेतले करात
ठेउनीया तबकात काळजाला
त्वरे भीतीने तेथुनी निघाला
बघुनि असले भेसूर पुढे चित्र
झाकियेले रजनिने झणी नेत्र
ठेच लागुनिया पडे तोच खाली
तबक-काळिज ती हातची गळाली
कळवळूनी काळीज त्याच वेळी
वदे, ' बाळा, तुज इजा किती झाली ? '
जिव्हाळ्याची करवे न कल्पनाच
आइचे ते काळीज, आइचेच !

## निपुत्रिका

‘ बघा ती पवळी मज हिणविते
माझ्याच देखता रोज रोज ती  वत्साला पाजिते ’
काढिल्या रांगोळ्या अंगणी
बाहेरुनि येता प्रियकर हासे  आनंदाने मनी

ती : जायचे बाजूने हो जरा
पुसकटुनी जातिल रांगोळ्या  या पायाने प्रियकरा

तो : किती तव सुंदर या वल्लिका
या अशा कृतीला पुसावया मी  बाळ असे सान का ?

ती : काय हे भलते बोलायचे

नाहीच उणे का रांगोळ्यांमधि  वदली करुणावचे
हळुच मग आले हृदयातले
रांगोळ्यांवरि या उमटतिल कधि  इवलाली पाउले ?
पुढे कधि पुसल्या गेल्या जरी
इवल्याशा पायांनीच पुसाव्या  आस सख्या अंतरी !

## पवळीचे मनोगत

कशी हिणवू मी तुला ?
काय सांगू तुज आता ?
जन भाविक म्हणती
गाय जगताची माता !

माझ्या कासेतले दूध
पिते माझेच वासरू
घरातला लक्ष्मीच्या
नाही कुशीत लेकरू
दूध माझे आसवले
सांग तेव्हा कशासाठी ?

माझ्या दुधाच्या वाट्याला
बाळासाठी नाही वाटी
सुन्या सुन्या जीवनात
आता आनंद दाटला
तुझी कूस दुणावता
दीस सोन्याचा भेटला

काढा काढा धार माझी
आता नाही धीर मला
तुझ्या जुळ्यासाठी बाई
माझा पान्हा दुणावला

तुझी बालके अंगणी
आली रांगोळ्या पुसाया
तेच येतील ग पुढे
तुझे आसू पुसावया !

# पाच वर्षांनंतर

[ ‘ निपुत्रिका ’ ह्या कवितेची दुसरी बाजू ]

तो : नीरस संसारात भरियला
रंग हरीने सखे घरी

दोन पाळणे हलू लागले
लक्ष असू दे तयांवरी

ती : अताच कोठे संपविला हा
शिंपुनिया अंगणी सडा

अग बाई ! उठलीच छबकडी
फोडित दोघे हंबरडा

तो : काढ, काढ, किति काढिशील तू
रांगोळ्या अंगणी स्वता ?

एक पाठिशी, दुजे सामुरी
कशी काढिशिल पाहु अता !

ती : किती शहाणी माझि वासरं
बसतिल खेळत ओटिवरी

मुलाहुनी तुम्हि मूल पुसाव्या
तुम्हीच या वह्लिका तरी

तो : पुसणारे पुसतील, उठवितिल
ठसे अंगणी भराभरा

माझे पाउल नाहि रिकामे
पुसावया वह्लिका जरा

ती : नाहि रिकामे ? जा तर आता
            ह्याच पाउली फिरावया

      माझे मी घेईन पाहुनी,
            नको एवढे वदावया

तो : ऐक जरा, ती ' हम्मा हम्मा '
            हंबरते धेनू पवळी

      तुझ्या वासरां दूध द्यावया
            बोलविते त्यांना जवळी

ती : खरेच, माझी उभी वासरे
            घेउनिया वाट्या हाती

      नव्हती ' पवळी ' मजला हिणवित
            हीच तिची आशा होती !

# मुका

समजुनि घ्या हो मुक्याच्या खुणा
हावभाव हे त्याचे बघुनी
हसू नका हो तयासि कोणी
विचार कृतिमय आणा ध्यानी
        अर्थ साठला त्यात दुणा—

हसण्याची रडण्याची भाषा
एकच दिधलीस त्यास परेशा !
आणिक मनिच्या अनंत आशा
        इहलोकहि त्या गमत उणा

दावाया अस्तिकपण ह्रदिचे
घेइल कैसा नाम प्रभूचे
नाम पारखे जया स्वताचे
        जन्मा येणे काय गुन्हा ?

संत थोर म्हणती प्रभुलागी
रूप असे तव मुके विरागी
मुक्यासि प्रभुता, अम्ही अभागी
        सत्य वाटते हेच मना !

# आंधळा

दाटला चहूकडे अंधार
निशिदिनी जाळी एकच चिंता मजला ही अनिवार
जन्माची ही काठि सोबतिण
खात ठोकरा आधी आपण
बजाविते मज ' धरि रे धोरण
पद टाकी हळुवार '—दाटला चहूकडे अंधार

असतिल का हिज देवा, डोळे ?
खरे काय ते मजला न कळे
जोवरि ही मम करात खेळे
हीच मला आधार—दाटला चहूकडे अंधार

जग हे वदते, दिवस उगवला
अथवा चंद्रोदय तो झाला
दिव्य दैवते दिसति न डोळा
चंद्रसूर्यही पार—दाटला चहूकडे अंधार

सुखदु:खाच्या घटिका स्मरुनी
येत जेधवा नयनां पाणी
अश्रु ढाळणे एवढेच या —
नयनांचे उपकार—दाटला चहूकडे अंधार

जिथे उभा मी ' तेच सर्व जग '
सदन कशाला हवे मला मग ?
मिटली मात्र खरी ही दगदग
सगळे मम घरदार—दाटला चहूकडे अंधार

घडिली देवा, कशासि काया ?
तुझेच का रे स्तवन गावया ?
मूर्ति कोणती आणू हृदया ?
तूही पण अंधार—दाटला चहूकडे अंधार !

# पांगळा

“ मी सदा रखडतो असा पथी बाजुला
झरझरा चालुनी कोणी
मज घाव उरी घातला ? ”

ये चाहुल नंतर कुठे जरा त्याजला
कडकडाट तो टाळ्यांचा
जयनाद घुमू लागला

पळण्याची शर्यत जये आज जिंकिली
मिरवणूक त्या तरुणाची
ही मार्गाने चालली

पांगळ्यासि पाहुनि तदा तरुण थांबला
देउनी काहिसे हाती
कळवळत चालु लागला

गहिवरे तदा पांगळा पदक पाहुनी
ढळढळा गळाले आसू
करुणामय नयनांतुनी

“ घडियला पंगु देह हा तूच ईश्वरा
उद्धार परी मम केला
या नररत्नाने खरा ”

त्या तरुणाची उमटली पदे पाहिली
गडबडा लोळुनी त्याने
ती धूळ अंगि लाविली !

# घट अमृताचे आणिले

घट अमृताचे आणिले
दिव्य दूत आम्ही स्वर्गामधले

भरले अमृत घटांतरी जरि
घट घडले हे मातीचे परि
भाळावे का उगाच वरिवरि
आत बघा जीवन भरले

नका उतावीळ होऊ ऐसे
घेरु नका, व्हा शांत जरासे
फुटतिल घट, मग होइल हासे
खापरिची मिळतिल शकले

देऊ अमृत सकल तुम्हांला
आस तयाची अम्हां कशाला ?
नियम एक परि असे येथला
मी-तूपण विसरा सगळे

अमृत कसचे ? अजाण म्हणतिल
लागेल कुणा अंतरि तळमळ
किंवा करितिल वृथा कुणी छळ
छळितिल तेच खरे दुबळे

कुभावनांचे पळतिल दानव
हिंस्र पशूंचे बनतिल मानव
चला चला लयलूट तुम्हांस्तव
हसवु सकल जग प्रेमबळे

## नर्तकी

नाचे नर्तकी, थय थय नाचे नर्तकी
नाचरंग उधळीत सारखी
हळूच येई सरता रजनी
सुप्त धरेची शाल ओढुनी
फेर घेत मग विलसे गगनी
शुक्राची चमकवीत चमकी—
जीवनात जीवाच्या अगणित
मीलनात युगुलांच्या विहरत
चिंतनात सकलांच्या बहरत
अभिनव रूपे घेत नाटकी—
ऐकुनि जगताची रडगाणी
विलीन होई त्यातहि रमुनी
देवदयेचे मेघ आळवुनी
मयुरनृत्य रंगवी एकटी—
जगहि थिटे हिज नाचायाला
घालि गवसणी नभोमंडला
अनंतात मग विहरे बाला
फिरे गरगरा घेउनि गिरकी—
निघे तेथुनी पातळांतरि
क्षीण हिला नच सदा हुशारी
मुरडत मुरकत नागनृत्य करि
दंग जाहले शेष-वासुकी—
सेवुनि कल्प-विकल्प क्षणाला
भूक हिची ना कळे कुणाला
रमवित सकला ब्रह्मांडाला
आत्मसुखाला मात्र पारखी !

# कलावंतास

कलावंता रे, रंगवि आतिल रंग
उठवुनि मनिचे भावतरंग
सुवर्णमंडित बेसुर वांसरि
प्रेमाने तुज दिली कुणी जरि
घे वेळूची सुरेल सत्वरि
डुलवि तियेने लहरि भुजंग —

रसिकांची दे तृषा वाढवुन
येतिल सगळे आपण धावुन
उंचावू दे तव सिंहासन
ठेवि अढळ, सकळा करि दंग —

मनामनातिल गूढे कळतिल
हृदयाला हृदये ओळखतिल
खरे रसिकवर झेप टाकितिल
तुजभवती बनतील पतंग —

तुझी लेखणी, तुझी कुंचली
तुझा गळा अन् तुझी देहुली
तुझी सुवाचा जितुकी झिजली
झिजव हृदयही तू रसरंग —

बघुनी तव ही मोहक करणी
कौतुक केले जरि रसिकांनी
वानितील निंदितील कोणी
बडवुनि दोहीकडूनि मृदंग —

# अजाणत प्रीति

जे दुरुनी दुरुनी प्रेम अजाणत करिती
समजेल मला का कधी तयांची प्रीती ?

कमलिनी कुठे दिनमणी, फेकि मृदु किरणे
प्रखर ताप ज्याचा होइ तियेचे जगणे
उगवतो नभी, तळपतो, मिरवि निजकांती
समजेल मला का कधी तयांची प्रीती ?

प्रभुपदा अर्पुनी सदा आपुली वाचा
विधिनिषेध ज्यांना नसे देवधर्माचा
आळवुनी पाखरे गान जयांचे गाती
समजेल मला का कधी तयांची प्रीती ?

जोवरी न कळले मला मनोगत त्यांचे
तोवरीच रुसणे फुगणे या जीवाचे

मुग्धता विरुनि गवसेल वाणिला वाणी
अणि अनंत हृदये होतिल एक ठिकाणी
तो योग घडुनि ज्योतीत मिळावी ज्योती
समजेल मला मग खरी जगाची प्रीती !

# पूजा

धुंदीत प्रभू राजा रे ! तुज धुंदीत प्रभू राजा
मंदिरी आले घेउनी पूजा
मूर्त तुझी नव्हती मंदिरात
पूजेचा हार हा निर्माल्य होत
माघारी येता निराश होउनी
दर्शन दिलेसी माझ्या सदनी
तेधवा प्रभू राजा—फुलांचा हार हाति न माझ्या
नको रे मजला पाडू भ्रमात
ब्रीद तुझे का हे कोठली रीत ?
नट नाटकी तू होउनी का रे
खेळ हे अजब दाविसी सारे
जीवघेणी ही मजा—मंदिरी आले घेउनी पूजा
फुलांचा हार का रुचला नाही ?
कारण तयाचे न कळे बाई
समजले प्रभू , नाहि मी भोळी
कधीच तुजला पूजा पावली
जाणिले तव गुजा—मंदिरी आले घेउनी पूजा
डहाळीडहाळीवरी फुले ती—
हारांची जेधवा डोलत होती
भ्रमररूपाने तुझीच स्वारी
चाखूनी गेली ना रस-माधुरी ?
कळला कावा तुझा—मंदिरी आले घेउनी पूजा
आता मनोमंदिरी मम येशी
हिणवीत मज " मूढ ही कैशी ! "
सदैव म्हण रे मूढ मजसी
मूढपणातच भरली प्रीती !
संशय फिटे माझा—मंदिरी आले घेउनी पूजा

## रहाटा !

कुरुङ्‌ कुरुङ्‌ कुकुंचुङ्‌ रहाटा
ऐकुनी आर्तस्वरा

शिगोशिग भरुन येत पोहरा
हा सदा गळ्याला पाश, तया ओढणे
मानिसी न त्याला गळ्यातले लोढणे
असा प्रेमरज्जुने बांधिला
वर येई झरझरा
घालिता विळखा तुज कासरा

तू तळास जाता तान्हेला होउनी
जलदेवी माता गेली पान्हावुनी
तृप्त होउनी डोलत डोलत
ओसंडत ये वरी
आम्हांला जीवन अर्पण करी

येत कुणी माउली जलास्तव
पदर खोवुनी कटी
खेचिते तुझ्या झाकल्या मुठी
चालती सारखे हात तुला ओढुनी
दे साथ तयाला गाणे तव त्यातुनी

जसा श्रमूनी घाम ढळे वर
तसे विहिरीच्या तळा
झरे बघ वाहतात झुळझुळा

# गोगलगाय

बैसूनीया कशावरी
शंखोबाची निघे स्वारी ?
गोगलगाय गोगलगाय
दोन शिंगे बिनापाय !

पेटीमधे पाठीवरी
शंखोबाची बसे स्वारी !
चाल तुझी मंद अशी
वीस फूट दर ताशी !

असा काही हिचा थाट
मागे चम्‌चम् करी वाट
अंग तुझे लोळागोळा
काय तुझ्या अंगी कळा !

शंखोबाचे छत्र वर
तेच अस्त्र, तेच घर
नाही पाय, नाही पंख
अक्कलेचा वरी शंख

नका म्हणू रे टोचूनी
गोगलगाय माझी गुणी
भयभीत जेव्हा होते
शंखामाजी ही दडते

चतुर ही असे भारी
जीवालागी जपणारी
पीळ देऊनी पोटाला
निघे आपल्या कामाला

ध्येयमार्ग आक्रमीत
गेली गेली, झाली गुप्त
शोधा बघू, जा जा थेट
चमचमणारी वाट

सापडेल तुम्हालागी
चाललीसे निजमार्गी
गोगलगाय पोटी पाय
म्हण खोटी नव्हे काय ?

# माळी-फुलमाळीण

तो – मी माळी, फुलमाळिण तू बाला
गुंफु ग सुमनांची माला !
निशिगंधाचा गंध मनोहर
ती – बकुळी त्याच्याहुनि ती सुंदर
तो – गंधे, निजगंधे करि मोहित सकलांला
मदनमस्त मोगरा कसा हा
ती – नाजुक मालति जपते देहा
तो – डोलू, चल डोलू अन् घालु गळ्यात गळा
जाइजुई आवळ्या-जावळ्या
ती – सगळ्या मुलुखाच्या ह्या भोळ्या
तो – राण्या, ह्या राण्या शोभति प्राजक्ताला
दरवळते ही इथे चमेली
ती – बोल बोलण्या सदा भुकेली
तो – वेडी, ही वेडी असलाच हिला चाळा
चाफा इकडे बोलत नाही
ती – घुम्म्या हाच सदाचा बाई
तो – योगी, तो योगी धरितो म्हणुनि अबोला
शेवंती खेड्यातिल बाला
ती – सुवर्णचाफा न मिळे हिजला
तो – ठेवी, ही ठेवी त्या झेंडूवर डोळा
गुलाबराजा बघ नवलाचा
ती – छे ग बाई, तो काट्याचा
तो – काटा, तो काटा नच लागो बोटाला
दोघे – फुलवू बगिचा, रमवू रसिका प्रेमभरे
मी माळी, फुलमाळिण तू बाला
गुंफु ग सुमनांची माला !

## तेवढेच समाधान

हृदयीची जी आस प्रियेच्या
झालि आसवे क्षणी
साठला प्रियकर नयनांतुनी !

सुटले होते तीर जेथुनी
नीर तेथ सांचले
हळुहळू गालांवरि लोटले

गुलाब कोमेजले, क्षणातचि
फुलता पडली खळी
आसवे त्यातच सामावली

ती खळी लोपता अश्रुमाळ सत्वरी
झरझरा ओसरत आली अधरांवरी
अधरांची करिता हालचाल सुंदरी
हृदय जेथ लोपले, खूण ही
पटता, अश्रुझरी
टपाटप पडते वक्षावरी !

# टाकलेले पोर

अनाथ अनाथ हिणविती तुला
देते मी हिंदोला, धीर धरी

अज्ञानाने कोणी म्हणोत अनाथ
परी तू सनाथ आता पुढे

षष्ठीपूजा आणि तुझे ते बारसे
कधी आणि कैसे कोणी केले ?

भाग्यलेख तूझा लिही षष्ठीआई
गाते मी अंगाई मोदभरे

तुझ्या बारशासी देवगण ठेला
देते मी हिंदोला, धीर धरी

अनायासे झाले तुझे ते सोहाळे
गोड तू मानिले थोर मने

खदखदा कैसे हसलास आता
मारुनिया लाथा ढोंगी जगा

निष्पाप हे तुझे वदनकमल
पाप्यासी करील पुण्यमय

टाकलेले पोर हिणविले ज्याला
कर्ण वीर झाला दानशूर

क्षात्रतेज कैसे दाविले जगती
ऐसा महारथी एकमेव

टाकलेले पोर कण्व-आश्रमात
शकुंतला ख्यात जगामाजी

कैसे मिळवीले राज्ञीचे सौभाग्य
उजळिले भाग्य भारताचे !

# मृदंग, ढोलकी आणि दुंदुभी

मृदंगः— किटितक गदिगन धा, कडान्धा कडान्धा
तिरकिट धिंग धिंग, मी मृदंग मी मृदंग
संतजन जाहले दंग माझ्या तालावरी
शीणभाग विसरले
पायी वाऱ्या करिता पंढरीसी गेले
पांडुरंगी विलीन झाले
" रखुमाई माउली ! विठ्ठला, पंढरिराया ! "

ढोलकीः— फप् फप् फडांग, फप् फप् फडांग, धरतक् तैयक्
नग्गी हुँगी, नग्गी हुँगी, अशी बोलकी
आता माझ्या सजणा, मी ढोलकी मी ढोलकी
रंगेल जन जाहले धुंद माझ्या तालावरी
शीणभाग विसरले,
फडातची नव्हे–घरी, दारी, कामावरी
गात लावणी, रसरंगी डुंबले
शृंगार-रसी विलीन जाहले
" सखये साजणी, सख्या साजणा ! "

मृदंगः— अरेरे अधोगती ! !
संतांची वचने ऐकिलीस का कधी ?
तुका म्हणे, नामा म्हणे
जनी म्हणे, मीरा कहे
बोल बोल वाचे, तुला काय त्याचे !
भजनाच्या शब्दाशब्दांवरी
ह्या मृदंगाच्या बोलांची माधुरी
नाम घेता पांडुरंग दाविला
मोक्ष मिळाला संतजनांसी

ढोलकीः— संतजनांची वचने ?
आणि माझा रामजोशी, माझा सगनभाऊ
माझा प्रभाकर, माझा होनाजी बाळ
ऐक ऐक, एकेक लावणी
ठसेल तुझ्या अंतःकरणी
ठसकेबाज छक्कड
घेईल मनाची पक्कड
एक एक छंद, बनवील तुला धुंद
मोक्ष कशाचा घेउनी बैससी ?
इष्क कसा ते पाही गबाळा !
इष्कातही ईश दिसेल तुज लपलेला

मृदंगः— धिक् धिक् त्रांधा त्रांधा
काय हा भगवंताचा अपमान !
तुझ्या नीतिमत्तेचे प्रकार
ढोलके, तुझ्या श्रोत्यांनाच विचार
तुणतुणे विचारते, कोण् कोण्
अन् ढोलके, तूच उत्तरतेस
सब् जन्—सब् जन्
झांजरी बोलते नकॅम् नकॅम्
अन् नाचत नाचत मुरके मारित
ते पात्र बोलते ' दोलात ज्यादा '
हाच तुझा लत्तामोक्ष ?

ढोलकीः— धिंगांगु धिंगांगु धिर् तक् तैयक् गिम् गाम्
आता जरा थांब
फार कणीक लागली तव घुम्या वदनाला
एव्हाना बोललासी बोल
आता ऐकविसी आडबोल !

तुझे ते वारकरी दिंड्या काढिती
गावोगावी हिंडती
कणकेच्या बाट्या, तुपात माखलेल्या
वरणावरी तुपाचा मारा
सपासप ताव मारूनी ढेकरा देत
पचनास्तव पावली टाकीत
भजन करिती
इतरांची शतपावली
ह्यांची आपली संत-पावली !
समोरी दिसता स्त्रियांचा मेळा
भजनाकडे टाळंटाळा
परनारींकडे लावूनी डोळा
नाचती, गाती, काय
" नेत्रांची वासना, तुज पहावे नारायणा "
फुकटाच्या भोजनावरी, भजनाचा हा उतार !
कसला परमार्थ ! कसला परमार्थ !

मृदंगः— कासया बोलसी संतांची वचने ?
काय अधिकार तुझा ?
" तुळशीवृंदावनी उपजला कांदा
नावडे गोविंदा काही केल्या "
ढोलके, विषयातची तुझी तुष्टी
काय करिशी परमार्थाच्या गोष्टी ?
आम्ही वारकरी पाहतो सर्वांभूती पांडुरंग
तोच आमुचे सुखाचे आगर
तोच आमुचे जीवन
तोच आमुचा स्वर्ग
तुम्ही विषयाचे किडे, त्यातची तुम्ही धुंद
जिकडे तिकडे तुम्हां विषयाचा छंद

तुम्ही कासया आठवाल पांडुरंग ?
तुमच्या लेखी काय अभंग ?
साऱ्या मुलुखाची भुलावणी
आहेच तुमची ती लावणी !

ढोलकी:— अभंग गाऊनी वदता तुम्ही
संसार असार, संसार असार
परी संसाराचे सार दाविते आमुची लावणी
लावणी म्हणजे......हृदयांतील लागण
" मनमुक्त गाउ लावणी, लहरते मनी
लावणी अंतरिची निशिदिनी. "
अशी अमुची लावणी...
मृत्युलोकी रखडुनी तुम्ही धरिता स्वर्गाची आशा
आम्ही आणितो मृत्युलोकी स्वर्ग
तुम्ही म्हणा भलेही तमाशा.
तुमचा मुमुक्षु, आमची अभिसारिका
निराकारासी कल्पनेचे रूप देउनी
मोक्षाची आशा करिती मुमुक्षु
मूर्तिमंत प्रियकराची प्राणप्रतिष्ठा करिते
आमुची अभिसारिका
किती वाट तुझी पाहू रे प्राणप्रिया ?
अभिसारिकेची तळमळ मुमुक्षुत
नाही ! नाही ! नाही !

मृदुंगः— धु किटितक गदिगन धा गदिगन धा
काय ही मुमुक्षूंची विटंबना !
ढोलके, आग लागो तव वदना
कसल्या तुझ्या त्या अभिसारिका !

कितीकांच्या वाटा पाहती, मुलुखाच्या जारिणी
श्रद्धा नाही एकावरी
सर्वाभूती बघतो पांडुरंग
आम्ही वारकरी
लुटतो आम्ही ब्रम्हानंद
भक्तीच्या दिव्य प्रकाशात
अन् तुम्हांसी तमाशाची आशा
कर्मात तुमच्या तमाशा

ढोलकी—: पुरे रे तुझे भक्तीचे अवडंबर
काय बरळतोसी पांडुरंग पांडुरंग !
टाकते मी सवाल, पहा माझा रसरंग
तुझे वारकरी, माझ्या वारनारी......

दुदुंभीः—धिक्कार तुम्हां दोघांना !
भांडता का रे बेछूट ?
चालविलात कसला काथ्याकूट ?
ओळखिले का मजला ?
शूर वीरासी देउनी चेतना
—तयासि रणांगणा नेतो
' धुम् दुडुम् धुम् दुडुम् '
ऐसा नाद दुमदुमे नभी
मी दुंदुभी, मी दुंदुभी
फुटो ती ढोलकी, तुटो तो मृदंग
माझा, माझा रणरंग आज हवा !
कल्पनेचा देव मानुनी करिसी व्यर्थ जल्पना
मृदंगा, बांध तुझ्या त्या गिरद्या
ना तरी तोडीन तटा तटा वाद्या
अन् ढोलके, बांधुनी तू कामदेवाची पूजा

करिशी येथ व्यर्थ गमजा
फाडुनी दोन्ही गालफडे
छिन्न विच्छिन्न करीन तुकडे तुकडे
तुझ्या देहाचे !
अनायासे बळी जाता, परकीयांच्या होमकुंडात
अरेरे, तुम्ही बळी
कण्हेरीच्या माळा, रुळती तुमच्या गळा
नच तुमच्या गौरवासाठी
शिरावरी मुखावरी चर्चिला गुलाल
नच तुमच्या सत्कारासाठी !
परक्यासी देता नाहक स्वताची मान
असले तुम्ही बळी
बळी व्हा, परी पिळा परक्यांचे कान
असले ‘ बळी ’ आज हवे
कसले भजन ! कसली लावणी !
पारतंत्र्याची पायी बेडी ती सोडवा आधी
पारतंत्र्यातली भजने
देवासी नच आवडती
पारतंत्र्यातल्या लावण्या
कामदेवासी नच रुचती
मृदंगा, ऐक रे संतांच्या वचना
“ तुका म्हणे रणी, पडता लाभ घडे दूणी ! ”
अन् ढोलके, तूही ध्यानी धरी
“ शृंगाराला दूर सारी, वीररसाते अंगिकारी ! ”

वि: काव्य
२४/१२/६८

## चुकल्या रे प्रीतीच्या वाटा

चुकल्या रे प्रीतीच्या वाटा

नेत्रांचा नीलिमा, ओठांची लाली
चांफेकळी नाक, गुलाब गाली
दिसेना जोवरी अंचलाखाली—हृदयसिंधूच्या लाटा

नेत्रींचे कटाक्ष, गालींचे हासू
येवो ओठांतूनीया खुसु खुसू
उडोत मोरण्या, लागोत रुसू—अंतरी अग्नीचा साठा

अमोल हृदय–गाभा सोडुनी
फोलकटासाठी झुरती मनी
बैसले करंटे बघा सावरूनी—पंचपक्वान्नांच्या ताटा

भृंग झुले बघोनिया कण्हेरी
कमालिनी भुले मंडुकावरी
विपरीत ऐशी रीत जोवरी—फिर माघारी सैराटा !

संकेताची स्थळे विसरूनीया
संशयाच्या वाटा गेले चालाया
अभिसारिकाही तिष्ठती वाया—अहा रे प्रीतीसम्राटा ( ! )

प्रीतीच्या पाठीशी दडली भीती
जोवरी वाटे रे प्राणाची क्षिती
पांगली पाऊले, धपापे छाती—आणिक अंगी ये काटा

वसवीता उद्याने वाळवंटी
जीवाची करोनीया आटाआटी
आहेत अखेरी तुमच्यासाठी—उसासे मग ललाटा !

# विस्मृतीतील स्मृती

विसरु मी तुला कसे ?
स्मरणातहि विसर म्हणसि
अंतरिचे मूक बोल
झाले प्रगटूनि मोल
बसले जाऊनि खोल
दिसतिल तुज अजुनि पहा, उमटले हृदी ठसे

विस्मृतीत आठवती
साठवल्या गोड स्मृती
विसरू रे तुजसि किती ?
उगिच सख्या होइल ना दिव्य प्रीतिचे हसे

विस्मृतीतल्या स्मरणा
अनुभवीत मी रमणा !
बघ दिसते हृन्नयना
विस्मृतिच्या सागरात स्मृतिनौका डोलतसे

धुंद अशा विस्मृतीत
तेवतसे प्रणय--ज्योत
आणि दिसे त्यात मूर्त
चिर-सहवासासदनी, विरह ये तुझ्या मिषे

मजजवळी माझे सुख
कालविशी काय वीख
होसि अता हो विन्मुख
तू जसा दुरावशील, लाविशील मज पिसे

## पथ चुकू नको रे !

पथ चुकू नको रे मुशाफिरा !
गमत तुझी चाहूल जणू ती
कर्णफुले मम श्रवणी डुलती
कंठि भासमय मौक्तिक रुळती
तव श्वास एक मम ध्यास खरा
पण चुकू नको रे मुशाफिरा !
दिसतिल अजुनी तुझिया नयनां
तव चरणांच्या उमटल्या खुणा
तुझ्या तूच रे ओळखशिल ना ?
त्या शोधित ये प्रीतिमंदिरा
पथ चुकू नको रे मुशाफिरा !
ये रे कापित आतां झरझर
तुझ्या नि माझ्या मधले अंतर
तूं वादी, मी संवादी स्वर
आसवली वीणा छेड जरा
पथ चुकू नको रे मुशाफिरा !
आठवीत विरलेली स्वप्ने
आळवीत हृदयीची कवने
चाळवीत विरहा विरहाने
ये हासत ये धीरगंभिरा
पथ चुकू नको रे मुशाफिरा !
धुंडु कशाला श्रेयासाठी ?
प्रिया, तुझ्यास्तव आटाआटी
श्रेय प्रेय मम तुझ्याच गाठी
गवसेल आयते, करी त्वरा
पथ चुकू नको रे मुशाफिरा !

# ताजमहाल

कुणि म्हणेल शिल्पी होउनिया बेहोष
हा मूर्त शिल्पशास्त्राचा पूर्ण विकास

कुणि म्हणेल घेऊनि क्रांति-ध्वज कविवर्य
गरिबांच्या रक्तावरले हे आश्चर्य

कुणि म्हणेल साध्वी हेच जगातिल एक
पत्नीचे ? छे, आदर्श पतीचे प्रतिक

कुणि म्हणेल भोगी मनात बनुनी चाट
भाग्यवान बेटा शहाजहाँ सम्राट

कुणि म्हणेल योगी उजळित ब्रह्मज्ञान
सत्कार शवाचा, आत्म्याचा अपमान

भामिनी विराजत असतिल भुवनी आज
कुणि सौंदर्याच्या प्रीतीमय मुमताज

मूर्तिमंत असले भरल्या नेत्रि पहाल
चालते बोलते सुंदर ताजमहाल !

# माझी नवलाची होडी

माझी नवलाची होडी कशी—
चालली रे राजा माझी नवलाची !

वल्हव वल्हव आता बिगीनं
येईल वादळ ते सोसाट्यानं
सुटेल ताल
जाईल झोल
अशी डौलात जाऊ दे जरा
होडी माझी नवलाची

वरती आभाळ, खालती पाणी
मधेच डुलतात राजा-राणी
राजा सम्राट
असा राणीचा थाट
माझ्या सिंहासनावर राजी
होडी माझी नवलाची

मंदावला आता खट्याळ वारा
दिसतो पल्याड खाडी किनारा
हळूहळू
पुढे वळू
पुरे पुरे ग, थोड्यात गोडी !
होडी माझी नवलाची !

## पाह्यलं ग दारी

पाह्यलं ग दारी का हसूनि खुदकन् तरी ?

काल दुपारी विहिरीवरी
होती एकटी तू सामुरी
पाणी प्याया आलो परी

तोच सुकुमारी
पाण्याची चरवी
तुझिया करवी
पडली धरणीवरी

गावरानिच्या आम्राइत
पिकला आंबा तू चाखित
पहात होतिस ना जम्मत ?

फिरुनि माघारी
आंब्याचा सगळा
रस ओघळला
तुझिया पदरावरी
बसलो होतो वरुळीवरी †

आभाळ वरती गडबड करी
पाउस आला सरिवर सरी

चमचमणारी
ती वरची बिजली
तूच भासली
मजला सगरीवरी $

... .................... ............ ...

† टीप :—शेताच्या कोपऱ्यावर माती टाकून केलेली छोटीशी टेकडी.

$ टीप :—पायरस्त्यावर

परवा येइल पोळा सण
आणिन परधान्या सजवुन
मुळिही येऊ नको गे पण

पुढल्या दारी
मी येइन मागुन
हळूच सांगिन
गुपित तुला सुंदरी

होइल ना मग व्हावे तसे
ना तरी होइल माझे हसे
त्यातुनी शेजारी हे असे

संशयी भारी
का मन बावरते ?
खळखळ उडते
सखये हृदयांतरी !

## मोऱ्याची बल्हारी

माझ्या मोऱ्याचो काय सांगू बल्हारी !
घरच्या गायचा पहिला गोऱ्हा
याचा मायसरका चेहरा
शिंगायचीबी तशीच तऱ्हा
डोये भरीसन पहाय जरा, थाट सरदारी

आताशीक गेलसालि नाथला
दोन रोज कहनाले जूपला
गाडीले चटकन् तयार झाला
असा गुनी हा लाल मियाला, चनूका भारी

कामामधी तर हा अवकायी
पयाच्या बाबे बाका लई
आगीनगाडीले बदनार नही
तऱ्हाच याची सम्दी नयी, दूडकी मारी

धन्यासाठी तर कायिज तुटे
चाहुल येता माही कुठे
चटकन् आंधी मोऱ्या उठे
भवति पाहतो आठे तठे, कान टवकारी

हांबा हांबा दे ललकारी
दररोज माले जाग करी
म्हने, करीसन घ्या न्याहरी
चाला हो मालक शेतावरी, रामपहारी

असा लाडका माझा हिरा
कोनाची नजर न लागो जरा
पायाले बांधला गंडादोरा
आउक्ष देवो, पिकवो चारा सदा शिरिहारी !

## माझे बालपण गाते

माझ्या जन्मगावातील
हृदयीची सांठवण
तिच्यातली आज एक
झाली मज आठवण

इथे हासता खेळता
घडे ज्ञान—सहवास
इथे अनायासे झाला
आभासातुनी अभ्यास

मागाहूनी समजते
झालो आम्ही मनी चाट
इथे देखिले लेखक
आणि ' साहित्य सम्राट '

राजपथाच्या कडेला
केळकरांच्या अंगणीं
अजूनी तो उभी चिंच
' खेळ·करांची ' निशाणी

तिच्या छायेखाली आम्ही
किती खेळलोसे खेळ
तिच्या अंगाखांद्यावरी
बागडलो किती वेळ !

अजूनहि डोळ्यांपुढे
तिच्या फांद्या नी डहाळ्या
आणि डहाळीवरल्या
तिच्या चिंचाही गाभुळ्या

गाभूळली माझी जीभ
सर्व चवी गेल्या दुरी
चिंचेनेच पटविली
आंबटातली माधुरी

सुटे तोंडालागी पाणी
याच चिंचेच्या सिंचने
माझे बालपण गाते
ओल्या शब्दांतले गाणे

# तुझा एक एक शब्द

तेव्हा नाही केले आई
तुझ्या शब्दांचे मी मोल
तेव्हा कुठूनी असावे
अज्ञानाला ज्ञानबल !

तुझे शब्द साधेभोळे
झाले मुखीच साकार
सामावले, काही गेले
काळजाच्या आरपार !

तुझा एक एक शब्द
वृक्षापरी फलदायी
अनायासे माझ्या हाती
आले थोडे फार, काही

शब्द गेले सुकोनिया
झाला त्यांचा सुका मेवा
चघळीत बैसतो मी
तोच वाटे मला ठेवा

त्यांची चवी चाखताना
स्फूर्ती येते नवनवी
तुझ्या कृपाप्रसादाने
मिरवितो आज कवी !

## विस्मृतीला जाग आली

नसताना ध्यानीमनी
अवचित भेट झाली
तिच्या नेत्रपल्लवीने
विस्मृतीला जाग आली

तिच्या पापणी–पंखात
तीच किमया संचरे
तीच होती नयनांत
दोन तेजाची पाखरे

भुवयांच्या कमानीत
होते प्रणयाचे झेले
आता पापण्यांखालती
वात्सल्याने घर केले

केशसंभार बोलका
झाला जरासा अबोल
परी भ्रमरांचा थवा
गेला सांगूनिया मोल !

उलटता दीर्घकाल
भाव फक्त एक उणा
नियतीने तोच हळू
सांगीतला पोक्तपणा

' आयुष्याची वाढ होणे–
त्यात काय लाज आहे ? '
तोंच ओठांनी दावीले
हास्य तेच आज आहे !

अनु. क्र. ५००१८ वि: काव्य
क्र. १५५१

# नयन-तरंग

या नयनांच्या झापण्या
उघडतात पापण्या दर्शनासाठी
रूपाची करूनी साठवणी
पापण्या मिटतात चिंतनासाठी

डोळ्यांना दिसते ते
डोळ्यांतून येणाऱ्या
आसवांना दिसत नाही
परंतु आसवांना दिसले ते
डोळ्यांना दिसता दिसत नाही

ज्या डोळ्यांतून तीर सुटले
तिथेच आता नीर दाटले
विरहास कळले प्रणयाचे नाते
डोळ्यातली बाहुली
आसवात न्हाते

भावना रंगतात
कल्पना तरंगतात
कामना हळहळतात
यातना विव्हळतात

भावभावना, कल्पकल्पना
आशाआकांक्षा, विषाद सारे
उपनिषदांत सामावले खरे !
परंतु वेदना ! वेदनांच्या कळा !

अहो, वेदनांना जे कळते
ते वेदांनाही कळले नसावे ! !

# अबोल वीणे

लाभे मला गोड गळा
परी माझीं मला चोरी
गाणे गाऊ तरी कसे ?
घरी संगीताचे वैरी

पडलेली कोपऱ्यात
वीणा माझी धूळ खात
परी शिकविते मज
रोज जीवन-संगीत !

ताप—शाप साहुनीया
कालियासी आदरीले
त्याच्या फूत्कारात वीणे
नाद तूच ऐकवीले

आसवांच्या यमुनेत
नंदनंदन पाहिला
राग-जीवन जोगिया
रामप्रहरी गायिला

आरोह नी अवरोह
जीव होता खालीवरी
आशानिराशा सूरात
आळवीली आसावरी

जीवनाच्या त्या दुपारी
तापताना अंग अंग
मनोभावे गायीला मी
माझा ' संसार-सारंग '

वीणे, छेडावे मी तुला
परी उलटीच तऱ्हा
सखे, तूच छेडीशी की
माझ्या हृदयीच्या तारा!

संगीतातील संगती
जीवनाला दे उजाळा
आता जीवन-संगीत
मीच शिकवीन मला

वत्सल मी, वत्सलता–
आले गोकुळ घरी या
जीवनाची सायंकाळ
आळवील तो पूरिया

होईल ती कधी होवो
जीवनाची या भैरवी
परिणाम तो गोड व्हावा
ह्या जवळी तू हवी!

# आल्या पावसाच्या सरी

‘ धिक् क्डांधा तिक क्डांधा धीं धीं धीं ’
मेघ मृदुंग करी
नाचत वाऱ्यासंगे आल्या पाण्याच्या हो सरी ॥ ध्रु० ॥

मेघांनी गेलं हो आभाळ भरून
हासत वरूनी बघतो वरूण
चमक चमक भिजली तेजानं बिजली मुरके मारी हो १

ओलावल्या आशा, ओलावले मन
सुकेपणा गेला थबथबून
भिजली शिवारं, भिजली पठारं, भिजल्या डोंगरदरी हो २

चिंब ओलेपण वाहू लागले
वाहती नद्या नि वाहती नाले
वाहत वाहत नाहत चालला आनंद उसळ्या मारी हो ३

ओल्या नभाचा हा मंडप ओला
मृगाचा मुहूर्त इथे आगळा
ये जरा भानात, सांगतो कानांत कोण नोवरा नोवरी हो ४

पवनरायाची सनई वाजे
बिजली-मेघांचा चौघडा गाजे
निमंत्रणे हीच झालीत पाहुणे, तऱ्हाच इथली न्यारी हो ५

विधाता रंगला मंगलाष्टकी
वरूण गारांच्या अक्षता टाकी
पाण्याचं लागलं मातीशी लगीन, माझी ही पानसुपारी हो ६

## नाविक गीत

धुंद दिशा चोहीकडे
तुफानाला नशा चढे
जाऊ दे रे होडी पुढे नाखवा !
दम छाटी पाल ओढ
मीही उभारितो शिड
हाणजोर ताण दोर हाइयो हाइयो !

झणकत वारंवार श्रृंखला झणकार
हे तर होडीचेच करुण पुकार !
तुटे न बंधन, अंतरी क्रंदन
होडी माझी तूच सांभाळ रे
हाणजोर ताण दोर हाइयो हाइयो !

दिन दिन क्षण क्षण चंचल करी मन
शंकित जाऊ की न जाऊ रे
संशयसागर अंतरी होई पार
उद्वेग का मग मनी रे ?
जरी माजे महाकाल उद्दाम जटाजाल
निर्भयता तुज देत दिव्यबल
काय तमा मग मत्त सिंधुची
धुंद गीत तूं गाई रे
हाणजोर ताण दोर हाइयो हाइयो !

धुंद दिशा चोहीकडे
तुफानाला नशा चढे
जाऊ दे रे होडी पुढे नाखवा !

( रवींद्र अनुवाद )

# नयन तुझे

नयन तुझे सांगतात
        गाइ गोड गाणे
वरचेवर वरचेवर नयन तुझे सांगतात
प्रकाश आणि अंधकार
दिवसरजनीचे अंतर
उभयांच्या सीमेवर
फुलाफुलांत गूज कळे
        मजसि इशाऱ्याने
        काय तुला विदित न का ?
        काय कथू आकुलता ?
        लोपली व्यथेत कथा
विरले स्वर, उरले रे भ्रांतिचे तराणे
हाक येत नौकेतुन
झड तुफान मेघांतुन
त्या गंभीर स्रोतातुन
साद देत मरणाला श्रावणी झडीने
येथ उभा नदिकाठी
तिष्ठत रे तुजसाठी
तुजकडेच नित्य दिठी
पथ हा तव जात कुठे ? कुठे कोण जाणे !
साद देत असिम नभा
बघण्या तव दिव्य प्रभा
एकटाच येथ उभा
बघत वाट लोटलि रे
        अयनावरि अयने !

( रवींद्र अनुवाद )

## दीनानाथ

धन्य तुझी हातवटी, धन्य तुझा हात !
पापणी–केसांच्या
कुंचलीत भरती रंग
साठविलेले हृदयातले
उठती करांतुन भावतरंग
अडला नच कलावंत हा
रंग-छटांची ओळख व्हाया
रंगत येती धावत पुढे
चित्रकारासी या भेटाया
छटा छटा त्या नटमोगऱ्या
देती त्यांना साथ
दीनानाथ दीनानाथ
हृद्य तुझी हातवटी, हृद्य तुझा हात ! १

रेखाटिता रेखांकिता
होते सहजची कलाकृती
प्रतिभा-कल्पना युतीसह
प्रगटे फलकावर आकृती !
रंग अबोलहि बोलले
भाषा ती रंग पल्लवी
बोल फुटले दर्शनाला
होते कविता सुंदर नवी
रंगगीत गातो मी
मुक्त रंग छंदात
दीनानाथ दीनानाथ
अजब तुझी हातवटी, अजब तुझा हात ! २

खुलास छायाप्रकाशाला
विलास रंग छटांचा वरी
आणि मधेच ' उच्च उजाळा '
अवघ्यांवरती मात करी
पडत असावी रंगस्वप्ने
स्वप्नरंगातचि रंगुनी
नवनवी भावदर्शने
घडत असावी जागेपणी
जागवीत रम्यत्वे
नित्य करी बरसात
दीनानाथ दीनानाथ
रम्य तुझी हातवटी, रम्य तुझा हात ! २

## आली कुठूनशी

आली कुठूनशी कानी
टाळ मृदुंगाची धून
नाद विठ्ठल विठ्ठल
उठे रोम-रोमांतुन १

नभी तेजात नाहली
चंद्रप्रभा चंद्रायणी
बोले शब्दावीण काही
चंद्रासवे इंद्रायणी २

इंद्रायणीच्या पाण्यात
शहारले अंग अंग
मन झाले ओलेचिंब
जैसे भिजले अभंग ३

वृक्ष दिसला सामोरी
काय सांगू त्याची शोभा
जसे कटीवरी हात
युगे अठ्ठावीस उभा ४

मूक नयनांची सरे
मूक वाचा ये रंगात
माझा देह झाला देहू
तुकयाच्या अभंगांत ! ५

## लोककाव्याची अलौकिकता

काव्यसंपदा कुणाची ?
इथे नाही नावगाव
इथे सारे अनामिक
उरे मनातला भाव !

जीव झालासे जिव्हाळा
जीवाभावाची ही युती
श्रेय होत येथे मुके
आणि बोले अनुभूती

इथे नच संमेलने
संमीलनी एक होती
निमंत्रणावाचूनिया
मनोवृत्ती धाव घेती

श्रुतीस्मृतींची पाखरे
अहो, उडत उडत
येती सांगावया त्वरे
आभाळाचे मनोगत

वीणा नादता अंतरी
झाल्या संगीताच्या कळा
घाम गाळीता गाळीता
सामवेद आळवीला

इथे ॲँकार हुंकार
एकमेका साद देती
अंगावरले रोमांच
अभिप्राय सांगताती

श्वासांचेही होती शब्द
शब्द दाटले कवनी
इथे राहते बाजूला
शाई, कागद, लेखणी !

## मुठामाउली म्हणे

माझेच जीवन
        माझाच विलय
माझेच पाणी
        माझाच प्रलय
माझाच पूर
        माझेच काठ
माझेच दात
        माझेच ओठ
गेले सर्वस्वही त्या दिवशी
वाहुन गेल्या वस्तु-वास्तु
जलप्रलयाच्या शांतीनंतर
मुठामाऊली म्हणे ' तथास्तु '
वाहत जाणे माझि धारणा
मला अडविणे तुमचे धोरण
मीच असे परिणाम खरोखर
पानशेत हे नुसते कारण !
जलासुराच्या या प्रलयाने
झाल्या तुमच्या वाताहाती
एवढेच सांगाया आली
पानशेतची ओली माती
पुण्यपुरीच्या मम वत्सांनो
धैर्यवंत तुम्ही स्वाभिमानी
सगळे काही गेले वाहून
परि अस्मिता असे ठिकाणी
असे विधीचा नियम एकदा
रचलेले ते खचले जाणे
जिद्द मनीची कशी खचावी

रचाल तुम्ही नव्या दमाने
रचा रचा रे उत्साहाने
तुम्हीच रचनाकार उद्याचे
स्थापत्यादी शास्त्रांचे अन्
जाणकार सकला विद्यांचे

वाग्देवी आशीर्वच देई
अपुल्या वीणाझंकाराने
दीर्घायूची साद देतसे
ॐकारेश्वर हुंकाराने !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ दि: ......................
क्रमांक ........................ नोंद दि: ......................

## प्रवासातील सहवास

झुक् झुक् बोली बोलत होती
        आगिनगाडी चालत होती
तोच समोरी दरवाजावर
नजर जराशी माझी वळली
कुणी एक निष्पाप बालिका
पुष्पासम तेथे दरवळली
मुग्धपणाला फुटली वाचा
गोड गीत मग गाउ लागली
मित्रमंडळी डोलत होती
        आगिनगाडी चालत होती

प्रवासातल्या सहवासासह
सभोवती वनराई डोले
मंत्रमुग्ध वातावरणातुन
यंत्रही बेटे रंगुन गेले
अशी रंगता ही नवलाई
वनराईतुन ती वनराणी
मैफल अमुची तोलत होती
        आगिनगाडी चालत होती

दृश्य असे साठता अंतरी
हृदयातुन जे आले अधरी
स्वरावरी चालल्या तरंगत
गोड गोड काव्याच्या लहरी
भाव-भावना त्या हृदयातिल
पडदे पडदे खोलीत होती
झुक् झुक् बोली बोलत होती
        आगिनगाडी चालत होती !

## महानिर्याण

महातेजाचे प्रतीक
तेजाळता मंदावले
मंदावता निमाले
त्रिखंड धुंडुन आलेल्या
शांतिदूताचे पाय थंडावले

नियतीचा निसर्गही हबकला
मृत्युराज देखील थबकला
जवाहरलाल ! जवाहरलाल !
मृत्यूचे अमर डोळेही देऊन ताण
बघत होते खिन्नपणे
भारताच्या—नव्हे जगताच्या
प्राणाचे महानिर्याण !

भक्तिभावाने बद्ध झालेली
श्रद्धेय अंतःकरणे
बुडाली शोकसागरात
गहिवरले यमुनेचे तीर
उठे निनाद धीरगंभीर

' सत्य अहिंसेच्या घरी
विश्वशांती आली
या शांतीघाटावर
जिवाशिवाची भेट झाली ! '

## कसे घडते !

चाफा देखील डोलला
जाई मात्र बोलत नाही
अबोली देखील बोलली
मोगरा मात्र बोलत नाही
कसे घडते, कळत नाही

दगड देखील तरंगले
भावनेला तरंग नाही
पान मुखी रंगले
मन काही रंगत नाही

अन्नावाचून अन्नपूर्णा
दिव्यावाचून दीपावली
जयावाचून विजयादशमी
मरणे जवळ, जिंकणे दूर
असेच दिसती आमुचे नूर !

तेवत्यामधे तेज नाही
अंगामधे चेव नाही
कसे घडते, कळत नाही
पुजारी आहेत, देव नाही !

# उभविली मनोराज्ये

झाली सुखदु:खांची देवघेव
दु:खातचि सुख फसले गेले
रक्त आणि अश्रूंचे सख्खे नाते
पोटाच्या जात्यातच पिसले गेले
उभविली मनोराज्ये जागेपणी !
मनातले मनातच राहून गेले
जाता मृगजळ गंगा तरावया
खऱ्या ओढ्यातच वाहून गेले
सुखदु:खांच्या ऊनसावलीत
चट्टेच बहुधा आम्ही साहिले
अहो, काहीतरी यावे हाती
घट्टेच तेवढे शिल्लक राहिले
सीमोल्लंघन, नव्हे सीमारक्षण
विजय सिद्ध हस्तांत आहे
तरीपण खेद खंतावला
विजयश्री गुलदस्तात आहे
आहोत जागे की स्वप्नामाजी ?
उलटीच गंगा वाहते आहे
जलवंतीही जाहली तान्हेली
अन्नपूर्णा भुकेली राहते आहे !

# गाण्याची मैफल

अहो, वारा जरी भिण भिण करीत
वाहून गेला, ओसरून गेला
तरी वृक्षाचा डोल
राहूनच जातो

रिम्‌झिम् पाऊस पडून गेला
भूमीवर पाणी लोळून गेले
तरी भूमीची ओल
राहूनच जाते

तशीच ती गाण्याची मैफल !
ते धुंद वातावरण
ती तल्लीनता !

मैफल सरली तरी
रसिक श्रोत्यांची तंद्री
राहूनच जाते
अशी गाण्याची मैफल !

## आल्या लहरी

आल्या लहरी, गेल्या लहरी !
लहरत येणाऱ्या, लहरीत जाणाऱ्या
आल्या लहरी, गेल्या लहरी !

पवनासंगे नाचणाऱ्या
जलाशयात हासणाऱ्या
स्वैरपणे येणाऱ्या
आपसुक जाणाऱ्या
रानोरानी, गिरिकंदरी
आल्या लहरी, गेल्या लहरी !

मनामनात शिरलेल्या
विहरता सरलेल्या
हृदयात स्फुरलेल्या
हृदयातच विरलेल्या
हुरहुरल्या नभांतरी
आल्या लहरी, गेल्या लहरी !

नादब्रह्मी भरणाऱ्या
रसिकांना भारणाऱ्या
भक्तांना तारणाऱ्या
देवत्वाला हेरणाऱ्या
हरिनामाच्या गजरी
आल्या लहरी, गेल्या लहरी !

## पाऊस काही पडेना

पाऊस काही पडेना
पाऊस काही पडेना
धरणीने धरणे धरले
आभाळी आबाळ झाली
वरुणराज करुण बनले
विजेला तर नीज आली
आभाळात कडकडेना
पाऊस काही पडेना
पाऊस काही पडेना १

सूर्यालाही थकवा आला
वाऱ्याला तर लकवा झाला
उन्हाचा तर पान्हा आटला
ढगांनाही रोग आला
गडगड म्हणता गडगडेना
पाऊस काही पडेना
पाऊस काही पडेना २

मी आपला एक दगड
जीवन मला आहे रगड
पड किंवा नको पडू
माझे काहीच अडेना
पाऊस काही पडेना
पाऊस काही पडेना ३

# रंगलिपीतला श्रीरंग

रंग जमले आभाळात
रंगाही पलिकडचे काही
छटा छटा त्यात किती
याची मुळी गणती नाही
मिसळले कुठल्या कुठे !
रंगांची और लपाछपी
मीही बरकंदाज बाका
शोधिली मी रंगलिपी
त्याच रंगलिपीतुनी
दिसती उठली रंगाक्षरे
अक्षरांचे झाले शब्द
हृदयीचे अब्द संचरे
धुंदीतच लागला मला
रंगवाचनाचा तो छंद
हृदय जाहले गगन
गगनी मावेना आनंद
म्हणा वेडा वा खुळा
माझ्यातच मी झालो दंग
अनंत रंग रंगविणारा
मज दिसला हो श्रीरंग !

# सगळे काही जवळ आले

सगळे काही जवळ आले
पायांवाचून प्रवास घडले
पंचमहाभूतांची इतकी जवळीक !
दूर करता करवत नाही
त्यांच्या जवळ आम्ही
आम्हां जवळ ते !
माणसाला त्याविना राहावत नाही—सगळे काही जवळ आले !

विमानाने साती समुद्र ओलांडता
पंखांवाचून उड्डाण झाले
रेडिओने आकाशपाताळ एक करून
घरच्या घरी ज्ञान विज्ञान दिले—सगळे काही जवळ आले !

रॉकेट—स्पुटनिकांचा संचार
ग्रहगोलांवर टपला आहे
चंद्र तर आता जवळ आला
खरोखरच इतका की
निंबोणीच्या झाडाआड लपला आहे—सगळे काही जवळ आले !

राडारच्या दिव्य चक्षुने
विश्वगोल पापणीत भरला
मातीत जन्मलेल्या मस्तीच्या
अण्वस्त्राने विनाशकालही
जवळ आलाच—सगळे काही जवळ आले !

सिद्धी जवळ आली खरी !
परंतु श्रद्धा मात्र दूर दूर पळाली—
माणसाने माणसाला दूर केले
आपणच आपणाला दूर केले
बाकी सगळे काही जवळ आले ! सगळे काही जवळ आले !

## वैयक्तिक जीवनी

नका धरू रे भलतिच आढी
वैयक्तिक जीवनी
उजळित ज्योत्स्ना अवनीवरती
स्थिराचराची घेत चुंबने
देत दिगंताला आलिंगन
म्हणू नका पापिणी !
तिजला म्हणू नका पापिणी !
प्रकाश गिळुनी रात्र काजळी
बांधितसे दुनियेच्या नजरा
आणित गुंगी निद्रायोगे
म्हणू नका शंखिणी
तिजला म्हणू नका शंखिणी
कितिक भूपती आले गेले
भोगुनिया भूवैभव लोकी
तरी धरित्री एकनिष्ठ ही
म्हणू नका जारिणी
तिजला म्हणू नका जारिणी !
अखंड वाहे ती बघ सरिता
मालिन्याते निर्मल करुनी
कशी अमंगल? ती तर वेड्या
मांगल्याची खनी
काव्यरसाचे दे भरभरुनी
म्हणोत कोणी मादक प्याले
रसिक गुंगती कवितेने जरि
म्हणू नका वारुणी
तिजला म्हणू नका वारुणी
नका धरू रे भलतिच आढी वैयक्तिक जीवनी

## तुझा आशय

तुझ्या या आशयात
अनुभूतीचा संचय हवा
संचयात आत्मपरिचय हवा
नाविन्याची आस हवी
अनुदानाची कास हवी
तुझा आशय तुझ्यासाठी ?
तुला तरी कुठे कळतो !
तुझा आशय इतरांना
समजायला हवा
समजून उमजायला हवा
आशयवंत महाशया !
बोलायचे ते असे बोल
सर्वांनी ऐकायलाच हवे
असे अश्रु ढाळ की
इतरांनी ढाळायलाच हवे
निजलेले जागे होतील
विझलेले पेट घेतील
रडलेले हसू लागतील
पडलेले चढू लागतील
आणि मग— शब्दच काय !
नुसते श्वास निघाले तरी
विश्वास संपादन करतील
तेच शब्द बनतील
शब्दांचा जन्मच मुळी
कृतींना अमर करण्यासाठी !

# वठलेला वृक्ष

वठलेला वृक्ष याला
वठलेला बोलू नका
पानाफळांची गणिते
बोलण्याने तोलू नका

ह्याच्या जीर्ण बुंध्यावरी
डिऱ्या पूर्ण टरारल्या
आणि फुलाफळांतुनी
किती राई फळा आल्या !

वठलेला वृक्ष तुम्हां
दिसे जरी हा भकास
इथे आहे दडलेला
वठण्याचा इतिहास !

अहो नटणे क्षणिक
ह्यात गाजावाजा आहे
इथे नटण्याहुनीही
वठण्यात मजा आहे

वठण्याचे हे गुपित
देत जीवनी जागृती
वठलेला वृक्ष मज
आणी वठणीवरती !

## या वटवृक्षाला

या वटवृक्षाला खिळल्या जागी सारे काही कळते
श्रमिकांचे गाऱ्हाणे
प्रेमिकांचे बहाणे
गावातल्या घडामोडी
पंचक्रोशीतल्या घरफोडी
खजिनदार, त्यांचे खजीने
चांदण्यासकट चोरांची मने
खिळल्या जागी या वटवृक्षाला सारे काही कळते

गबरांचे दडले साठे
गरिबांची भुकेली पोटे
जी सुखे दुःखावली
जी दुःखे सुखावली
त्या सर्वांच्या ऊनसाउली
उसासे, दिलासे
पथिकांचे प्रवास-सहवास
पथावरील खाचाखोचा
मनातील आशा-अभिलाषा
या वटवृक्षाला खिळल्या जागी सारे काही कळते

पानापानांतून कानाकानांत
पवनसखा देत असतो
दूरदूरचे संदेश, आदेश
सूर्यकिरणे—चंद्रकिरणे सांगती
आकाश-तारांगणांचे मनोगत !
रात्री खातो चंद्रलोकीची हवा
दिवसा जातो गभस्तीच्या गात्रा खिळल्या जागी
अखिल जगातील या वटवृक्षाला सारे काही कळते !

# घरभरणी

घरभरणी झाली नांदतसे मंगलता
या भरल्या गेही रडू नको रे आता
चवताळुन आल्या जरी आपदा कोणी
शरमिंध्या होउन जातिल ह्या परतोनी
चालली निराशा शोधित दूर निवारा
ते तुझे उसासे बनतिल सुगंध-वारा
दु:खांचे डोंगर तुला रमविण्यासाठी
बघ विलीन होतिल हिमाचलाच्या पोटी
बनतील करुण किंकाळ्या मंजुळ गाणी
अश्रूही निमतील गंगा-यमुनेमधुनी
चल सुरू जाहली स्वातंत्र्याची गीता
या भरल्या गेही रडू नको रे आता !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
............... दि: ....................

## जाते

कोंबडा आरवण्याच्या आधी
लागलेली ती श्रवणसमाधी
आली कानावर, जात्याची घरघर
घरघरीतही नादब्रह्म भरलेले !
ह्या नादातच गायिलेल्या गोड ओव्या
अजूनही कानात घुमती
हृदयाचा ठाव घेती
कष्टाला जिव्हाळ्याने भागिले
दळिता, कांडिता, काम करिता
घाम गाळुनी त्यातून साम निर्मिला
हातांच्या कष्टांना—
हृदयाच्या गोष्टी उमगल्या
कवित्व स्फुरले, कल्पना, उपमा
दासदासीपरी धावून आल्या
यमके हात जोडून उभी राहिली
जात्याची घरघर—
त्या घरघरीच्या साथीवर
आयाबहिणींनी गायिलेल्या
जीवाभावाच्या मंगल ओव्या
जात्यासवेच सती जाऊन
अमर ज हल्या
कष्ट साहिले, हृद्‌गत वाहिले
गाणी गेली, कान राहिल !

## नक्षीदार कविता

काढीत गळ्यातुन
संगीताचा कशिदा
पापण्या नयन–
तबल्यावरि देती ठेका
अन् मादकतेचा
सडा शिंपिला मस्त
विरहांकित विरल्या
रांगोळ्या त्या देखा
अनुराग मखमली
राग तुझा पोलादी
खेचीत बघा
लवचिक प्रीतीचे चाप
आपुल्या मनोमय
मीलन मखरामाजी
उभवीत मदन तो
प्रणयाची महिराप !
हुसकीत भावना
ये जरतारी वात
रेशमी जांभया
देत मखमली बाला
अन् जरा लोटता
वेलबुटीचा देह
स्वप्नांची झालर
सोनेरी निद्रेला

अन् निद्रेच्या
        किनखापी गुंगीत
शिरशिरीत आतुन
        उडती प्रीत–फवारे
कर्वती कल्पना
        क्षणात कापी जीव
हृदयास बोचती
        विरहाचे कंगोरे !

# विशेषातही शेष मागे उरे

इथे कल्पना, भावना या क्षणार्धात
आल्या उडोनी विहंगांपरी
महाभाग आचार्य अत्रेंवरी त्या
बघा वर्षती अमृताच्या सरी
साहित्यसेवा, कलोपासना आणि
व्यक्तित्व भारून टाकी मने
इथे भावभक्तीत व्यक्तीहुनीही
अहो, शक्तिला आज ही वन्दने ! १

इथे लेखणी होउनी उन्मनीही
प्रसंगावधानी सदा राहते
जनांलागी कर्तृत्व दावीत दावीत
वक्तृत्व कालिंदि फोफावते
इथे साहुनी संकटांना, स्वतः जीवही
लोकसेवेस तो वाहिला
विनोदातुनी येत धादान्त त्यातून
वेदान्त येथे उभा राहिला ! २

तरंगावली होत लाटा घडीला
उड्या घेत खाली प्रपातापरी
कधी शांत गंभीर गंगोदकाशी
स्वतः दंग होउनि स्पर्धा करी
कधी होत वाऱ्यावरीचे फवारे
कधी उंच उत्स्फूर्त कारंजसे
जसा श्वास हा पूर्ण विश्वास होई
तसा आत्मविश्वास चित्ती वसे ! ३

इथे दुःखही देत सौख्यास टाळी
क्षणी वैरही होत स्नेहापरी
तदा आपदा खद्‌खदा हासुनीया
सदा जाति त्या आपुलाल्या घरी !
जगातील अन्याय आणि जुलूमा
इथे मात्र नाही मुळीही क्षमा
खलांच्या अशा नित्य निर्दालनाला
नसे ठेवियेली कुणाची तमा ! ४

अज्ञात जे राहिले हो दडूनी
तयासीही उंचाविले हो नभा !
निराकार जे त्यासि आकार देता
इथे फोडिल्या फत्तरांना जिभा !
महाभाग, या आपुल्या सद्‌यशाचे
इथे माप ओसंडुनीया भरे
वदावे पुढे काय आता विशेषे
विशेषातही शेष मागे उरे! ५

# कुमार गंधर्वांचे गाणे

गोचर–अगोचरांच्या वाचे
विश्वगान चालले अखंडित
नादब्रह्मा, तुझे दिव्यबल
तालकाल हे बसले मोजित १

स्वर्गधरेचे कापित अंतर
कसा चाललो मी नच जाणे
आणि त्याच धुंदीत ऐकिले
कुमार गंधर्वांचे गाणे २

क्षणात वाटे गानयोगी हा
नादसमाधी लावित बसला
क्षणी स्वरांवर स्वार होउनी
धुंदिधूलिका उडवित गेला ३

इथे मनोमय पटले मजला
स्वर आणिक शब्दांचे नाते
स्वरांस्वरांतिल छटाछटांतुनि
शब्द भावमय नटले होते ४

आलापांतुनि त्या तानांतुनि
ओघळले रे माणिकमोती
नादलयींच्या युतीयुतींसह
श्रुतीश्रुतींना फुटल्या ज्योती ! ५

शब्द-रूप-रस-गंध-स्वरांशी
स्पर्शाचेही नाते जडले
सूक्ष्मांचे एकत्रित असले
आज खरोखर दर्शन घडले ! ६

गानासह भावना रंगता
        उभयांचा बघ संगम झाला
येता तानालाप मुखांतुनि
        जिव्हा फुटल्या रे श्रवणाला

हां म्हणता ही सरली मैफल
        ऐकत भैरवि गानपिपासू
आरोहात तिच्या बघ करुणा
        अवरोहामधि गळले आंसू !

# नाट्ययोग–नाट्यप्रयोग

धन्य तुझी नाट्यकृती
धन्य ती कला !
नाद-ध्वनि संगतीत
शब्द-अर्थ या युतीत
अभिनयात सहजपणा
एक जाहला १

येथ रंगभूमिवरी
अंगभूमि मात करी
पार्श्वसंगितास त्यात
अर्थ उमगला २

वस्तु वस्तु येथ नटे
त्यातहि चैतन्य उठे
पार्थिवासि प्राण देत
पार्थ ठाकला ! ३

गात्र गात्र नेत्रवंत
बोल पुन्हा फुटति त्यात
नाट्यसंगमी नटेश
जणु समावला ! ४

हावभाव संपादणी
रंगत रंगायतनी
अवनीवर नटनागर
मूर्त प्रगटला ! ५

## ती सायंकाळ

वंद्य महात्मा विलीन झाला
अनंतात सायंकाली
" दुःख-राशिचे ओझे माथा
साहू आता कसे तरी ? "
स्तब्ध हो जरा धरतीमाता
अखंड गरगर फिरणारी
कोमल रविकिरणे झाली १

विरले उंडारणे, विसरली
बांसरिच्या त्या मधुताना
गाईगुरे रानांतुनि येती
खालति घालुनिया माना
मंदावत त्यांच्या चाली २

कळ्या कळ्या अन् फुले विनविती
" गांधीचरणी अम्हां वहा
देव्हाऱ्यांतिल देवांनो, तुम्हि
फुलांवाचुनी तसे रहा
क्षमस्व आम्हां या वेळी " ३

" स्वतंत्र होई भारत अवघा
मीच कसा उरलो बदनाम ! "
पिंजऱ्यातला राघु म्हणाला,
" रघुपति राघव राजाराम,
कोण आता आम्हां वाली ? " ४

# झाली मानवतेची चोरी !

झाली मानवतेची चोरी !
निधड्या छातीतुन धैर्यासह
शौर्य साठले होते येथे
तीक्ष्ण नखांच्या झापेसरसी
नेत केसरी तया हिरावुन
खुशाल बांधा शिकारखाने
आणि डांबवा लोह-पंजरी
झाली मानवतेची चोरी !

थैं थैं नाचत अश्वघाटिने
शोभत होते ते उमदेपण
टापा उडवित अन् खिंकाळत
नेले अश्वाने त्या पळवुन
बसा भलेही स्वार होउनी
लगाम हाती हीच हुशारी
झाली मानवतेची चोरी !

दिपवित दृष्टी नांदत होते
उदात्ततेचे वैभव येथे
गजगौरीच्या गजरामाजी
गज-राजाने नेले उचलुन
घेउनि आता अंकुश हाती
खुशाल मिरवा रे अंबारी
झाली मानवतेची चोरी !

आत्म्याच्या या इमल्याभोवती
इमान होते देत पहारा
गुरगुरुनी अन् भुंकत तेही
नेले श्वानाने हो चोरून

घाला आता गळ्यात पट्टा
हीच आढ्यता करात दोरी
आली हाती साखळदोरी !
झाली मानवतेची चोरी !

मात्र राहिली बुद्धी येथे
भ्रमिष्ट होण्यापुरती आता
कुणी नेइना तिला हिरावुन
पाप कशाला असले माथा !
एवढीच रे तव मानवता
शेष मानवा, तुझ्या शिरावरि !
झाली मानवतेची चोरी !

# ऐलाड-पैलाड

मी नदी वाहते भुई नाहवित
अखंड काठोकाठ

बिनधोक चालले, रोखु शकेना
कुणीहि माझी वाट

हे जीवन भरले दुथडी येथे
तुझ्यासाठी रे कोणी ?

तुज जीवन द्याया जीवाचे मम
केले पाणी पाणी

तूं तीर्थ बनविसी जल माझे, परि
मला वाटतो खेद

मी दुवा तुझ्यातिल, तुवाच मनुजा
मला मानिला भेद

हा प्रवाह माझा भाग्यरेघ तव
एकच असताना रे

तू द्वैत मानिसी दो बाजूंचे
माझे दोन किनारे

मी एकीकरणासाठी, या हो
करा स्नान, जलपान

ऐलाड आणि पैलाड भेद हा
नका करू निर्माण !

# आमुची लिपी

लिपी आमुची नागरी
स्पष्ट उच्चारांचे वर्ण
महाराष्ट्रीयां लाभली
वाणी तैसी ही संपूर्ण १

नसे उच्चारांची व्याधी
नसे लेखनात अढी
जात धोपट मार्गाने
स्वर–व्यंजनांची जोडी २

अहो, हिची जोडाक्षरे
तोड नाही त्यांना कुठे
उच्चारातली प्रचीती
जशी ओठांवरी उठे ! ३

जैसे लिहू तैसे वाचू
जैसे बोलू तैशा खुणा
जे जे लेखी तेच मुखी
ऐसा मराठीचा बाणा ! ४

सर्व उच्चारांचे शोधा
शास्त्रज्ञांनो, यंत्र एक
तेच दिसेल तुम्हांला
महाराष्ट्रीयांचे मुख ! ५

नाद-ध्वनी उच्चारांना
देत सदा आव्हाहन
लिपी ऐसी ही प्रभावी
माझ्या भाषेचे वाहन ! ६

## मायबोलीचे माहेर

माझी मायबोली आज आली माहेराला
सभोवती संतयोगी सुपुत्रांचा मेळा
नेसलीसे भागवत नाथाचे पैठणी
माथा शोभे मुगुट गाथा तुकयाचा नामी
ज्ञानेशाची ज्ञानेश्वरी मळवट भाळा
माझी मायबोली आज आली माहेराला

अंगी शोभे नामयाची कीर्तन-कंचुकी
निळोबाची गाथा दंडी बाजुबंद-वाकी
मुक्तेश्वरी मौक्तिकांची नथ नासिकेला
माझी मायबोली आज आली माहेराला

मुक्ता-जनीचे अभंग कर्णफुले कानी
अंगुठीत फाके प्रभा चोख्याची खुलूनी
समर्थांचा दासबोध चंद्रहार गळा
माझी मायबोली आज आली माहेराला

भाट बांधी कंकणे ती छातीने निधड्या
शाहीरी लावण्या तुझ्या बिल्लोर बांगड्या
पठ्ठ्याची ती धीट वृत्ती तीट शोभे गाला
माझी मायबोली आज आली माहेराला

आधुनिकांतही एक राष्ट्रसंत थोर
पंढरीच्या पाषाणांना फोडीतो पाझर
सानेगुरुजींचा लळा कटीसी मेखला
माझी मायबोली आज आली माहेराला

उच्चनीच आता येथे नाही भेदाभेद
नव्या मानवी धर्मांचा मुखे गात वेद
उधळीत शक्ती आणी भक्तिभाव भोळा
माझी मायबोली आज आली माहेराला

जे जे मनी तेच जनी ऐसे हे सोज्वळ
मराठवाड्यात माझे नांदते आजोळ
आढळेल तुम्हां येथे जीवीचा जिव्हाळा
माझी मायबोली आज आली माहेराला

# रसिकांप्रत

प्रेमाचे प्रेमळ तुज भेटतील
काय माझे बळ त्यांचेपुढे ?

पढती पडेल पक्वान्नांची रास
परी भाकरीस सारू नको

भोवती जमेल भास्करांचा मेळा
परी दिवटीला त्यागू नको

दऱ्या-खोऱ्यांतूनी लेवूनीया साज
भव्य गिरीराज उठतील

वाळवंटे तीही होतील जलधी
घेतील समाधी सर्व काळ

खडकाळ जागी प्रेमळ रसीका
सुंदर वाटिका फुलतील

चतुर हा काळ अजब गारोडी
यक्षिणीची कांडी फिरवील

अंतरीच्या एका काना-कोपऱ्यात
सख्या, माझी ज्योत पाजळू दे !

## तुझेच रूप पाहु दे

तुझेच रूप पाहु दे
स्वतंत्र भारती अता तुझेच रूप पाहु दे !

जुनेपणास आणिते
वसुंधरा नवी कळा
मनामनात आगळ्या
नवीनता समावु दे
तुझेच रूप पाहु दे ! १

दिवाकरामिषे तुझीच
दिव्यदर्शने किती
कणा-कणांतली द्युती
जना-जनांत तेवु दे
तुझेच रूप पाहु दे ! २

विराटशक्तिरूप हे
तुझेच सूक्ष्मतेतले
अणू-अणूंतली बले
तनू-तनूंत मावु दे
तुझेच रूप पाहु दे ! ३

तुझ्याच भक्ति गायनी
स्थिराचरा फुटे गळा
श्रुतीश्रुतींतला लळा
स्मृतीस्मृतींत राहु दे ! ४

गिळून व्याधिला बसे
सदैव श्रेय ते मुके
चराचरांतली सुखे
घराघरांत येउ दे
        तुझेच रूप पाहु दे !        ५

नभी दयार्द्रता तुझी
धरेत नित्य पाझरे
परात्परा असाच रे
झरा अखंड वाहु दे
        तुझेच रूप पाहु दे !        ६

## हवन हवे, बलिदान हवे

रेशमी वस्त्र विकायला आलेला
अफिंग चिनी–माका
आज शस्त्र हाती घेऊन
चाल करीत आहे
तुम्ही आम्ही भाऊ भाऊ,
मिठ्या मारुनी वदला चाऊ
बंधुत्वाची राखी बांधली
अन युद्धाची संधी साधली
स्वतःनेच स्वतःचा केला अधःपात
जवाहरासी अन् गौरीहराशीही विश्वासघात !
चाऊ एन् लाय
तू हे मांडलेस काय ?
तुझ्या बंधुत्वाची
तुझ्या मित्रत्वाची
आम्हांला अनुभूति आली
अन् जगात तुझी छी थू झाली
चिनी माती झाली !
शत्रूवरील मित्रत्वाचे कातडे !
हे कातडे सोलपटून काढलेच पाहिजे
या दगडाच्या देशाने
हे चिनी मातीचे पिवळे जिवंत भांडे—
आता फोडलेच पाहिजे
प्राणपणाने लढलेच पाहिजे,

मानवतेचे धडे कुणी कुणाला द्यावेत ?
आता माघारी फिरलास का ?
भिंतीच्या सांधीत शिरलास का ?
तुझ्या त्या चीनमधे
एक महान् भिंत उभी आहे,
जगातील एक आश्चर्य !
परंतु तुझ्या भिंतीला
फक्त कान आहेत
मन नाही, ज्ञान नाही
माझ्या महाराष्ट्राच्या आळंदीला
एक लहान भिंत होती
तिला पाय नव्हते, फक्त पाया होता,
तरी पण ती चालली
चालत गेली
हे आश्चर्यातले आश्चर्य !
कुरुक्षेत्राची रणकथा, ज्ञान-गीता
श्रीज्ञानेशाच्या मुखे
तिने ऐकली होती
हे ऐकण्यासाठीच तिला कान होते
मन होते, ज्ञान होते !
अरे, युद्ध हा तर आमचा सहजधर्म
परंपरेने पिढ्यानुपिढ्या
क्षात्रवृत्ती स्वधर्म म्हणून
आचरीत आहोत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ५००९८ दि: ....
क्रमांक ....१५०१.... नोंद दि: ....

संरक्षणासाठी, न्यायासाठी
युद्धाचे ब्रीद, श्रीगीतेने शिकविले
ते आम्ही जाणले आहे
आमच्या अंगी बाणले आहे
रणभेरी-दुंदुभींचे नाद ऐकून
आमचे अबलख वारू थै थै नाचले
लढवय्यांनी पाठीवर स्वार व्हावे म्हणून
आसुसले, फुरफुरले
आमच्या रानची वानरे अन् रीस
आक्रमणाविरुद्ध लढले
मग आम्ही तर माणसं
पशुंना मानवता देणारी माणसं
अरे, इथे पोटातील गर्भाला देखील—
रणाचे स्फुरण आले
स्मरण झाले—
—जन्माआधी मरणाला न भिणारे
असे हे स्फुरण !
स्फुरणासाठी आज आम्ही कवने गातो
नुसते कवन नको, हवन हवे
लढता रणी, पडता रणी
लाभ घडे दुणी
असे हवन हवे
बलिदान हवे !

## यावे नव महाराष्ट्रा

यावे यावे महाभागा नवमहाराष्ट्र देशा
उधळितो तुजवरी माझ्या फुटलेल्या आशा १

तुझ्यासाठी जे लढले तया मुजरा मानाने
भावभक्तीने आजच्या हुतात्म्यांना ही वंदने २

झाला सह्याद्री जागृत आता, झाले सर्व जागे
अहो, मुका सातपुडा, तोही आज बोलू लागे ३

जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र तुझे नाव
जयघोषी निनादाने हर हर महादेव ! ४

उधळीतो तुजवरी तुझ्या दिव्य इतिहासा
आज मागतो भंडारा भावी कर्तव्याच्या आशा ५

आज आम्ही आत्मबले अंगातल्या शक्तीबले
उधळीतो तुजवरी कोटीजनांचे जिव्हाळे ६

जरी आज काही भक्त केले विभक्त येथले
आणू तया ओढूनिया, करू पुन्हा तुझ्यातले ७

ध्याऊ ज्ञानाचा तो वेद कर्मयोगाच्या संवादी
घेऊ विज्ञानाचा वेध आम्ही महाराष्ट्रवादी ८

हिणवोत कुणी आम्हां, यांची वृत्ती संकुचित
अहो, काय तया ठावे, त्यात विकासाचे व्रत ९

संकोचातला विकास इथे होतो विश्वंभर
माझ्या ज्ञानेशाने केले विश्व हेच माझे घर १०

भगवंतमय असा माझा भागवत धर्म
जय जगताचे त्यात येऊनिया गेले मर्म ११

भारताच्या संरक्षणी धाव घ्यावया तातडी
परंपराच आमुची, घेऊ पहिल्याने उडी १२

यावे यावे नवयुगी महाराष्ट्र देशा
पूर्ण होईल नव्याने तुझा पूर्ण नकाशा। १३

आज स्वतंत्र भारती लोकशाहीच्या कारणे
उधळीतो तुजवरी नवा जोम, नवी मने १४

नका भिऊ मराठ्याला, इथे न्यारीच प्रचीती
अहो, आमुच्या भीतीने जगा शिकवीली प्रीती १५

आम्ही मारू त्यासी तारू, देऊ चैतन्य जीवनी
संतयोगी महात्म्यांनी दिली आम्हा संजीवनी १६

केला साक्षात् देव उभा, ऐसे संतशिरोमणी
तैसे झाले मृत्युंजय येथे वीर चूडामणी १७

इथे स्वातंत्र्याचा जन्म, इथे स्वातंत्र्याच्या वाटा
वाट केशी ती चुकावी, चुकूनीया म्हणू नका १८

मायमाउल्या नद्याही इथे उगम पावती
धनधान्याचा तो साठा परप्रांतांलागी देती १९

आम्ही त्यागाचे मिराशी, भोग येथे उणा आहे
खावी श्रमाची भाकरी, आत्मतुष्टी बाणा आहे २०

इथे भाव हाच देव, कष्ट हेच खरे सोने
आहे आराम हराम, तत्त्व झाले येथे जुने २१

महाराष्ट्र माझा धर्म, देव माझा महादेव
लघुत्वाला नाही जागा, महाराष्ट्र माझे नाव २२

भारतासी संरक्षाया सैन्ये झाली येथे स्वार
बंडे पुकारीता नेले झेंडे अटकेच्या पार २३

अहो, याचा इतिहास, राष्ट्रवृक्षाची ती मुळे
त्याच्यावरीच पोसली संस्कृतीची फुलेफळे ! २४

नावामधे काय आहे ? देवो अशी कुणी ग्वाही
माझी मराठी सांगते, नावामधे काय नाही ? २५

नामशेष करावया कैक आले, कैक गेले
मात करणारे अंती इथे मातीत मिळाले २६

राज्यावरी गेली राज्ये, कैक नकाशे फाटले
तरी मराठे हे ताठ, कधी मागे ना हटले २७

आज नव्याने सांगतो, दृढ माझा भक्तीभाव
लोकशाही माझी आई, महाराष्ट्र माझे नाव ! २८

१६८६८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ................ दि: ................
क्रमांक .................. नोंद दि: ........

## उद्याचा नवा महाराष्ट्र

उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा हवा
नव्या अंकुरांसवे फुटाव्या
तोडलेल्या शाखा, आणखी भराने
व्हावी उज्ज्वल इतिहासाची पाने
जावोत खोल मुळे लक्ष लक्ष
बहरावा असा महाराष्ट्र वृक्ष
या बहराला तेज चढावे
मराठी मातीमधले !
याचे बीबियाणे आहे तेजाचे
असा हा याचा विकास
भारताला प्रकाश व्हावा
उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा हवा ! १

सह्याद्रीची सहनशीलता
कृष्णा–गोदेची सृजनशक्ती
चंद्रभागेची भागवत भक्ती
महाराष्ट्राच्या नव्या कहाणीला
इंद्रायणीची वाणी स्फुरावी
दगडांचा देश दगडांचाच असावा
परी त्या दगडांखाली पाणी झरावे
शिवप्रभूच्या पदस्पर्शित
भाग्यवंत दगडांतून
शिलाजीत पाझरावे
भले कुणीही करोत हेवा
उद्याचा महाराष्ट्र ऐसा हवा ! २

पक्षीयांचा पक्ष असो कोणताही
वक्ष त्याचे हवे मराठबाण्याचे
अंतरी असावे महाराष्ट्रवादी
इथे मानव्याची तमा आहे
पण अन्यायाला क्षमा नाही
आम्ही लोकशाहीचे पुजारी
जुलमशाहीचे मारेकरी
इथे अहिंसेसाठी हिंसा
हाच बोध घ्यावा
सत्य शोधण्यासाठी सदा असावा
छत्रपतींचा गनिमी कावा
उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा हवा ! ३

या स्वतंत्र भारतात
कमरेची तरवार गेली
आता फक्त सुरवार राहिली
युद्धाची सरली भाषा
आता एकच ही अभिलाषा
हृदयस्थ नारायण जगविण्यासाठी
असावी प्रत्येकाच्या घरी
गाथा अन् ज्ञानेश्वरी !
अंधश्रद्धेचा वेंधळेपणा झडावा
एक मौलिक बदल घडावा
पांडुरंग-रखुमाईसवे
घ्यावे नाम हेही
स्वातंत्र्य अन् लोकशाही
भक्ती आणि शक्तीचा
असा जुळावा दुवा
उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा हवा ! ४

हे यंत्रयुग, हे यंत्रयुग !
यंत्राने लावला लळा
परंतु त्याने कापू नये माणसाचा गळा
ज्ञानावरी विज्ञानाने केली मात
विज्ञानाने हात द्यावा, घात करू नये
गिरणीत यंत्र भलेही चालो
परंतु रस्त्याने भिकारी
        चालताना दिसू नये
        असा हा समन्वय व्हावा
        उद्याचा महाराष्ट्र ऐसा हवा ! ५

आम्ही माणसांचे भुकेले
आमचा कापूस वस्त्र बनो सकलांसाठी
हापूस लागो सकलांच्या ओठी
        पिकला गहुहरभरा
        पुरून उरावा इतरांसाठी
        धान्यकोठारे खुली असावी
दामांसहित दामाजीच्या उदारतेने
यातच रामराज्याचे दर्शन घडावे
भरतप्रेमी अन् भारतप्रेमी बंधुत्वाचे नाते
        परप्रांतीयांशी जडावे
‘ जय भारत ’ जयघोषांतुनि
जय महाराष्ट्र प्रतिध्वनी उठावा
उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा हवा ! ६

# आज भवानी शांतादुर्गा

आज भवानी शांतादुर्गा मराठीत बोलली ॥ धृ ॥
मेघ-सिंधु-सरितेचे मीलन
अशी मांडवी भूवर यावी
इथे नाविकामुखे ऐकिली
ज्ञानेशाची अमृतओवी
अरे नाविका, तुझ्या होडीतिल
गोडी हेलावली

जागी येथे आर्यसंस्कृती
श्रीफलधारी वृक्ष डोलती
जागा येथे धर्म भागवत
तुळशीवृंदावने बोलती
गिरिधर प्रभु तुळल्या तुळशीची
पाने बघ हालली

निसर्गसुंदर वृक्षलतांचे
संगीताशी जुळले नाते
मला वाटते या गोव्यातिल
माती देखिल ‘ सरगम ’ गाते
अभंगओवी संगीतातुनि
जनता ही रंगली

गाता अंगाई वनराई
गोमांतक बघ जागा होतो
इथे कोंबडा–छे छे येथे
अरुण आळवित जागे करितो
जोगियातही मल्हाराची
सुस्तान गजली

कलावंत जरि गोमांतक हा
कळले का शौर्याचे नाते ?
उभा पुढे संग्राम जेधवा
मार्दवही मर्दुमकी होते
शांत शांत परि दुर्घट दुर्गा
रणचंडी जाहली

इये मराठीचीये नगरी
एकच भाषा अन् अभिलाषा
महाराष्ट्र-गोमांतक एकच
कसल्या आल्या सीमारेषा ?
नकाशातल्या अवकाशातुनि
त्यातच सामावली
आज भवानी शांतादुर्गा
मराठीत बोलली !

# मानवतेचे धडे

जग हे असे चालले पुढे —
मानव शिकवी मानवासि हो
मानवतेचे धडे

दिवाकराच्या अंगि दिव्यता
भुवनोभुवनी भरे भव्यता
श्रुतीत नांदे पूर्णश्राव्यता
मानवास परि मानवतेचे
कसे सदा वावडे ?

देहाचे ते चंदन झिजवुनि
संत महात्मे गेले 'म्हणुनी'
काहि न म्हणणे उरले भुवनी
जाणिव पोटी, परंतु ओठी
शब्दांचे बुडबुडे

मानवतेचा सागर मथिला
शतकाशतकांतुनी त्यातल
लाभे एकच संत जगाला
छळाछळातुन त्या संताच्या
अंतच पदरी पडे

'जगा शिकविले केले आधी'
जये सोशिल्या आधीव्याधी
अखेर बनल्या पूज्य समाधी
समाधीतले समाधान ते
उरते जनि तेवढे

मानव्यास्तव राज्य उभविले
मानव्यास्तव धर्म स्थापिले
मानव्यास्तव देव निर्मिले
तरिही मानव या सकलांच्या
डोक्यांवरती चढे

हा असला हा चढेल मानव
पडेल तेव्हा पडतो खाली
जमता आप्तमित्र भवताली
कण्हता कण्हता मानवतेचे
अखेर दर्शन घडे !

## यमुनेच्या पाण्यावर

यमुनेच्या पाण्यावर उठले तरंग !
आज यमुनेच्या पाण्यावर उठले तरंग !
नीज नीज म्हणू नये
स्वातंत्र्याच्या जागृत वेळी
निमाले अंगाई गीत
आणि विरली भूपाळी
सरला जोगीया, झाला सुरू सारंग
आज यमुनेच्या पाण्यावर उठले तरंग
जिच्या तिरावरी गाजे
संतयोगियांची वाणी
आली यमुनेच्या पाशी
आली माझी इंद्रायणी
घेउन तुकयाचे भिजले अभंग
( घेउन तुकयाचे तरले अभंग )
आज यमुनेच्या पाण्यावर उठले तरंग
मातृप्रेमाचे मंगल
स्तोत्र येता पटावर
मिळे ' श्यामच्या आईला '
राष्ट्रपतींचा आहेर
प्रल्हादे केले अवघ्या जगतासि दंग
आज यमुनेच्या पाण्यावर उठले तरंग
आला गगन गर्जत
आला दक्षिणेचा वारा
होता येथे बरसात
भरे तुडुंब किनारा
मेघांचा आभाळात वाजे मृदंग
आज यमुनेच्या पाण्यावर उठले तरंग !

## महाराष्ट्रगीत

जय जय महाराष्ट्र
जय महाराष्ट्र माझा
मराठवाडा विदर्भ आणि
कान्हदेशचे शेतमळे
गोमांतक नंदनवन माझे
कोकण फुलवी फुलेफळे
तापी-पूर्णा, गोदा कृष्णा
इंद्रायणी आणिक भीमा
जीवन अर्पित पुढे चालल्या
देशबांधवांच्या कामा
मायमाउल्या गिरिजा

सह्याद्रीच्या लिपीत लिहिला
वीरश्रींचा इतिहास
पूज्यसमाधी–विरामचिन्हे
संतजनांचा सहवास
शौर्य–धैर्य–त्यागाने ज्यांच्या
भूषविले तुझिया विभवा
शक्ती आणिक भक्ती यांचा
इथेच जुळला खरा दुवा
हीच प्रभूची पूजा

सचेतनासी द्याया मसलत
अचेतनाला फुटे गिरा
मराठमोळ्या तुला सांगतो
रायगडाचा चिराचिरा

इथे पताका आणी भाला
ताल मृदंगी ढाल चढे
वारकऱ्याचा धारकरी हो
रक्ताचे शिंपुनी सडे
जय महाराष्ट्र गर्जा

ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकया
समर्थ, संतांची माला
मानवतेचे बीज रोवुनी
सदा जागविती आम्हांला
वंद्य शिवाजी, पहिले बाजी
लोकमान्य ऐसे वीर
स्वातंत्र्याचा मंत्र देउनी
केला ज्यांनी संचार
दावुनिया निजतेज।

संकट येता लढलो आम्ही
धाव घेत उत्तरेकडे
भारतदेशा संरक्षाया
सैन्य आमुचे सदा खडे
परंपरेने देत अम्हांला
शक्ती आणि वेदना धडे
करात कर घालुनी चालल्या
बुद्धी आणि भावना पुढे
उघड हृदय-दरवाजा !

## क्रान्ति

क्रान्ति स्फुरते सह्यगिरीवर
क्रान्ति धुमसते शैलशिखावर !
मराठवाण्याचे वाण घेउनी
स्वातंत्र्याची ज्योत पाजळीत
विंध्याद्रीवरुनी
हरहर महादेव गर्जत
सिंधु-गंगा-यमुनेच्या स्पर्शाने
उत्क्रान्त होऊन जाते
उत्तरेकडे संचार करीत
हा नररत्नांचा देश
यात संतांचे संदेश आहेत
योगियांचे आदेश आहेत
ज्ञानेश-तुकयाची भक्ती आहे
समर्थांची युक्ती अन्
शिवछत्रपतींची शक्ती आहे
आशा–आकांक्षांना आई भवानी
त्याग–आहुतींनी तोलते आहे
मराठ्यांच्या यशाची यशवंती
आत्मानंदात डोलते आहे
तिच्या भरलेल्या नयनात
भारताची बाहुली नाचते आहे
अरे, आजच्या प्रखर उन्हात
उद्याची सावली दिसते आहे
सागरतळीच्या
वडवानलाचे मनोगत
मार्सेलिस बंदरावर
बाहुबलाने तरले गेले

नभोमंडलाच्या
ग्रहगोलांचे गुपित
मंडालेच्या तुरुंगात हेरले गेले
स्वातंत्र्यसमराची कहाणी
अन् गीतारहस्याची वाणी !
म्हणा हवे तर दगडांचा देश !
हे दगड कसोटीचे आहेत
हे दगड परीस आहेत
चिंतामणी आहेत
गोफणगोटेही आहेत
कपाळमोक्ष करणारे
हे दगड कृपाळू होऊन
लोण्यालाही लाजविणारे आहेत
भक्तिभावाचे तरंग उठविणारे
तसेच सुरुंगांचा
बेरंग करणारेही आहेत
हे दगड मारणारे भासले
तरी मारून तारणारे आहेत
अहो, हे दगड तरणारेही आहेत
हे दगड पाझरणारे आहेत
खरा पाझर दगडांचाच !
क्रांती कुठे ? क्रांती कुठे ?
सह्याद्रीच्या क्रांतीचे वारे
संचार करीत जाते
कैलासशिखरावर !
शांती म्हणविली तरी
ती क्रांतीच असते

ती असते, वसत नाही
क्रांती कधीही ‘ कैलासवासी ’
होत नसते
कारण संचार करणारी
ती गौरीशंकराची ‘ शिवशक्ती ’!
तिसऱ्या नेत्राच्या दीप्तीने
क्रांतीची ज्योत उजळीत
जाते कन्याकुमारीपर्यंत !

# जय जय भारत

एक हिमालय, एकच गंगा
तीच मही अन् तोच महेशही
निसर्गनिर्मित वसुंधरेवर
सुंदर अमुचा भारत देशही
सागरगिरिवर वनराजीसह
बोले या धरतीची माती
घुमवा एकमुखे आवेशे
जय जय भारत आणि भारती

भाषा अमुच्या भिन्न भिन्न जरी
अभिलाषा परी येथे एकच
कन्या ह्या संस्कृत मातेच्या
' भाषाभगिनी ' नाते एकच
ज्ञान आणि विज्ञानासंगे
भाग्याच्याही उजळा ज्योती
घुमवा एकमुखे आवेशे
जय जय भारत आणि भारती !

नद्याडोंगरांच्या सीमांचे
अजुनी भेद हे अमुच्या माथी
हा बंगाली, तो पंजाबी
मराठाच हा, तो गुजराथी
मनामनांतील किल्मीषांच्या
क्षणात उडवा मधल्या भिंती
घुमवा एकमुखे आवेशे
जय जय भारत आणि भारती ! २

डोंगर म्हणतो ‘ मी सर्वांचा ’
‘ मी सर्वांची ’ म्हणते सरिता
सांगा आपण कसे म्हणावे ?
‘ मी माझा, मी माझ्यापुरता ! ’
निसगनिर्मित जे जे काही
ते तर अपुले जीवनसाथी
घुमवा एकमुखे आवेशे
जय जय भारत आणि भारती ! ४

देशभक्ती ती देवभक्ती हो
उपासना ऐशीच घडावी
बंधुभाव अन् ऐक्याचे व्रत
ह्यांची जोपासना जडावी
उठा उठा ! व्हा जागृत अवघे
भाग्य आपुले अपुल्या हाती
घुमवा एकमुखे आवेशे
जय जय भारत आणि भारती ! ५

देशाच्या संस्कृतीस आणिक
स्वातंत्र्याला आम्ही ध्यातो
आम्ही कवीजन स्फुरणासाठी
रणांगणाची कवने गातो
कवनात हवी परि हवनाची
आणिक बलिदानाची पूर्ती
घुमवा एकमुखे आवेशे
जय जय भारत आणि भारती ! ६

# काव्य–चर्चा

चालल्या सपाटुनी चर्चा
जो तो ये व्यासपीठावर
"आजची मराठी कविता
आहे का प्रगतिपथावर ?"

वाङ्मयीन चर्चेमाजी
कुणी भाग घेउनी बोले
आणुनी खेंगटे अंगी
कुणी भांग घेउनी बोले

चंगीझखान चर्चेचे
कुणी आले बांधुनी चंग
ठाकले काव्य-दिग्विजया
बुद्धीचे तैमुरलंग !

झापडी स्वतांच्या डोळा
दाविती प्रकाश जगाला
घेतल्या मशाली हाती
मागुनिया उसन्या तेला

युगकवी निर्मितीसाठी
टाकिती अकारण फासे
त्या 'राजकारणापरी' हे
कवि-कारण दुसरे भासे

कुणी म्हणे, कवींनो गा रे
गेयतेवाचुनी गाणी
प्या पाणपोईतुन आता
पेयतेवाचुनी पाणी

निःश्वास सोडुनी फुंकी
विरहानली कुणी निखारा
शिणल्याविण वाहवी कोणी
ढळत्या घामाच्या धारा

कुणी शक्तीवाचुन गाती
ओघळत्या रक्तासाठी
बोलती जिव्हाळ्यावाचुन
गळत्या अश्रूंच्या गोष्टी

शिल्पकार हे शब्दांचे
भ्रमतात पार्थिवाभोती
अनुभूती कसली झाली
अनुमान लागले हाती

हृदयास फुटू द्या नयन
हृदयास फुटू द्या वाचा
हृदयास फुटू द्या श्रवण
मग करा प्रगतिच्या चर्चा !

आजची मराठी कविता
भ्रांतीचे अश्व जुंपोनी
बघ चाले स्वगति-पथावर
नव मनोरथात बसोनी !

# धर्मसंस्थापकांनो !

जन बनले धर्मवेडे
ना वर्म कुणाच्या अंतरी
अहो धर्मसंस्थापकांनो !
काय भलते झाले तरी !

देवाच्या शोधासाठी तुम्ही
देवत्व स्वता बाणविले
आणि साध्या मानवासाठी
धर्म जगती संस्थापिले
आचरिले जीवन तुम्ही
आपआपल्या धर्मापरी
मानव विसरला तत्त्वे
एकमेकांच्या बसे उरी
अहो धर्मसंस्थापकांनो !
काय भलते झाले तरी !

एका मानवधर्म वृक्षा
अनेके आणिली अवकळा
बुंधाही त्याचा नच दिसे
बांडगुळांनी तो वेढिला
ब्रह्मांड प्रभूचे भुवन
पढता रे कलमा, वेदा
मशीद, मंदिरे, चर्चादि
घातल्या देवासी मर्यादा !
अहो धर्मसंस्थापकांनो !
काय भलते झाले तरी !
शोधिले भिन्नधर्म-पथ
एका देवाच्या भेटीपायी

चालले जन आंधळे हे
पांगले भलत्याच ठायी
चुकलेले हे मुशाफिर
भेटता हो भलत्या स्थळी
भांडुनी आपआपसात
एकमेकांचे घेती बळी
अहो धर्मसंस्थापकांनो !
काय भलते झाले तरी !

धर्ममार्गा दिधली नावे
नावाचेच ते राहिले
दिसे न पावलांचा ठसा
तयावरी तृण माजले
अहंगड मानवतेचा
त्या त्या समयी तुम्हां झाला
अखेरी मानवाचा मार्ग
मानवांनीच तो शोधिला
अहो धर्मसंस्थापकांनो !
काय भलते झाले तरी !

स्वगतीचा मानव जगी
तीच त्याची प्रगती असे
तुम्हां धर्मसंस्थापकांना
काय तो आता मोजीतसे !
सनातन 'मानव-धर्म'
तो का नाही विस्तारिला ?
मानवांशीच हा मानव
पारखा तुम्ही कैसा केला ?
अहो धर्मसंस्थापकांनो !
काय भलते झाले तरी !

# एक चमत्कार

एका अंधाऱ्या खोलीत
काही साहित्यिक बंधू
जो तो स्वतःला समजे
धरित्रीचा मध्यबिंदू !
आणी सहाजिक होई
त्यांना ऐसा बुद्धी-भ्रंश
माझ्यापासूनीच होती
सुरू अक्षांश-रेखांश !
जड ऐशा डोक्यावरी
अहंकारांचे डोंगर
ऐसा शीण दुणावता
होई धरणीला भार
ह्यांच्या वितंडवादाने
भ्रम होई स्थिरांचरां
तेव्हापासूनीया पृथ्वी
फिरू लागे गरागरा !!

## मी पहिल्यांदा

मी पहिल्यांदा, तू दुसऱ्यांदा
दोघे मिळुनी ते तिसऱ्यांदा
भिंतीवरती फडफडणारे
चित्रच नुसते पहा टांगले
क्षणाक्षणाचे क्षेम होउनी
प्रेम आपुले फ्रेम जाहले
तुझे नि माझे ' नेम ' कोरिता
द्वैताचा हो चेंदामेंदा १

तू पहिल्यांदा, मी दुसऱ्यांदा
दोघे मिळुनी ते तिसऱ्यांदा
मंगलाक्षता धरा भक्षता
मेघ मेघले, विजा विजलल्या
बरसातीच्या चिंबपणातुन
कवणाचे ते बिंब हालले ?
अस्फुट वाचे कोण बोलले ?
कुणी जोडीला जीवनसांधा ? २

मी पहिल्यांदा, तू दुसऱ्यांदा
दोघे मिळुनी ते तिसऱ्यांदा
सौभाग्याचा अन् भाग्याचा
जरी न भागाकार जाहला
सगुण निर्गुणी गुणगुणीतुनी
गुणाकार हा साक्षात् घडला
बेअकली तू मला बोधिता
झालो मी अकलेचा कांदा ३

मी पहिल्यांदा, तू दुसऱ्यांदा
दोघे मिळुनी ते तिसऱ्यांदा!
गतीमंद मी, गतीमंत तू
अनंतातले अंतर कापित
अखेर संसारात घसरलो
छा छू जंतर मंतर टाकित
आणि जाहला नांदनांदतां
पूरेपूर जन्माचा वांधा ४
मी पहिल्यांदा, तू दुसऱ्यांदा
दोघे मिळुनी ते तिसऱ्यांदा

## तिघांच्या तीन तऱ्हा !

जाऊ नये नवकविता
एकदा पसायदानाकडे गेली
' आता विश्वात्मके ' ऐकताच
खजील होऊन परत आली
अखेर लागली कमिक पुस्तकात
एकाद्या जल-प्रवाशाला
बोट लागावी तशी !
सव्वीस वाद्यांमधे गुदमरलेले
सव्वातीन मिनिटी भावगीत
देहू या अभंग-नगरीला गेले
जाताच ' पद ' घसरून
इंद्रायणीत बुडाले
बुडाले ते बुडालेच बिचारे
फक्त बुडबुडे वर तरंगले
आणि भावगीताचे शेवाळ होऊन
किनाऱ्यालगत लिडबिडले
आणि याच अवस्थेत
कोऱ्या करकरीत लावणीला
कधी नव्हत सय झाली
सगनभाऊची ! परंतु गेली
रेठऱ्यापर्यंत पठ्ठे बापूरावांच्या !
आणि रट्टे खाऊन
अखेर परत आली !
उधार-उसनवारीची
बिना कलगी-तुऱ्याची
चित्तपटावर न ठसता
चित्रपटात गुंडाळली गेली !

# नवकवीचे मनोगत

प्रासा चढवूया फासावर
यमके धाडू यमसदनाला
यती पाठवू रतीकडे अन्
चरणा-चरणा ठोकुनि ताला !

श्लेषांची तर ठेचू तोंडे
लघुगुरु मात्रा गेल्या वाया
इथे न मात्रा चाले आता
गणांस देखील गणकावूया

वृत्त अता निवृत्त जाहले
नष्ट करू त्या जाती आता
उभे विषुववृत्तावर राहुन
लिहू स्वच्छंदी नवकविता !

डुरडुर डुकर येता दारी
तयासि मोदे देउ निमंत्रण
जगा ऐकवू मुसंडीतुनी
गटारीतले गिटारगायन !

पंपत पंपत काळोखाला
अपुल्या अंधाऱ्या खोलीत
वास्तवामिषे घेउन हाती
विस्तववादाचे ते कोलीत

वर्षाव करू वत्सलतेचा
एकट्याच त्या बीभत्सावर
प्रामाणिकता मिरवू ऐसी
प्रमाण ठेवुनिया धाब्यावर

अशीच नाविन्यत्वपणाची
पिस्टनता नवकाव्ये लिहुया
पावित्र्याचे भूत करोनी
मांगल्यासी लक्ष लावुया !

# निळा संज्ञाप्रवाह

निळा अरुण उगवला
उजळीत नीलिमा

निळा गुलाल उधळीत
विलसत होता निळा हिमालय
आणि निळ्या पायथ्याशी
झळकत होते, निळकत होते
निळ्या निळ्या देवालयांचे
निळे सुवर्णकळस
निळ्या चंदेरी मानससरोवरी
पोहत होते निळे राजहंस
निळ्या निळ्या चोचीने
निळाईनेच खात होते
निळ्या मौक्तिकांचा चारा
तोंच निळ्या वायूसवे
निळ्या गतीने आल्या कानी
नीलांबरी रागाच्या
निळ्या निळ्या स्वरलहरी !
जिकडे तिकडे निळे निळे रे
निळे निळेगार गालिचे
निळ्या मातिच्या मखमालीचे !
बसले होते निळाच्या शेतात
दोघेही मुलुखाचे पागल
निळू आणि नीलिमा
लावुनी निळ्या काचेचे गॉगल !

## मी ताक पितो

मी ताक पितो, मी ताक पिणार !
मला दूध नको, मला लोणी नको
दही नको, आणखी काही नको
मी ताक पितो, मी ताक पिणार !
आजचे दूध हे उद्याचे दही आहे
उद्याचे दही हे परवाचे लोणी आहे
परवाचे लोणी हे तेरवाचे तूप आहे
परंतु ताक हे माझे ताक आहे
अनंत काळचे ताक आहे
ताकात शक्राची भाक आहे
अनंताची हाक आहे
दिव्यत्वाची झाक आहे
गेले जरी ताजेपण
ताक हे ताक राहील
अन् शिळे झाले तरी
शिळ्या कढीला ऊत येईल !
मी ताक पितो, मी ताक पिणार ! १

हा माझा भारत देश आहे
इकडे ब्रह्मदेश आहे
तिकडे अफगाणिस्तान आहे
बलुचिस्तान आहे, पाकिस्तान आहे
पोटात माझ्या ताकिस्तान आहे

ताक हे पाक आहे
सर्व पेयांतील नाक आहे
मी नाकानेच ताक पिणार
मी ताक पितो, मी ताक पिणार ! २

प्रतिभा माझी ताक घुसळते आहे
डेऱ्यामधे ताक उसळते आहे
ताकात रवी बुडते आहे
बुडून बडबड करते आहे
तोऱ्यात हासते आहे
फेऱ्यात नाचते आहे
डेऱ्यात शून्याचे संशोधन करते आहे
काय तुम्ही पाहिली ताकाची चवी ?
' जे न देखे कवी, ते देखे रवी '
अशी माझी रवी, अशी माझी रवी
मी ताक पितो, मी ताक पिणार ! ३

ताकात काय नाही ?
ताकात सर्व आहे
खर्व आहे, निखर्व आहे
पाहिले का कधी ताकाचे घुसळण ?
घुसळणारी पाहिली का कधी गवळण ?
घुसळ घू घुसळ घू
नादामधे चूर आहे
ताक् घुर्र ताक् घुर्र
ताकात तिच्या सूर आहे
' घुट्टर घू घुट्टर घू '

कबुतरी बोल आहे
ताक् धिन् ताक् धिन्
ताकात तिच्या ताल आहे
गीत आहे, संगीत आहे
भावना आहे, भाव आहे
अन् बुद्धीचे तर ‘ ताकाखात्र ’ आहे
मी ताक पितो, मी ताक पिणार ! ४

ताकातील जीवनसत्वे
मानवच जाणे
म्हशीच्या रेडकाला त्याचे काय !
ताक दिले तरी व्हॅांय
दूध दिले तरी व्हॅांय
एकच अभिप्राय !
ताक हे पारखून घ्यावे
ताक हे फुरकून प्यावे !
मी ताक पितो, मी ताक पिणार ! ५

नव्या युगाचा पाईक मी कट्टा आहे
नाविन्याचा गठ्ठा आहे
काय तुम्हां वाटते थट्टा आहे ?
अरे, ताकाचा मी मठ्ठा आहे
उत्साह-उन्नती-आरोग्याचे
ताकत्व झाले आहे
ताकत्वतापण ताकात माझ्या आले आहे
युगायुगांचे आले आहे
मी ताक पितो, मी ताक पिणार ! ६

मनातले मांडे छपविणार नाही
ताकाचे भांडे लपविणार नाही
ताक प्यायला कचणार नाही
ताकापुरते रामायण वाचणार नाही
ताक माझा जीव की प्राण !
ताक देते तीच ताकद होते
अश्मयुगातील चष्मा लावुन
पश्मीन्याची शाल पांघरून
आस्मादिक हा—
युगायुगांना उगाळीत
शतशतकांचे फतकल मारून
बसलो येथे ताक पीत
मी ' तक्रानंद सरस्वती ' आहे
मी ताक पितो, मी ताक पिणार !

# टांग टिंग टिंगा

[ केशवसुतांच्या 'झपूर्झा' या कवितेत हर्ष आणि खेद दोन्ही मावळतात. हास्य नाहीसे होते. अश्रु पळूनजातात. झपूर्झा ही एक मानवी मनाची स्थिती आहे. परंतु 'टांग टिंग टिंगा' ही मानवी मनाची अगदी एक निराळीच उपस्थिती आहे. येथे हर्षांमधे रडू येते आणि खेदामधे हसू येते. हास्य अन् अश्रु पळून न जाता तिथेच एकमेकांच्या बोकांडी बसतात अशी ही एक नवस्थिती ! ]

संज्ञा प्रज्ञा आज निमाली
प्रतिभा जाउनि प्रतिमा आली
शुद्ध गळाली बुद्ध पळाली
पेंगुळलेल्या स्वप्नामाजी
निरखित होती बबुळे माझी
कुठे भावना, कुठे कल्पना !
दुर्बोधी वारूवर बसुनी
ढंपक आल्या, टंपक गेल्या
काय म्हणावे या स्थितिला ?
टांग टिंग टिंगा कि टांग टिंग टिंगा ! १

मघा पाहिले चित्रप्रदर्शन
नवचित्रांचे झाले दर्शन !
वळवळत्या रेघांचे जाळे
रंग विखुरले बरबटलेले
चित्र हेंगडे आणि तेंगडे
कुठे हात अन् कुठे तंगडे
कुठे नाक अन् कुठले डोळे
माझी मीच माझ्या तंगडीने
लगावली माझ्या थोबाडीत !

काही कळेना, काही मिळेना
काय म्हणावे या स्थितिला ?
टांग टिंग टिंगा कि टांग टिंग टिंगा ! २

आणि वाचली एक नवकथा
शब्दांच्या तर चौपट दिसती
टिंबे, चिन्हे, उद्गार वृथा !
ग्रहण लागले ग्रहणशक्तिला
झाला चिंतनशक्तीचा लय
परी तीत मजला गवसेना
अभिव्यक्ती अन् तिर्कस आशय !
बुद्धीची तर शुद्ध हरपली
हृदयाविण कसले हृदयंगम
चिवट असे मूळातच चोथा
जणू वाटला मला चुइंगम !
काही मिळेना, काही गिळेना
काय म्हणावे या स्थितिला ?
टांग टिंग टिंगा कि टांग टिंग टिंगा ! ३

आणि बघितला नवचित्रपट
और कथानक, और नटीनट
वांदरतोंड्या त्यातिल नायक
घोडमुखी तर त्याची नायिका !
काय वेषभूषेचा गोंधळ !
कोण पुरुष अन् कोण बायका !
" ललललाला, डडडडाडा "
किंकाळी कंठाच्या कर्कश
संगीताचे कळे न इंगित


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ............ दि: ............

पाश्चात्याचे उष्टिकरण ते
कसे अम्हां नाविन्य वाटते !
काही कळेना, काही वळेना
काय म्हणावे या स्थितिला ?
टांग टिंग टिंगा कि टांग टिंग टिंगा ! ४

हे असले काहीच्या बाही
प्रकार आणि प्रचार बघता
एकच वाटे माझ्या चित्ता
यात दिसेना पिंड आमुचा
कुणीतरी झिंगतो अगांतुक
यात दिसेना अमुचा आत्मा
कुणी तरी बोलतो तिऱ्हाइत
आणि वाटते येईल उदया
अशीच काही नवमानवता !
नव्या मानवा, नव्या मानवा
कुणास कसला आहे व्यत्यय
आज अकारण राजकारणी
येत चालला तोही प्रत्यय !
काय म्हणावे या स्थितिला ?
टांग टिंग टिंगा कि टांग टिंग टिंगा ! ५

# श्रीमंतीला लागे जणू !

बैसूनीया पेढीवरी
घेर वाढला पोटाचा
कापसाच्या लोडावरी
दुजा लोड हा मांसाचा
कृश-देही मोळीवाला
पोटाची हो पत्रावळी
लाकडाच्या मोळीखाली
उभी हाडकांची मोळी !
मोठे धनीक व्यापारी
शौकीनांची ही शहरे
आणि बाहेरी तयांच्या
मूर्त दारिद्र्य संचरे !
शहराच्या भोवताली
जीर्ण झोपड्यांचा फेर
श्रीमंतीला लागे जणू
दारिद्र्याची ही झालर !

# धरतीची माती

डोक्यातल्या मेंदूला कळणार नाही
ते पायाच्या तळव्याला कळते
पंडिताला जे बोलता येणार नाही
ते वाटेचा अडाणी बोलून जातो
चित्रकाराला जे जमणार नाही
ते रंग नभांगणात रंगतात
शिल्पकारांना साधणार नाही
ते निसर्गनिर्मित खडकाला साधते
संगीतसम्राटाला साधणार नाही
ते गाणारे पक्षी गाऊन जातात
भक्तांच्या भक्तीला साधणार नाही
ते साधते एका मातीला
स्वर्गातला देव राहो स्वर्गी
त्याला खाली आणते–
धरतीची माती !

## आत्मनिष्ठ

मी एक आत्मनिष्ठ आहे
हे जग माझे आहे
जगामधे मीच आहे
मी हलतो, म्हणूनच जग हलते
झाडाचे पान हलते
चेष्टा नव्हे, हे स्पष्ट आहे
मी एक आत्मनिष्ठ आहे
मी अन्न खातो
अन्न मला खाते
जीवन माझे आहे
मरण माझे आहे
माझा मीच अंतर्यामी तुष्ट आहे
मी एक आत्मनिष्ठ आहे
मी सर्वांचा गुरु
अन् गुरुत्वाकर्षणही मीच
माझ्यातच मी समाविष्ट आहे
मी एक आत्मनिष्ठ आहे
मी स्वयंभू, मी स्वयंभू
आहे भुवनात, आहे गगनात
मीच झालो मला
माझ्याच बाळंतपणात
सांगू नये अशी ही गोष्ट आहे
मी एक आत्मनिष्ठ आहे
अरे आत्मनिष्ठ प्राण्या !
तुझा आत्मा सर्वत्र ना ?
तू लोकात्म्यात कधी रमशील ?
हे लोकराज्य, लोकराज्य
तू लोकनिष्ठ कधी होशील ?

# नाही कशावरून ?

" बेडूक किती जरी फुगला तरी
त्याचा बैल होणे अशक्य ! "
कुणी एक महाभाग
मला टोचून म्हणाला,
माझ्या मनीचा भाव हलला
आणि अंतरात्मा बोलला—
खरंच मला बैल व्हायला नको
मान हलवायला नको
शिंगे डोलवायला नको
मठ्ठ बैल म्हणून
कुणी हिणवायला नको
मी आपला बेडूकच ! मंडूकच !
मंडूक खरा ! परंतु
कधीही न फुगणारा
कधीही न रुसणारा !
माझ्याच नादात
डरांव डरांव ऋचा गात राहीन
आणि त्या माझ्या तंद्रीत
कुणी सांगावे
नव्या युगाचे
एखादे मंडुकोपनिषिद
या मंडुकाच्या तोंडून
बाहेर पडणार नाही, कशावरून ?

# भाषेची अभिलाषा

महिला म्हणते, मी निवडते धान्य
इथे मला भ्रांत पडे
खरे सांगायचे म्हणजे
ती निवडते खडे
हवे ते घ्यावे, नको ते टाकावे
त्याज्य खड्यांचा अनुल्लेख
करिते धान्य ब्रह्माचा सत्कार
महिलांच्या औदार्यांचा
इथेच घडतो साक्षात्कार ! १

आपण जातो गावाला
चालत असतात पाय
गाव दिसते डोळ्यांपुढे
आणि म्हणतो 'आलेच गाव'
एरव्ही आपणच येत असतो
गाव तर तिथल्या तिथे !
परंतु 'गाव आले' म्हणत असतो
इथेच विसरतो मीपण
इथेच बनतो निरहंकार ! २

## हे असे होते !

बहुधा आपणच
आपणाला फसवीत असतो ॥ ध्रु ॥

सत्ता हाती येते
सत्य पळून जाते
नकळत हे असे होते
अज्ञातही सत्यता भासवीत असतो

सत्य हे सत्य आहे
असत्यही एक सत्यच आहे
मनामध्ये मन ठसवीत असतो

हिंसा ही हिंसा आहे
अहिंसेतही हिंसा आहे
बाकी सर्व मीमांसा आहे
असेच काही आडाखे बसवीत असतो

धर्म हा धर्म आहे
निधर्मही धर्मच आहे
यात मोठे वर्म आहे
गीता-बायबल-कुराण पचवीत असतो

सहन-शीलतेसम यातना
संयमाच्या यमयातना
काटकसर अनुभवताना
काट सोडून कसरच कसवीत असतो
नागडे हे नागडे आहे
झाकूनही नागडे आहे
नागडेच झाकायचे ना ?
अहो, नागड्यालाच नागवून नेसल्याला नेसवीत असतो !

## आणि आम्ही

वृक्षावरून फळ खाली पडले
न्यूटनचे मन खालीवर झाले
त्यातच गुरुत्वाकर्षण घडले !

आम्ही काय केले असते ?
पडल्या फळाची आज्ञा समजून
ते फळच केले असते गट्ट
अगदी गुरुप्रसाद म्हणून !

वाफेने उडाले भांड्यावरचे झाकण
वाफेची शक्ती दिसली वॅटला
शोध लागला, कल्पना सुचली नवी

आम्ही काय केले असते ?
त्या उडालेल्या झाकणालाच
हासडली असती एक शिवी
तोंडाच्या वाफेची एवढीच शक्ती !

तो विज्ञानवेडा येडिसन
विधात्याच्या पोटावर पाय देऊन
या बहिऱ्याने केले ध्वनिलेखन

तिखट कानाचे आम्ही कोण ?
तर घर बसल्या ऐकत बसलो ग्रामोफोन !
कसले विज्ञान, कसला बोध !
' भिंतीला कान असतात '
एवढाच आमचा शोध !

आकाशलहरींशी ओळख करून
गला त्यातच तो मार्कोनी
घुमविली जगभर आकाशवाणी
आम्ही बघत राहिलो आकाशाकडे

उंच उंच माना करून
फक्त आकाशलहरी गेल्या
आमच्या डोक्यावरून
अहो, एरियलला कळते
तेही आम्हांला कळले नाही !

स्फुटनिकांचा संचार चंद्रलोकावरी
कागदी बाण उडविणाऱ्या
आम्हांला काय त्याची तमा !

आम्ही फक्त गात बसलो
कोणता मानू चंद्रमा !
नभीचा चंद्र राहिला नभांतरी
भूवरीच्या चंद्रावरच आमची स्वारी !
ते अंतरिक्षात, आम्ही ' आटोरिक्षात !

त्यांचा संचार अंतराळात
दृष्टी अंतर्गोलपटावर
आणि आम्ही मात्र उभे
या पृथ्वीच्या सालपटावर !
सर्व प्रमुख शोधांचे धनी
पाश्चिमात्य विज्ञानयोगी

आम्ही फक्त उपभोगी
ते यंत्रकार, आम्ही दुरुस्तीकार
संशोधक निर्माते सारे तिऱ्हाईत
आम्ही राहिलो फक्त गिऱ्हाईक !

## तीच - तम - जाय

तो एक सामान्य माणूस !
चालला आहे—
बुशकोट लहंग्यातल्या अंगाचे
        संरक्षण करीत
दो पावलांखालची भुई
        तीही त्याची नाही
आलटून पालटून पावले बदलतो
        म्हणूनच तो चालतो
चालतो की जागच्या जागी हालतो ?
तोच जाणे वा त्याचे पाय
तीच तम जाय, तीच तम जाय !        १

वणवण भटकूनही काम न मिळालेला
        तो मजूर
भुक्या पोटाने मनाशीच विचार करी
        घरात चुलीला हीव आले अन्
रुपयाचे शंभर नये पैसे झाले
या एका नया पैशाची
तव्याएवढी भाकर मिळेल का ?
भाकरीसाठी झाला लाचार !
अशी ही लाचारी
ये म्हणून आणि जा म्हणून जाणारी !
पैशाबद्दल प्रीती, भाकरीबद्दल भीती
माणूस शब्दनिष्ठ तर जनावर वस्तुनिष्ठ
‘ हाड ’ ही वस्तु श्वानाला फार प्रिय
हाडाला ते चघळून चघळून खाय
परंतु ‘ हाड ’ शब्द उच्चारला की

जीव घेऊन पळून जाय !
तीच तम जाय, तीच तम जाय ! २

मानवी जीवन, मानवी जीवन
जीवनाला दगडा-फुलांशी तोलतो
फक्त जीवनाबद्दल बोलतो
जगण्याबद्दल प्रेम नाही
विकृताशी मैत्री करीत
भ्रांतीच्या गाड्या भरीत
माती-मसणाची महती गात
जातो जीवनाच्या मर्तिकाला
पारतंत्र्यात तो मरता मरता जगला
आता जगता जगता मरत आहे,
जीवन काय ? मरण काय ?
तीच तम जाय, तीच तम जाय ! ३

असाच भेटतो कुणी झक्की
तोंडात टाकीत तमाकू-फक्की
कल्पना लागते स्फुरू
अन् मग तत्त्वज्ञान होते सुरू
प्राणांतिक उपोषणच करायचे
तर मग जिवंत कशाला रहायचे ?
मरणानेच जगायचे तर मग
स्वर्गात कशाला जायचे ?
अशा शंकाकुशंकांच्या शिंका देत
भकासपणे हासतो
हासता हासता पांढऱ्यावर काळे फासतो
कसलं ध्येय अन् कसलं काय
तीच तम जाय, तीच तम जाय ! ४

मानव्याचे कित्येक प्रयोग झालेत
शिकून विसरणे ही मानवता
येवढे कार्य तो चुकत नाही
बहुधा माणूस हा माणूस राहू शकत नाही
अखेर त्याची करणीच म्हणते
दे माय धरणी ठाय
तीच तम जाय, तीच तम जाय ! ५

आपापल्या धर्माप्रमाणे वागले
फक्त धर्मसंस्थापक
त्यामागे अनुसरती त्यांचे उपासक
मंदिरे, समाध्या, कबरी बांधता बांधता
पुढे धर्म होई केवळ प्रथा
प्रथेतून पदरी पडते व्यथा !
तीमधे प्रगती नसते
सांभाळल्यावाचून गती नसते
धर्मातील मर्म जाते गळून
देव जातो पळून, दैव येते पुढे
हाय रे दैवा, हाय हाय
तीच तम जाय, तीच तम जाय ! ६

देवाधर्मांच्या या भिंती
फक्त दाखविती भीती
भक्ती राहते बाजूला
भीतीचीच चाले पूजा
लाभलेच एकदाचे स्थैर्य
तेच बनते मानवाचे धैर्य !
तीच भक्ती, तीच शक्ती
तीच शांती, दुसरे काय !
तीच तम जाय, तीच तम जाय ! ७

# तसेच आमचे झाले

हृदय-पालटाच्या प्रयोगामधे
        तथ्य असो वा नसो
तो प्रयोग सुरू झाल्यापासून
        हृदयच लटके झाले
अन् भारतात हे
        हृदयविकाराचे झटके आले
हृदयपरिवर्तनाचा झाला
        हृदयपरिस्फोट !
माणूस कसा अगदी
        बोलता बोलता जातो
अन् शोक साजरा करणारा
तडक श्रद्धांजलीचा हार घेऊन येतो
        जीवन जिकिरीचे
        परंतु मरण सुखाचे !
पूर्वी माणूस कसा
अगदी सावकाश मरायचा !
त्याच्या बिछान्याभोती
आप्तमित्र समाचाराला यायचे
कुणी फळे तर कुणी
क्रीमक्रॅकर्स आणायचे
लाडावलेला दुखणेकरी
बोलत असायचा
मुखी गंगाजल पडेपर्यंत
        असाच कुणी
        परंतु मृत्यूची वाट बघणारा !
        प्राण जाता जात नाही

नाडी बंद पडायची बात नाही
तशातच करतो हेवा
तडकाफडकी मरणाराचा !
आम्हांला ब्लड आहे
परंतु प्रेशर नाही
हार्ट आहे
परंतु अटॅक नाही
स्टमक आहे
परंतु आल्सर नाही
ब्रेन आहे परंतु टयूमर नाही
कवटी असून ह्यूमर आहे
म्हणूनच आम्ही जगतो
कुणी उलपत का गिऱ्हा प्रेमी पागल
दिलके हजार तुकडे होऊनही
मरू शकत नाही
अगदी तसेच आमचे झाले !


अनुक्रम ........ दि. ........
ग्रंथांक ........ नोंद दि. ........

## नयनीताल

( या तालाला कसलीही मात्रा चालत नाही. )

नयनीताल नयनीताल
दो नयनांच्या तबल्यावरी
पापण्यांच्या करामतीचे
मुलायम आघात !
रमणींच्या पाणीदार
नयनांची जादुगिरी
उठविते याच तालाचे बोल
प्रणयी जनांना आतल्या आत मार
बोलापेक्षा आडबोलच फार !
या तालाची आवर्तने
आवर्तनातील आकर्षणे
कुणाच्या जन्माच्या भेटी
अन् कुणाच्या ताटातुटी
कुणाला सहवासाचे वरदान
कुणाला उसाशांतले समाधान
'कटि लचकुनी–
किटितक गदिगन धा'
उठले बोल प्रणयंकर
त्या गाधिज मुनीच्या
प्रखर तपावर
असा हा नेत्रपल्लवीतला
मेनकेचा––
पहिलावहिला ताल
समेवर सामील करतो हाच ताल !
क्षणाक्षणाला

लयकारी याची लहऱ्या मारीत
जाते मृगाजिनापासून तर सिंहासनापर्यंत
असा हा तालिवंत ताल
पुसा हवे तर—
आश्रमवासी शकुंतलेला
मेनकेच्या सुकन्येला
नयनशर झाले दर्भांकुर
दर्भांतल्या गर्भांचे भाग्य
या भाग्याने जन्मला भरत
भरताने निर्मिला भारत
असा हा भाग्यवंत ताल !

या तालाला त्याग हवा
तपस्या हवी
तरच त्याची आवर्तने
नाहीपेक्षा—दुर्वर्तने
युगायुगांचे मूग गिळीत
लोटली अयनांवरी अयने
तरी हा नयनीताल
...... चालूच आहे
परव्ही आताही पहा ना !
    या तालाची रंगत
        मोठी अगम्य

शिरशिरीमधे शिरजोरी आहे
हुरहुरीमधे उभारी आहे
उसाशामधे दिलासा आहे
        नाहीमधे होय आहे
अडचणीतही सोय आहे
संकोचातही विकास आहे

मामला मोठा झकास आहे
हा ताल रसाल
तसाच मोठा इरसाल आहे
नयनीताल नयनीताल
प्रणयी जनांचे पुरते हाल !

# एक शल्य !

वर वर पाला ओरपणारे !

तुंध्याला नच कुणि शिवणार

गरुडझेप आकाशामधली

बिळात घुशिला कशि कळणार ?

मान खाली वर्तमानकाळी

भवितव्य इथे का रडणार ?

दुरदर्शी ' दुर्बिणिचे ' थोडे

फटीतुनी बघणारे फार !

## झालाच विनोद !

अलिकडे विनोदाचे —
मोठे कठीण झाले आहे
सारख्या चेहऱ्यामोहऱ्याचे शब्द
साधीत कसला तरी मोका
आले एके ठिकाणी की
झालाच विनोदाचा धोका
भासू नये ते भासले
दिसू नये ते दिसले
सभा हसली—वेडे हसले
की झालाच विनोद !
शब्दांची सालपटे, फोलपटे
चावून चावून झाला चोथा
जे गिळावे ते सारेच शिळे !
काय सांगावी तीच कथा !
जितके उकार, मात्रा, वेलांट्या
त्यावरच मारल्या कोलांट्या
की झालाच विनोद !
शब्दांच्या शेपट्यांना
फजित फटाक्यांच्या लडी बांधून
लावली काडी
की झालाच विनोद !
अट्टाहासाचे हसणे
म्हणजे फक्त दात विचकणे

कुठे शब्द ! त्यांतील अब्द !
शब्दांतील अब्द जाते निघून
' अब्द ' भरणारा विनोदातला
अब्दुलकरीम विरळाच !
एरव्ही शब्दुलकरीमच फार !
असेही काहीतरी घडले की
झालाच विनोद !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम... ५७०१८ वि: काव्य
क्रमांक ... १५५१ नों: दि: २५।१२।६८

## पथ्यपाणी

बालबोधशा घराण्यातला
मोडीतील राहणी
तयाची एक प्रेमकहाणी !

मूळचाच तो भारी चिकित्सक
पथ्याने खायचा
ताकही गाळुनिया प्यायचा !

असाच केव्हा कधी नव्हता तो
प्रेमभांग प्यायला
लागला सिनेसाँग गायला !

कुणास पाहुन मोहित होई
कोण असावी तरी—
बिचारी लग्नाची अस्तुरी !

तरी कसेसेच त्या वाटाया लागले
मन पथ्यातुन कुपथ्यात चालले
ते वखवखलेले ओठ अधिर जाहल

तोच घेतला गालावरती
पदर तिने ओढुन
मिळाले वस्त्रगाळ चुंबन !

# मातलेली माती

रुतले गांडुळ चिखलामाजी
 तले गांडुळ चिखलामाजी !
माती खाशी, मातीत वसशी
माती असशी, मातीत मिळसी !
मातीत जीवन मातीतच मरण
भूमातेला अविरत वंदन
म तीलाच तू राजी
 रुतले गांडुळ चिखलामाजी !

कितीक त्या मात्या !
काळी माती, ढवळी माती
पिवळी माती, तांबडी माती
आणि पुन्हा मातकट माती !
पाण्याने झाला भिन्न भिन्न चिखल !
तितक्याच अंगावरी छटा
मातीच तुला धुंडी
मातीतच सदा मुसंडी
मा ीत सदा मातलेला
माती अन् मस्ती-हेच ते !
दोघींची चढली आवाजी
 रुतले गांडुळ चिखलामाजी !

सुस्तवाल माती
अन् मस्तवाल मस्ती !
बोलता बोलता अन् काय !
दोघींची म्हणे चालली कुस्ती !
माती पुशी मस्तीला
मस्ती पुशी मातीला !

काय पुसे ? काय म्हणे ?
देव जाणे !
चालता चालता
दोघींची झक्कड
गांडुळानेच दिधले
एक उत्तर फक्कड !
' माझ्यात माती
माझ्यात मस्ती !
म्हणतातच मला ' माजलेला '
तुम्हां दोघींचे प्रतीक
अस्मादिक रणगाजी '
रुतले गांडुळ चिखलामाजी !
श्रावण-भाद्रव्यातील
पावसाळी अवस्था
म्हणजेच तुझी युगे युगे
जगतोस का युगे युगे ?
जगशील, जगशील !
तुझे खाद्य धरित्री !
अरे पंकजा गांडुळा
खराच रे तू योगी !
सदा भूमिगत समाधी
जशी तुझी तपस्या
तशी चढे अंगावरी तेजी
रुतले गांडुळ चिखलामाजी
रतले गांडुळ चिखलामाजी !

# पाटा–वरवंटा

'मी पाटा' 'मी वरवंटा'
काळ्या काराची दोन भावंडे
एक जाती, एक खाणी
एक पाथरवट, एक छणी !
एक चल, एक अचल
पाटा म्हणे, 'मी मोठा'
वरवंटा म्हणे, 'असशील मोठा !
जरी मी छोटा–तरी
छोट्यातले मोठेपण माझे !
माझ्याशीच तुझा संघर्ष !'
पाटा म्हणे, 'अरे,
माझ्यावरीच तुझे ओझे
मी संत, मी मोठा
अरे, तू वरवंटा
माझ्यावरी तुझे जीवन !
मी तुझा मालक !'
वरवंटा करी वरतोंड
'तू माझा मालक होय !
मुलुखाचा जडभरत !
जागचा हालेना !
या नव्या युगात
जो मजूर तोच हुजूर !
मी वरवंटा, तू करंटा
मी फिरतो कसून कसून
मी झिजतो पिसून पिसून
युगायुगांचे वाटण करीत !

तुझी कसली बहादरी !
पाट्या पाट्या ! तू भुईसपाट !
मी वरवंटा तुझ्या छातीवरी !'
तोच आली चाहुल
वाजल्या बांगड्या
        निनादली कंकणे
पडले पाणी पाट्यावरी
अन् वरवंट्यावरी !
फिरले मऊ मऊ हात
त्या दोन्ही दगडांगावरी !
खर्र खसंग, खर्र खसंग
चालले शीलासंगीत
आली कानी मंजुळवाणी
' पाट्या पाट्या, पाटलोजीराव !
अन् तू वरवंट्या !
वाट्या वाट्या, वाटलोजीराव !
चला व्हा तय्यार !
आल्या मिरच्या, आले
धणे, जिरे, सुके खोबरे
फिर फिर वरवंट्या, तू पाट्यावरी
        जीवाचे माझे सगे
        अरे, तुम्ही झिजता दोघे
        अन्नब्रह्माकारणी आटाआटी
        तुमचे जीवन मानवांसाठी !'
        खर्र खटंग खर्र खटंग
        झाल्या सुरू वाटाघाटी
                युगायुगांच्या !

## कधी कधी !

कधी कधी असे वाटते
असे वाटते की
काहीच करू नये
लोळ लोळ लोळावे
अंथरुणात घोळावे
या कुशीवरून–त्या कुशीवर
घालावी लोळणफुगडी
डोके टेकीत मऊ उशीवर
संध्यादेवी ' टा, टा ' करीपर्यंत
माझी लाडकी निद्रा—
सरता सरता सरू नये
असे वाटते की
काहीच करू नये

ती लोकल, ती बस
ती ऑफिस–वेळ
ती कुच्यागत जेवणावस्था !
ती घाई–ती धावपळ
कशाला ही यातायात !
नोकरीचे पाश घड्याळाचे दास !
नको नोकरी, नको व्यापार !
नको सट्टा, नको उठाठेव
हवी मात्र एकच देवघेव
झोपा घ्याव्यात अन्
जांभया द्याव्यात !
घोर नसावा कसलाही

झोपेमधे घोरूदेखील नये
असे वाटते, असे वाटते
की, काहीच करू नये ! २

कर्मयोगी म्हणती
' सदा असावे कर्तव्यात दंग
आळस अंगी शिरू नये
कर्म करीत रहा, बाप हो !
फळाची आशा धरू नये. '
अहो फळच नाही — तर
करायचे काय ? कर्म ?
एवढे मात्र अगदी खरे
हातपाय हलवू नये
दस-बीस कोस चालू नये
त्याच बरोबर
' राधेकृष्ण बोल मुखसे '
कृष्णनामही स्मरू नये
असे वाटते की
काहीच करू नये ! ३

न कर्त्यांचा वार शनिवार
अन् आरामाचा रविवार !
आराम हराम कसला ?
त्यातही येतोच ' राम '
एरव्ही क्रियाशील वारीही
चाखावा मनसोक्त
चुटकीसरशी जांभयांचा आनंद
आणि निद्रेचा आनंदकंद

कुणी आळशी म्हणा वा
आळशीचे तेल म्हणा !
लोळ लोळ लोळावे
अंथरुणात घोळावे
निजावे, पुन्हा उठावे
उठून डोळे चोळावे
जरा लोडाशी लाड करीत
पाठीराखा म्हणून त्याच्याशी खेटावे
        परत पुन्हा लेटावे
        निद्रानंद निद्रानंद
अशा त्या आनंदात
कविता देखील स्फुरू नये
असे वाटते की
        काहीच करू नये !                ४

## चक्की

गेले जाते, आले येते
झाले सुरू यंत्रयुग
चक्कीवरी चालले दळण
पडती पिठाचे ढीग
वर्तुळाकार कुरुंगी शिळांवरी
चढला चामडी पट्टा
पक् पक् पिंगा घालीत
चालली जात्याची थट्टा !
चक्कीवरचा ‘ दळभंजन ’
रसरंगी रसाल
नाव त्याचे ‘ रंग्या ’,
तसाच तो इरसाल !
येती रोज दळणवाल्या
गेल्या जुन्या, आल्या नव्या
जात्याची झाली चक्की
ओव्यांच्या झाल्या शिव्या !
ऐकल्या पूर्वी मनभरून
त्या जात्यावरील ओव्या
चाखिला निरागस आनंद
आता ऐका चक्कीवरचा
आमच्या रंग्याचा मुक्तछंद
“ काय आलीस ? बरीच नटली सजली
अन् बऱ्याच दिसानं बांगडी वाजली !
आण तुझं दळण !
किती पायल्या ? ”
“ बाजरीची एक अन् जवारी एक
दोन पाल्या वायल्या वायल्या ! ”

" मग काय गंगू, चलतेस का ?
आज शिनेमा हाये ' शहनाई ' "
दळणाचे नरसाळे झटकीत
रंग्या करतो हळूच कारवाई !
" चल मी नाही यायची !
जा मेल्या, तूच मर जा ! "
अन् तेव्हाशीच हलतो
गंगूच्या नाकावर सरजा !
" अन् काय ग रंगू !
बरी पिवळी धम्मक पाटी
मक्का आणलास वाटतं
दे तुझा मुका—नव्हं मका !
वा वा लई मस्त, लई नामी !
चल आण. किती ग ? "
" पायलीला पावशेर कमी ! "
" का ग नाहीस गेली
नवऱ्याकडं नांदायला ?
टाकम् टिकाकि लावुन टिकली ! "
" अरं टिकलीच्या, जरा बारीक दळ !
तुझ्या तोंडाला इचु झुंबला ! "
मधेच पडते इंजन बंद !
—चाकावरचा पट्टा पडून—
रंग्याच्या जिभेचा पट्टा होतो सुरू
" अरे ये खुळुक कोंबडीच्या !
बेंज्या, काय मारतोस बंडल !
बघतोस बायकांची तोंडं
फिरव चाक, मार हँडल ! "
आणि मग बीभत्सही झाला लाजरा

सारे षष्ठ्यंत प्रत्यय लागुन
बेंज्याचा होतो मातृदिन साजरा !
हो ना करता कसे तरी
चक्र लागते फिरू
झक्कड संपून चक्कीचा मग
पक् पक् पिंगा होतो सुरू !
" अन् ये म्हातारे, तू कशाला इथं ?
बरं चल, आण पाटी
सखू कुठं गेली ? "
( सहज आलं ओठी )
" अरे, सकू नही सकू ?
आता ती सकीना, सकीना !
दिसल तुला पडद्यावर !
माझीच लेक ती
शिनेमात गेली शिनेमात ! "
" काय सिनेमात ? अन् तूही व्हतीस ? "
रंग्या होतो आश्चर्यचकित !
' म्हातारी खंगलेली पण—
दिसतो तोच थाट !
तलवार गंजलेली पण—
वाटतो तोच काट '
एक ना दोन येती
कितीक दळणाची गिऱ्हाइके
तऱ्हेवाईकांच्या तऱ्हा !
असेच दिवसभर
आरबट चरबट !
बसले गप्पा छाटीत
यंत्र खाते क्रूडॉईल

पीठ पडते पाटीत
आली चक्की, गेले जाते
रेशन घातले दळाया
पीठ माणसाला खाते !
उतरला पट्टा, चक्की पडते बंद
आणि मग संपतो
रंग्याचा हा असा मुक्तछंद !

## कधी नव्हत

कधी नव्हत मनोदेवता म्हणाली
एकदा तरी खुल्या दिलाने
लिहीच आता ‘ खेटरावरी ’
एखादी सुंदर कविता
खेटरावरी ? आणि सुंदर ?
सनसनाटली वृत्ती सनातन
झाली जागृत, बनली ताठर
आणि घृणेने नाक मुरडिले
काय कुणाचे अडले खेटर ?
तोच दंभ अन् अहंकारही
खेटर घेउन आले स्वकरी
काय करावे माझेही पण
तोंड जहाले खेटरापरी !
तसाच मी मग पुढे सरकलो
तंद्रीमाजी चालत होतो
ध्वनी आदळे माझ्या कानी
खड्खड्‌ चट्‌चट्‌ कसला तरी तो

आम्ही खडावा, आम्ही खडावा
पूज्यपदांची प्रतिके सारी
मजला दिसल्या आणि बोलल्या
दोन पादुका समाधीवरी
केले वंदन हात जोडुनी
आशय कळला मला त्यातला
संतयोगियांसमही माझा
गुणगुणला आवाज आतला—

मानवा, तुझ्या पायाच्या पुण्याईने

झाला खेटराचा जन्म !
खेटर असो चामड्याचे
असो रबराचे, असो कापडाचे
खेटर असो लाकडाचे, गवताचे
कशाचे का असेना
भिन्नत्वाचे सारे भास आहेत
सर्वांचे कार्य एक
पायांचे ते दास आहेत !
दास म्हटले तरी
मिजास त्यांची मोठी आहे
इथे पाहिजे साक्षात्कार !
माया सगळी खोटी आहे !
पायातले खेटर पायातच !
म्हण जुनी, लक्षण निघते नवे !
संतापाच्या भरात
पायातले खेटर हातामधे येते
तळव्याची आग
मस्तकाला भिडली म्हणजे
ते हातातले खेटर
कुणाच्या तरी बसते टाळक्यावर !

पायातले थेट डोक्यावर !
उच्च पातळीचा शोध
म्हणजेच तत्त्वबोध !
अहिंसक चामड्याची काय
हिंसक चामड्याची काय
खेटरे तेथून एकच !
काही चावतात, काही भावतात !
चावतात ती हिंसक

भावतात ती अहिंसक
खरे काय अन् खोटे काय
जाणे खेटर, जाणे पाय !

रे चर्मकारा !
मानवाच्या पायाकडे तुझे लक्ष
बोचतील खडे, टोचतील काटे
तुलाच सर्व जगाची टोचणी
जनताजनार्दनाच्या पायांना
या खेटरांचा सहारा आहे
मेजावरती खेटर आहे
सभेमाजी खेटर आहे
रंगभूमीवर खेटर आहे
अंगभूमीशी खेटर आहे
शालजोडीत खेटर आहे
' चांभाराच्या देवाला खेटराची पूजा ! '
अरेरे ! चांभार हा मानवच ना !
चांभाराचा देव
तोच मानवांचा
एकूण देवालाही खेटर प्यारे
हेतु एक, प्रकार न्यारे !
चर्मपुष्पांच्या माळा
पडती ज्याच्या गळा
तोही एक मानव आगळा !

चिडखोर भाषा संपली
ते शब्द संपले म्हणजे
शिव्या निर्माण होतात
आणि त्या शिव्या संपल्या म्हणजे
अखेर खेटर हाती येते

मानवी जीवनातील खेटर हे
मोठे प्रभावी शस्त्र आहे
काय बोलू अन् किती बोलू ?
परमेश्वराच्या इच्छेवरच
काव्यब्रह्म बोलते आहे
त्याच्या इच्छेवरच
सारे ब्रह्मांड डोलते आहे
अन् खेटराच्या जिवावर
सारी जनता चालते आहे !

# यंव रे शिकार!

एकटाच हिंडता हिंडता
गेलो होतो शिकारीस मी
एक हरिण दिसता सामोरी
धरिली माझी बन्दुक नामी
नेम धरिला तो अग्या की
काय सांगू राव तुम्हां
बंदुक पुढे अन डोळा मागे १

चाप खेचता मी जोराने
हरीण बेटे सुटले चौखूर
माझी गोळी काय कमी हो
तीही सुटली त्या हरिणावर!
चालली जोरात ऐसी
काय सांगू राव तुम्हां
हरिण पुढे अन् गोळी मागे
हरिण पुढे अन् गोळी मागे २

हरिण चपळ मुलुखाचे
थकता थकता थकेचिना
अचपळ गोळी त्या हरिणावर
बसता बसता बसेचिना
तोच पुढे ये मोठा खळगा
हरिण जरासे त्यात गचकले
उडी मारुनी कसेतरी हो
जोरात पुन्हा पळू लागले
काय सांगू राव आता
व्हायचे झालेच ते
गोळी पुढे अन् हरिण मागे
गोळी पुढे अन् हरिण मागे ३

गोळी चपळ मुलुखाची
थकता थकता थकेचिना
अचपळ हरिण त्या गोळीवर
बसता बसता बसेचिना
पुढती ये खडकाचा सुळका
बसे ताडकन् गोळी त्यावर
गोळी परतली उलट दिशेने
हरिण चालले पुढेच सरसर
काय सांगू राव आता
झाली वाताहात ही
गोळी कुठे अन् हरिण कुठे !
गोळी कुठे अन् हरिण कुठे ! ४

जिवानिशी तर हरीण सुटले
कुठेतरी झुडुपात दडे
बघता बघता आणि नेमकी
गोळी ये अमुच्याचकडे
राहिली बन्दूक जागी
काय सांगू कर्म आता
आम्ही पुढे अन् गोळी मागे !
आम्ही पुढे अन् गोळी मागे ! ५

## वगैरे–वगैरे

कुणात प्रसाद, कुणात ओज
कुणात प्रतिभा, कुणात तेज !
कुणात कल्पनाशक्ती, कुणात भाव
कुणात देशभक्ती, कुणात चेव !
        कुणी नेते, कुणी द्रष्टे
उच्चत्वाची उंचावली शिखरे
        आम्ही आपले वगैरे वगैरे ! १

    कसल्याही मूल्यामधे
        ज्यांना नाही कुठे व्यत्यय
    साहित्यगुणांचे भाववाचक
    भावदर्शीयत्वता प्रत्यय !
कुणात गूढता, कुणात मानव्यता
कुणात दुर्बोधता, कुणात शब्दगाम्भुल्य
कुणात चावट्यता, कुणात फाजिल्य !
    अग्रगणी ते शोभती सारे
        आम्ही आपले वगैरे वगैरे ! २

    बोलायचे असूनही
        जे बोलता येत नाही
    लिहायचे असूनही
        जे लिहिता येत नाही
    करायचे असूनही
        जे करता येत नाही
    तेच सारे वगैरे वगैरे
    पूर्णत्व राहते अपुरे अपुरे
        आम्ही आपले वगैरे वगैरे ! ३

    वगैरेत काही गैर नाही
        कुणामधे वैर नाही

जिकडे तिकडे खैर आहे
वगैरे वगैरे वाचून
प्रमुखाला शोभा नाही
चंद्र मोठा, तारे वगैरे वगैरे
आत्मा महान्, जीव वगैरे वगैरे
सागर अथांग, नद्या वगैरे वगैरे
अरे अथांगाची किमया
जाणतात किनारे !
आम्ही आपले वगैरे वगैरे ! ४
वगैरे वगैरे म्हणजे
मोठा सहनशील शब्द
अब्द घेऊन आलेला
असा हा शब्द
सर्वांआधी फारशीतून आला
मराठीमधे मराठीमय झाला
इतरांपरी नाही चावटी
राहतो सर्वांच्या शेवटी शेवटी
टीकाकारांना तेवढीच सोय !
' विस्मरणाचे ढोंग ' वगैरे वगैरे
' टाळाटाळीचे सोंग ' वगैरे वगैरे
येरू म्हणतील तोच महान्
बाकी सारे लहान सहान
टाकावू अन् अहिरे गहिरे
आम्ही आपले वगैरे वगैरे ! ५
आम्ही कोण ? आम्ही कोण ?
कोण म्हणून काय पुसता ?
अज्ञेयाच्या अंध तमातिल
युगायुगांचे सगेसोयरे
आम्ही आपले वगैरे वगैरे ! ६

## सिगारेट

गमत किति गोड तुझा झुरका !

धवल रूप तव नवल परीचे
नांव गोंदिले वरति कुणाचे ?
तव बांधा गोंडस ओढ लावि नित रसिका

नाही रुसणी फुगणी
सुखे नांदता तुम्ही दहाजणि
प्रगटता हसत सारिता रुपेरी बुरखा

पत्नि नाचवी मज बोटावर
तुझा नाच परी मम बोटावर
खचित तो फिका तुजपुढे रमणिचा झुरका !

'प्रेमाची ही त्याग कसोटी'
शिकवित तुज काड्यांची पेटी
शिर आपटुनी वंदिशी तिला वरिवरि का ?

धूर ओढिता ऊर भरविशी
धूर सोडिता नूर खुलविशी
तो धूर न पूरच दावि प्रेममय प्रतिका

धुंदी चढता लाविसि चेटुक
झिजत झिजत जरि उरले थोटुक
बोटास आणि ओठास लागतो चटका

रक्षापात्री नेता तुजसी
तुझे मरण तू डोळा बघसी

तू खरी योगिनी जीवनातली तरिका
गमत किति गोड तुझा झुरका !

अनुक्रम
क्रमांक ९८८९ दि. २५।१२।५६

## कठीण प्रसंग !

धीरे दाढी तास रे, सलूनवाला भैय्या

दाढी माझी रखरखीत ही
आडदांड तव हात
असे गिऱ्हाइक तुला मिळाले
योग अजब हा खास रे, धीरे दाढी तास रे !

हातचलाखी फिरत शिळेवरि
सटल-फटक वरताण
खरखर तरि तव हत्यार वाजे
साबण जादा फास रे, धीरे दाढी तास रे !

फेसाळत कुंचला मुखावरि
'साबुदाणि' बरबाद
वदन हिमालय, तिथुनि वाहती
गंगा—यमुना साच रे, धीरे दाढी तास रे !

सुगंध माफक तव साबूचा
सुखविताच तितुक्यात
मद्दड तव हाताला येतो
कंदर्पांचा वास रे, धीरे दाढी तास रे !

चामखिळा रक्ताळुनि झाली
श्रीमुख-शोभा छान
दे दे दुःखावरी डागण्या
सरसर तुरटी घास रे, धीरे दाढी तास रे !

पाण्याचे कर पुरे फवारे
आधिच झालो गार
तोंडपुसा तव तशात बवता
काटा ये अंगास रे, धीरे दाढी तास रे !

स्नो लावुनिया वरी पावडर—
फासियसी जणु राख
विरक्त होउन हृदयी लागे
परमार्थाची प्यास रे, धीरे दाढी तास रे !

मनात येते दाढी वाढवुन
जावे दूर वनात
दोन-आणेली खर्चुन परि हा
नको नको वनवास रे, धीरे दाढी तास रे !

# तरंग

येई नाचत शारदा
देहभान लागे सरू
माझ्या मनीचे तरंग
तिच्या पायीचे घुंगुरू

* * *

ईश वदे, " माझे गूढ
कळे थोडेसे मानवा
गूढ अखेरी जे राही
पूर्ण ठावे मुक्या जीवा ! "

* * *

अनंत लाटांखालती
निजे अथांग सागर
अनंत श्वासांखाली
तसे जीवन निसूर

* * *

ऐका जीवनसंगीत
चाले आयुष्यी भैरव
तारुण्यातुनी आरोह
जरेतुनी अवरोह !

* * *

" धरित्री मी तुझी माता
पाय देसी माझ्या उरी
झुके जे माझ्या चरणी
त्या नभाते धरिसी शिरी ! "

* * *

तरंग : १७७

कुणी तोडो फळे-फुले
कुणी घालो अंगी घाव
वृक्ष शिरे माझ्या कुशी
मातृ-भक्ती याचे नाव !

* * *

फेकी निर्माल्य लाटांनी
रत्नाकर पाखडून
आईकरीच्या सूपाची
झाली मज आठवण !

* * *

अंगी ठोकीयल्या मेखा
पोटावरी तार ताणे
लावूनिया गळा तात
शिकली सारंगी गाणे

* * *

मुखी चर्माच्या मुसक्या
ओठी घाव दे हातोडी
वरी बैसता तडाखे
बोले तबल्याची जोडी !

* * *

कुमारी होत गृहिणी
लाभता पति-बंधने
कल्पना कविता होई
लेवुनी छंदबंधने !

* * *

मुखावरी तेज फाके
जात्याच तू चंद्रमुखी
काळ्या केशकलापाची
मागे दाटली काळोखी !

* * *

केश तुझे काळेभोर
येती गौर गालांवरी
काळोखाने पहा केली
भर चांदण्यात चोरी !

## थांब रसिका

थांब रसिका, जासि कैसा ? फूल घे हे हुंगुनी
नाही ती पहिली कळी मी
फूल नुकते हे खुले
पाकळ्या जातील वाया, हाय माती होउनी

जगत जगते कशासाठी ?
जगत प्रेमासाठी ना ?
एकल्या प्रेमाविना मग व्यर्थ जन्मावे कुणी ?

फेक थोडी नजर खाली
शुष्क सुमने ती किती !
का अखेरी त्यापरी मी सांग जावे वाळुनी ?

रूप नाही, रंग नाही
गंध नाही, कुणि म्हणे
निर्मिणारा तो विधाता अज्ञ ठरला का जनी ?

## मागणे

देवा, तुझी कृपा मजवरी भारी
सदा मी भिकारी तुजपु
मनीच्या कामना तूच पुरवीता
सख्या, तूच दाता तुझ्यासम
देसी मज भिक्षा येता मी दाराशी
जाहलो मिराशी ऐसा तुझा
जन हे बोलती जन्माचा अधाशी
सदा देवापाशी धाव घेतो
कुणी म्हणो काही मजसी टोचूनी
परि मम मनी एक चिंता
तुझ्या दारातून फिरता माघारी
झोळी होत सारी रिकामी ही
पाहिले एकदा डोळे उघडोनी
पुरते कळोनी आले मज
अरे रे रे देवा, माया ही लटकी
तळाशी फाटकी झोळी माझी
अजूनही येतो देवा, तुझ्या दारी
घेऊनिया करी हीच झोळी
मुक्त हस्ते देसी भिक्षा प्रेमे मला
देवा, तूही खुळा झाला का रे ?

## का उदास बसता ?

का उदास बसता ? हसा हसा !
तो चंद्र हासतो नभी जसा
मेघ आडवा क्षणभरि आला
म्लान चंद्रमा म्हणती जहाला
निस्तेज जरी वरि-वरि दिसला
परि प्रकाश अंतरि जसा तसा !
का उदास बसता ? हसा हसा !

विसरूनि आपुल्या आनंदाते
रडगाणे जग आधिच गाते
साथ द्यावया आणिक त्याते
भेसूर सूर का मिळवितसा ?
का उदास बसता ? हसा हसा !

लुटा लुटा रे शीतल किरणे
खळी करूनिया अंतःकरणे
हसा हसा तर उत्साहाने
आनंद भरा जगि हवा तसा
का उदास बसता ? हसा हसा !

## तू मोहळ

झालि प्रभो, गत ऐशी
तू मोहळ, मी मधमाशी
फुले बहरली अनंत भुवनी
चाखुन घेऊ रस किति त्यातुनि !
गोंधळून जरि जात मन्मनी
पाहुन करणी ऐसी, तू मोहळ, मी मधमाशी
तुझ्या कृपेने मधू मिळविला
तुलाच प्रेमे प्रभो, अर्पिला
फिरुन त्यावरी देह वाढला
असेच देणे देसी, तूं मोहळ, मी मधमाशी
अलिगण गुंगे फुलांभोवते
गात तुझे गुण मजला गमते
मधु मिळवी परि स्वार्था–परते
त्यांसहि हृदयी धरिसी, तू मोहळ, मी मधमाशी
कळावयाचे अमुचे मीपण
निमित्तमात्रचि होसी आपण
यांतच देवा, तुझे देवपण
अजब तुझ्या गुणराशी, तूं मोहळ, मी मधमाशी

## कालचक्र

ऐश्वर्यांचे आठविता दिन हृदय अहा धडधडे
भूल का अशी मनाला पडे ?
गत विभवाचा शोक कशाला ? विचार आला मनी
परंतू अश्रु येति लोचनी
ती छत्रचामरे धुळीत जाती क्षणी
मज दास-दासिही गेले झिटकारुनी
हे महाल--वाडे हसती वेडावुनी
नयनांवरचे अश्रू लपवित खालीवर पाहुनी
भटकतो उघडा रस्त्यातुनी
सुखदुःखाच्या ऊन-सावल्या लपंडाव खेळती
कशाची नसे तयांना क्षिती
आज विराजे मुगुट शिरावर, उद्या झोळि लाभते
बदल हा कालचक्र घडविते
त्या कालाची ही पडता दारुण उडी
भाग्यदेवि गेली मारुन कोठे दडी !
ठेवुनी मला ही अखेरची झोपडी
गरिबांचे मी स्वराज्य स्थापिन याच झोपडीतुनी
तयांचे दैन्य पुरे नाशुनी !

## विश्वसंगीत

गर गर फिरतो खगोलातुनी पृथ्विगोल भोवरा
गुंगवी स्वर अखिल चराचरा
षड्ज सूर हा अखंड धरुनी
वसुंधरा सखि धून लावुनी
स्थिराचरांना सवे घेउनी
अखंड घाली प्रदक्षिणा त्या तेजोमय भास्करा
गुंगवी स्वरे अखिल चराचरा
ताल धरिति या दिवस-यामिनी
संध्या पेंगत काल सोडुनी
ताल यापुढे विरतो स्वप्नी
उदय-समेवरि झांज वाजवी उषादेवि सुंदरा
समेवरि सामिल होई धरा
अनंत ग्रहमालांच्या स्पर्शे
सूर निघति नित नव्या श्रुतींचे
पडदे छेडित नाना परिचे
पवन विहरतो हुडकित अवघ्या संगीताच्या तऱ्हा
नादवित अनंत क्षितिजांतरा
कर्णांपलिकडल्या त्या श्रवणा
वर्णांपलिकडल्याहि भावना
कोण करी निःशब्द योजना ?
स्थायी भाव न अंत, जयाचा अस्थायी अंतरा
गहरला विश्वराग शंकरा
अनंत गोलांतील असे स्वन
वादी-संवादींचे मीलन
बनले ब्रह्मांडाचे गायन
जीव हासतो, जीव नाचतो हसवित परमेश्वरा
नादवित अनंत क्षितिजांतरा

# इषारा

झोक तोल, तोल, तोल ग, आडाचं पाणि लइ खोल !

आईला आनंद द्यावया
मनापासुनी करिशी सेवा
विसरून जाशी अपुल्या जीवा
कष्ट तुझे बिनमोल ग, आडाचं पाणि लइ खोल !

रहाट, कप्पी नसति साधने
पाणि काढिशी दो हाताने
कोठवरी तू अशा रितीने
जीव दमविशी ? बोल ग, आडाचं पाणि लइ खोल !

ओढुनिया पोहरा भराभर
कडेवरी आडाच्या भयकर
आधार नसे कसला लवभर
जाइल मध्येच झोल ग, आडाचं पाणि लई खोल !

भयसूचक हा ध्वनी कशाचा ?
ऐक गडे, पडसाद तयाचा
यमरायाच्या दरबारीचा
वाजतसे बघ ढोल ग, आडाचं पाणि लइ खोल !

क्षणभंगुर हे जीवित बाई
निघावयाची करिते घाई
चंचलतेला सीमा नाही
उडेल बघ चंडोल ग, आडाचं पाणि लइ खोल !

साधुसंत ते गेले सांगुनि
बोल तयांचे मनात आणी
बोलत नाही वेड्यावाणी
उगाच अपुला फोल ग, आडाचं पाणि लइ खोल !

# पूर्णता अखेरिस

पूर्णता अखेरिस अपूर्णता होतसे
कृति म्हणे, मी पूर्ण, संपूर्ण परिपूर्ण !
मति शोधितसे पूर्णतेचे उणेपण
भरला घट शिगोशिग

परि भास्कर येतो तस्कर होउनि
पोषण करणारा करितो शोषण !
घटतसे भरला घट
वाऱ्यावरी मिळतसे
पूर्णता अखेरिस अपूर्णता होतसे !

येते पूर्णत्व हजिरी लावण्यापुरते
अपूर्णत्वाचा शिक्का घेऊन
जाते निघून पूर्णब्रह्म परमेश्वराकडे
बैसला चित्रकार चित्रयोगी

समोरी रंगांची लयलूट
रंगारंगांच्या छटा
त्यातही पडतसे तूट
होतसे कुंचलीची कुचंबणा !
अनंत रंग रंगविणारा श्रीरंग स्मरता
संकुचित कुंचली बनते निःसंकोच !

आणि जाते रंगत
चित्रकाराची कलाकृती
तरी त्यातही दिसे उणेपण
मनासारिखे चित्र न दिसे
पूर्णता अखेरिस अपूर्णता होतसे !

गानयोगी करिती स्वरसाधना
स्वरावरी स्वार होऊन
तालाच्या कलाकलाने
अन् श्रुतींच्या बळाने
जाती दिगंत धुंडीत
नादब्रह्मासी भेटता भेटता
अखेर होती आगतिक
जिरती आलाप, विरती ताना
वदती दिगंतव्यापी नारायणा
मी पुष्कळ अजुनी उणा !
दिगंतच मौनराग गात बसे
पूर्णता अखेरीस अपूर्णता होतसे !

महान योगी करिती तपस्या
पंचतत्त्वांच्या पाचुंद्यांनी
करिती ब्रह्मांडाचे मोजमाप
योगसाधना, योगसाधना !
योगाआधी होतो प्रयोग !
पूर्णतेचे श्वास अन्
अपूर्णतेचे उच्छ्वास !
पूर्णापूर्णाचा लपंडाव !
आत्मा धुंडितो परमात्म्याला !
तसा तसा दशांगुले उरतसे
अपूर्णतेत संग्राम, अपूर्णतेत चेतना
अपूर्णतेत भक्ती, अपूर्णतेत भावना !
अपूर्णतेत संघर्ष, अपूर्णतेत वेदना !
पूर्णत्व म्हणजे अपूर्णाचा प्रारंभ
पूर्णब्रह्म परमेश्वर हसे
पूर्णता अखेरिस अपूर्णता होतसे !

# तू एकला !

मजभोवती स्नेही–सखे
गणगोतही मजभोवती
समवेत जन्माची सखी
घरि बालकेही खेळती
परि अंतरात्मा बोलला
तू एकला, तू एकला ! १

माझ्या मनोमय मैत्रिणी
किति भावना, किति कल्पना
अन् येथ पिंगा घालिती
कधि वासना, कधि कामना
परि वेदना पटवी मला
तू एकला, तू एकला ! २

' वच नांदते तुजसंगती '
वदली पथी मम सावली
येताच गेही चालुनी
छायेत कोठे लोपली !
माया तदा हिणवी मला
तू एकला, तू एकला ३

मजला सभा–संमेलनी
किति लाभली अभिनंदने
ते हार, पारीतोषिके
मज वंदिता ही बंधने
हसली पदीचा शृंखला
तू एकला, तू एकला ४

कधि मीच माझ्या कारणी
स्थिर पावतो एकाग्रता
रमता प्रभूच्या चिंतनी
मज डोलवी तल्लीनता
तरि मीपणा खुणवी मला
तूं एकला, तू एकला ! ५

या श्वास–उच्छ्वासातुनी
लहरे शरीरी चेतना
कालासवे करिती परी
ही पंच तत्त्वे वंचना
जरि आज पंचत्वातला
तू एकला, तू एकला ! ६

मज साथ देती त्या श्रुती
ग्रहमालिकेतुन नादता
या विश्वगानाच्या श्रुती
संवेदना झंकारता
ॐकारही हुंकारला
तू एकला, तू एकला ! ७

## असेच काहीतरी

असेच काहीतरी
फक्त भासलेले
आभासातच असलेले
असेच काहीतरी ?
असेच काहीतरी
अनुमान केलेले
अनुभवात न आलेले
असेच काहीतरी
जरा समजलेले
समजून न उमजलेले
असेच काहीतरी
असेच काहीतरी
मुठीत भरलेले
भरून हरवलेले
असेच काहीतरी
असेच काहीतरी
क्षणमात्र दिसलेले
दिसून पुसलेले
असेच काहीतरी
असेच काहीतरी
जवळ असलेले
असून नसलेले
असेच काहीतरी
असेच काहीतरी
स्वरूपात नटलेले
अरुपात भेटलेले
असेच काहीतरी
माझ्यामधे स्थिरावलेले
माझ्यातच दुरावलेले
असेच काहीतरी !

## सौंदर्य म्हणाले—

सौंदर्य म्हणाले विधात्यास एकदा
" मजवरीच का उधळिलीस ही संपदा ?
मज पहात कोणी निरखित हर्षभराने
भिरभिरली आणिक खिळली कितीक नयने !
लोभले कितिक ते झुरुनी झाले विद्ध
लाभास्तव माझ्या कुणी खेळले युद्ध !
कवणास हलाहल, कुणा लाभली सुधा "
सौंदर्य म्हणाले विधात्यास एकदा

" कितिकदा मला नीतिचे नियंत्रण आले
परि तेच जगी रसिकांसि निमंत्रण झाले
वानिले मुक्तकंठे अन् गौरव केले
अभिनंदन माझे बंधन मजला झाले
तू उदारतेने दिली जरी सुंदरता
माझाच मला हा ताप जाहला पुरता
हे सौख्य गणू की मानू मी आपदा ? "
सौंदर्य म्हणाले विधात्यास एकदा

तो झुळुकीसरशी हले तृणाचे पाते
हासून विधाता वदला सौंदर्याते —
" जे फुलले, खुलले, वाढत वाढत वठले
ते सर्व चराचर सौंदर्याने नटले
जेधवा निर्मिली माझि मीच ही सृष्टी
अन् दिली मानवा वेगवेगळी दृष्टी

सौंदर्यशोध हे दृष्टिदृष्टिचे कार्य
ज्या दृष्ट लागते तेच ठरे सौंदर्य !
जे निसर्गातुनी सौंदर्य जगी जडते
औदार्य न माझे सहजचि हस्ते घडते
तूं सुखवी रमवी, हीच तुझी रे शांती
सौंदर्या, इतुका बनू नको वेदान्ती ! ”

# काव्य-शास्त्र-विनोद

व्याधाने मारिता बाण
क्रौंच पक्षाच्या युगुलावरी
कळवळले श्रीवाल्मिकी
“ रे व्याधा, रे व्याधा, हात आवरी ”
हे जगातील पहिले काव्य !
बसता बाण वर्मी
प्राण जाता जाता
चोचीत चोच घालुनी
क्रौंच पक्षी वदे
“ अरे, बाण लागुनी मरा
परी मरता मरता प्रीती करा ”
हे जगातील पहिले शास्त्र
काव्य अन् शास्त्र जन्मले
ज्या वृक्षावरती
त्याच वृक्षाखाली
बसला होता कुणी
ध्यानधारणा करीत
मारून मुटकून ब्रह्मचारी
निष्प्राण क्रौंच पक्षी पडला
बदकन् त्याच्या शिरावरी
“ अरे बापरे भूत भूत ! ”
उठला ब्रह्मचारी किंचाळत
ठोकली धूम थेट घराला
आणि मग ? आपसुक—
लागला सरळ संसाराला
हा जगातील पहिला विनोद !

## इंजन

झुक् झुक् ऐटित चाले इंजन
फिरती चक्रे अंतर कापित
शीघ्र गतीने काल कटविते
हव्या हव्या त्या वस्तू घडवुनि
भव्य भव्य वस्तूस उडविते
सुखवी, रमवी करिते भंजन
धडक् धडक हे चाले इंजन

फिरते पृथ्वी, फिरते चक्रहि
गतीतुनी बघ कृती गवसते
गतीमान जगती प्रगतीचे
यथार्थ दर्शन येथे घडते
मंत्रहि बोले, "अलख निरंजन"
झुक् झुक् ऐटित चाले इंजन

मनापासुनी मंत्र आणखी
तनापासुनी तंत्र जन्मले
आणि मानवी यत्नांपासुन
शोधशोधिता यंत्र निघाले
निसर्गासही घालित अंजन
झपक् झपक् हे चाले इंजन

वदती कोणी यंत्राने या
मानव्याचा घात जाहला
अरे मानवा, शोध तुझा हा
बोध करावा कुणी कुणाला ?
उकला गूढामधले गुंजन
गुंइगुंई सुंइसुंइं चाले इंजन

गळयात पडता यंत्र मानवा !
तुला तयाचा लळा लागला
दिला तयातुन प्राण ओतुनी
आणि स्वता तू यंत्र जहाला
करा एकमेकांचे रंजन
फिरवित चक्रे चाले इंजन !

# काळ चालला पुढे !

काळ चालला पुढे भराभर
इतिहासाची उलटित पाने !
कधी न बघतो वळुनी मागे
पुढेच जाणे याचा बाणा
आणि मागुती घुटमळतातीं
कालमापनाची अभिधाने
वर्तमान मार्गाने जाई
करित भविष्यांची ती भूते
जात अनंताकडे घालुनी
दिवस-रात्रिची पादत्राणे
दैन्यांची बनवीत वैभवे
करित पुन्हा होत्याचे नव्हते
' जन्म हाच मृत्युचा इषारा '
देत अशी जगता वरदाने
येता अडवायाला मार्गी
सम्राट कुणी वा हटयोगी
करुनी कौतुक क्षणभर त्यांच्या
तोंडालागी पुसशी पाने
कधी उधळिशी सुवर्णसंधी
कधी आपदा जादूगारा
अनंत हस्ते देत अम्हांला
नजरबंदिचे हे नजराणे
मिठी मारुनी जोवरि मानव
बसला रे तुझिया मानेवर
बेलगाम जा कितिही काळा
घडवि पुन्हा इतिहास नव्याने !

## प्रवासी

कुठे चाललो, कसा चाललो
कळते सारे मजला काही
माझ्या मी चिंतनी रंगता
प्रवास माझा चालत राही
भूगर्भाचा शोध लाविता
नजर नेमकी वरती खेळे
नभी पाहता चंद्र–चांदण्या
तळपायांना फुटती डोळे
म्हणोत कोणी भले कुणीही
असा कसा हा खुळा प्रवासी ?
माझा मी चाललो एकटा
माझे हितगुज माझ्यापाशी
श्रेय-प्रेय ते माझ्या जवळी
इथे न कसला गाजावाजा
मला गवसते, पुन्हा हरवते
हरवण्यातही लाभच माझा !
प्रश्नांचीही होत उत्तरे
अनाहूत हे बोल कुणाचे ?
प्रभो, माझिया प्रवासात या
तुझ्याच मंगल सहवासाचे
एक एक उमटता पाउले
मनी आत्मविश्वास डोलतो
पथ माझा मागुती आणि मी
पथ्यावाचुनि पुढे चालतो !

## घोडे येते मूळपदावर

शक्तीचे अन् स्वामीनिष्ठेचे प्रतीक
घोडा एक उमदे जनावर !
गाड्या नांगर ओढिता
दाणा-खराऱ्याच्या मोबदल्यावरी
मानवाचे वाहन बनला
आणि लागला यंत्राचा शोध
गेला घोडा, आले इंजन !

ज्ञानाचे चक्र सुरू होउनी
विज्ञाने सोडविले गूढगुंजन
चक्रे लागली फिरू
इंजन झाले पूर्ण
युक्तीने केली शक्तीवर मात !
परी इंजनाच्या शक्तीचे
आता कसे करावे मोजमाप ?
मानवाचे घोडे इथेच अडले

आणि लगेच झाली आठवण
अरे आपला हा घोडा नव्हे का ?
घोडयाच्या शक्तीचेच मापन !
घोडा नको, अश्व शोभेल
मानवाने वाजविली चुटकी !
त्या चुटकीसरशी
प्रगतीपर मानव

अश्वशक्तीनेच करू लागला

यंत्राचे शक्तिमापन !

अश्व गेला, अश्वशक्ती राहिली

कितिही घडवा नवे नवे

मौलिकाची मान सदा वर

कितिही हुलका, कितिही हुलका

घोडे येते मूळपदावर !

# नवे जग

दिसू लागले तुला नवे जग

अज्ञानातील नव जिज्ञासा
येऊ लागल्या पंख होऊनी
स्वैर भराऱ्या मारित मारित
तसाच जासी गगनोगगनी
नव्या कल्पनांचे उडती खग

पडता धडता शैशव गेले
पांगुळगाडा दिला फेकुनी
हिंडु लागले स्वैर कुतूहल
जनावनातुन अष्ट दिशांनी
शोधित धरणी फिरे मनोमृग

दिसू लागला नवा जोम तुज
मिटल्या मुठीत तान्हुकल्यांच्या
दिसू लागली नवी चारुता
मिटल्या कलिकांमाजी फुलांच्या
सूक्ष्माचे तुजपुढे उभे नग

बालपणी भासली नविनता
तरुणपणी ते जुने 'बालपण'
तारुण्यात गमे अभिनवता
वृद्धपणी ते जुने तरुणपण !
नवे जुने का ? जुने नवे ? बघ

जुनेपणाची कात टाकुनी
फणा उभारित नवीनता ये
तेज संचरे कणाकणांतुन
नाविन्याचे पिउनी वारे
चैतन्य भरे पुन्हा शिगोशिग

दिसू लागल्या नवीन वाटा
सुटली कायमची चाकोरी
तुझ्याच मागे वाट फुटे मग
ठराविकाला ठोकर मारी
तसेच जाता पुढे पुढे मग—

## पुण्य आणि पाप

कशास म्हणता पुण्य आणखी
कशास म्हणता पाप ?
कशास दुखवू तरुलतिकांना ?
प्राण ओतला त्यात प्रभूने
हळुवाराचा हात थरथरे
कशास तोडू सुमने–पाने ?
'जगण्यालागी नालायक तू' असा कुणी दे शाप !
जीव जिवाचे जीवन म्हणुनी
हिंसेचा कुणि इथे पुजारी
जीव दयेचा आस्थेवाइक
म्हणवित जीवांचा कैवारी
आणिक तिकडे रोज कसाई करितो कापाकाप
पापे प्रक्षाळिता गतीने
पतितांना ते पुण्य मिळाले
करीन ते मी पुण्यचि सगळे
पुनितालागी पाप मोकळे !
भय कसले त्या ? देव असो वा देवाचा कुणि बाप !
पुण्य म्हणोनी पुण्यक्षेत्री
पापाचे बघ साप घातले
पापराशिवर मारुन बैठक
पुण्य खुषीने गात बैसले
प्रणयाचे चालले तराणे, भक्तीचे आलाप
धर्माने घालुनी ठेविले
पुण्याला पापाचे बंधन
कर्माने नेमके बसविले
पापाला पुण्याचे कोंदण
काहि करा वा, करा कसेही, घडते आपोआप !

# असली कविता

स्मरणाच्या मरणातुन उरली !
—असली कविता नित नित्य नवी—

तुझे निवेदन जगा हवे जर
जीवन आधी लावि कसा
उडुनी जावो भुसा खंडिभर
उरोत दाणे एक पसा
कशास दुसऱ्यावरी हवाला ?
अनुमान नको अनुभूति हवी १

उगाच उसना चेव आणिता
अंगि चेतना येईल का ?
शब्द पाखडित जिव्हा नुसती
आत जिव्हाळा होइल का ?
नको जीवनी अशी लगटता
परिपूर्ण प्रगटता त्यात हवी ! २

मनोवृत्तिच्या नव्या भूमिका
नवे निवेदन, तीच मने
नवे नवे ते हवे हवे जरि
जुन्यावाचुनि तेहि सुने
नव्याजुन्याचे मंथन करुनी
नवजीवन देती चंद्र-रवी ३

पिवळ्यामधले ते हिरवेपण
क्षण सरल्यावर तेहि सरे
झडली पाने, पडली खाली
वाळुन पाचोळाच उरे
जगी पिकावे नागवेलिने
पिकण्यातही गोडी आणि चवी ! ४

शांतवायचे शांततेत त्या
परमात्म्याचा अंश हवा
चेतवायचे चेतनेत त्या
चैतन्याचा दंश हवा !
हृदयामधले खरे मनोगत
नित दोन करांना जी कळवी ५

विराट विश्वामाजी भ्रमता
क्षणोक्षणी कल्पना अडे
‘ गगनामागुन लागत गगने ’
उच्चत्वहि ठेंगणे पडे
भल्या भल्या त्या जागतिकांना
जी विराटता आगतिक बनवी ६

स्मरणाच्या मरणातुन उरली
असली कविता नित नित्य नवी !

## अश्रूंचे आवाहन

अश्रूंचे आवाहन अजुनी
रक्ताला नच कळले रे !
खळबळणारे तुझे मनोगत
हृदयातुनी जे आले अधरी
झाली रंध्रे जागृत क्षणभर
अधरीचे नच भिनले रुधिरी
काही न घडता कृती हातुनी
जन नुसते हळहळले रे १

थोर महात्मे करिति साधना
तेच जगाचे झाले साधन
त्याग-तपस्या कालगतीने
बनले चरणांचे श्रीपूजन
थोरांचे जे महावस्त्र ते
चोरा चिलखत झाले रे २

अश्रु स्वतांचे पिउनी प्रेमी
जे अधरामृत पीणे शिकले
पुढे देवधर्माच्या भिंती
अखेर प्रीतीला ते मुकले
शृंगाराच्या चंद्रज्योतिचे
चित्रच नुसते उरले रे ३

जगास हसवाया रमवाया

नव तेजाचे अरुण हर्षले

दलितांच्या क्षुधितांच्यासाठी

अश्रूंचे जे वरुण वर्षले

अश्रुबलाचे श्रेय अखेरी

आत्मसमाधित निजले रे ४

अढीवाचुनी आस मिळेना

स्वार्थ गुरगुरे समतेवरती

तेढीवाचुन मित्र मिळेना

दर्प फुरफुरे ममतेवरती

तत्त्वार्थाचा करुनी चोथा

शब्दच नुसते गिळले रे ५

अश्रूंचे आवाहन अजुनी

रक्ताला नच कळले रे !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
क्र ५००९८ ... दि: ९/७/०१
१७७७९ नोंद दि: २४/१२/९८
REFBK-0016968
REFBK-0016968
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६९६८